# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, मंगळवार १५ जूलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ १०







## शुभांशूंचा परतीचा प्रवास सुरू

**२३ तासांच्या प्रवासानंतर पृथ्वीवर पोहोचणार**



**फलोरिडा/वृत्तसंस्था :** शुभांशू शुक्ला यांच्यासह चार अंतराळवीर आज १४ जुलै रोजी दुपारी ४:४५ वाजता आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरून पृथ्वीवर रवाना झाले. सुमारे २३ तासांच्या प्रवासानंतर, त्यांचे ड्रॅगन अंतराळयान १५ जुलै रोजी दुपारी ३ वाजता समुद्रात उतरेल. याला स्प्लॅशडाऊन म्हणतात. हे अंतराळयान २६३ किलोपेक्षा (पान २ वर)

**ठाकरेंना दिलासा? शिवसेना पक्ष–चिन्ह प्रकरणावर सुप्रीम कोर्टाचे मोठे विधान**

# पालिका निवडणुकीआधीच महत्वपूर्ण निकाल

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मागील अनेक महिन्यांपासून सुप्रीम कोर्टात रखडलेल्या शिवसेना पक्ष-चिन्हाच्या याचिकेवर सोमवारी सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली. यादरम्यान कोर्टाने थेट ऑगस्ट महिन्यात याबाबत सुनावणी घेणार असल्याचे स्पष्ट केले. असे असले तरी कोर्टाने केलेल्या विधानामुळे या प्रकरणाचा निकाल स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीआधी लागण्याची शक्यता वाढली आहे.

सुप्रीम कोर्टात न्यायाधीश सूर्यकांत आणि जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. उद्धव ठाकरे यांनी शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह वापरण्यापासून एकनाथ शिंदे यांना रोखावे, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या



निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर ठाकरेंनी ही मागणी केली आहे.

याचिकेवर लवकर सुनावणी घेण्याची मागणी ठाकरेंच्या वकिलांनी २ जुलैला खंडपीठासमोर केली होती. त्यावर आज कोर्टात युक्तीवाद होण्याची शक्यता होती. मात्र, न्यायाधीश सूर्यकांत यांनी ऑगस्ट महिन्यांत हे प्रकरणावर सुनावणी घेण्याचे स्पष्ट केले. मात्र, अद्याप त्यांनी तारीख निश्चित केलेली नाही. आजच्या सुनावणीदरम्यान सूर्यकांत यांनी ही केस आपल्याला संपवायची आहे, असे विधान केले आहे. सुप्रीम कोर्टाकडून ऑगस्ट महिन्यात या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावण्याचे संकेत दिल्याने उद्धव ठाकरे यांना सध्यातरी तात्पुरता दिलासा मिळाला आहे. निवडणुकीआधी संपूर्ण प्रकरणाचा निकाल लागू शकतो. दरम्यान, भारतीय निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांच्या २०२२ मधील बंडानंतर फेब्रुवारी २०२३ मध्येच शिंदे यांच्या गटाला शिवसेना आणि धनुष्यबाण हे चिन्ह बहाल केले होते. त्याला ठाकरेंनी सुप्रीम कोर्टात आव्हान दिले असून अजूनही त्यावर निकाल आलेला नाही. निवडणुकांआधी अंतरिम निकाल देण्याची मागणी ठाकरेंनी याचिकेत केली आहे. तर एकनाथ शिंदे यांच्या वकिलांकडून यापूर्वी लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका याच नावावर आणि चिन्हावर लढवल्या गेल्या आहेत, असा युक्तीवाद केला आहे. सुप्रीम कोर्टाने आधीही याबाबतची ठाकरेंची याचिका फेटाळली आहे, असेही वकिलांकडून निदर्शनास आणून दिले जात आहे. त्यामुळे आता ऑगस्ट महिन्यांत कुणाला दिलासा मिळणार, शिवसेना पक्ष आणि चिन्ह कुणाला मिळणार, याबाबत उत्सुकता शिगेला पोहचली आहे.

# सामाजिक न्याय विभागात 1,500 कोटींचा टेंडर घोटाळा

## मंत्री संजय शिरसाटांचा पाय आणखी खोलात!

**मुंबई/प्रतिनिधी :** महायुतीच्या सरकारमधील सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट हे पुन्हा एका नव्या घोटाळ्याच्या चर्चेनं अडचणीत आले आहेत. यापूर्वीचा एक टेंडर घोटाळा अन् पैशांच्या बॅगेसह व्हायरल व्हिडिओ प्रकरणामुळं ते अडणीत आले आहेत. त्यात आता आणखी एका घोटाळ्याची भर पडली आहे. त्यामुळं सामाजिक न्याय विभागाच्या टेंडरमधील घोटाळ्याची चौकशी व्हावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडं करण्यात आली आहे. सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार यांनी यासंदर्भात ट्विट केलं आहे.



विजय कुंभार आपल्या ट्विटमध्ये या कथित घोटाळ्याचा तपशील देताना म्हणतात, मुख्यमंत्री साहेब, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्यावर आधीच अनेक गंभीर आरोप आहेत. आता टेंडर क्र. ३७४ द्वारे सामाजिक न्याय विभागानं काढलेल्या १,५०० कोटींच्या टेंडरमध्ये मोठा घोटाळा उघड झाला आहे. या टेंडरमध्ये अनियमितता आहे. या टेंडरसाठी स्मार्ट सर्विहसेस (पूर्वीची ब्रिस्क इंडिया), बीव्हीजी इंडिया आणि क्रीस्टल इंटीग्रेटेड सर्विहसेस फक्त याच तीन कंपन्या पात्र ठरल्या आहेत. या तिन्ही कंपन्यांनी १९.५० टक्के इतकाच सर्विहस चार्ज दिला आहे, म्हणजे स्पष्ट रिंग (Collusion) आहे. हे बेकायदेशीर असून पूर्वी ब्रिस्क इंडियाला ब्लॅकलिस्ट करा असं पत्र आपणच दिलं होतं. या या कंपनीवर ईडीची कारवाई सुरु आहे. या टेंडरमध्ये एकूण खर्चाचा उल्लेख नाही. यामध्ये सहा वर्षांसाठी ३,६३४ कामगार दाखवण्यात आले आहेत, पण कोणत्या पदासाठी किती वेतन दिलं हेच दिलेले नाही. केवळ सर्विहस चार्जच्या आधारावर हजारो कोटी (पान २ वर)

# समृद्धीवरून 121 किलो गांजाची तस्करी



## पोलिसांचे सायरन वाजले, सिनेस्टाईल पाठलाग, तिघांना अटक

**नाशिक/प्रतिनिधी : :** महाराष्ट्राच्या समृद्धीची भाग्यरेषा म्हणत नागपूर ते मुंबई समृद्धी महामार्गाचे मोठ्या धडाक्यात लोकार्पण करण्यात आले. आता, संपूर्ण महामार्ग प्रवाशांसाठी खुला करण्यात आला आहे. मात्र, हा महामार्ग गेल्या अनेक महिन्यांपासून अपघाताच्या घटनांनी चर्चेत आहे. सातत्याने या महामार्गावर होणारे अपघात चिंतेची आणि संसोधनाची बाब बनला आहे. त्यातच, आता समृद्धी महामार्गाने नागपूरकडून मुंबईच्या दिशेने जाणा-या दोन चार चाकी वाहनांमध्ये गांजाचा मोठा साठा आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. नाशिक पोलिसांनी ही दोन वाहने जप्त केली असून त्यातून तब्बल १२१ किलो गांजा जप्त केला आहे. समृद्धी महामार्गावरुन मोठ्या प्रमाणावर तस्करी होणार असल्याची गोपनीय माहिती नाशिक ग्रामीण पोलिसांना मिळाली होती. त्याच अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे चार पथके सिन्नर येथील समृद्धी महामार्गावर गस्त घालत असताना दोन चार चाकी वाहनात गांजा असल्याची पोलीस सुत्रांची माहिती मिळाली. ग्रामीण पोलिसांच्या पथकाने समृद्धी महामार्गावर सिनेस्टाईल पाठलाग करून चार चाकी वाहनातून तब्बल १२१ किलो गांजासह ही दोन्ही वाहने जप्त केली आहेत. या कारवाईत (पान २ वर)

# अमली पदार्थ विक्री करणा-यांवर 'मोक्का' लावण्यासाठी कायद्यात बदल करण्यात येणार

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात अमली पदार्थ विक्रीच्या गुन्ह्यांमध्ये वारंवार अटक होउनही आरोपी जामिनावर सुटतात. अशा प्रकरणांमध्ये 'महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा' (मोक्का) लावण्यासाठी कायद्यात दुरुस्ती केली जाणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले विधानसभा सदस्य विलास भुमरे यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मुख्यमंत्री श्री.फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, सध्या एनडीपीएस अंतर्गत सर्व गुन्ह्यांमध्ये मोक्का लावणे शक्य होत नाही. मात्र या सभागृहाने मंजुरी दिलेली असून, वरील सभागृहातही एक ते दोन दिवसांत मान्यता मिळेल. त्यानंतर वारंवार अमली पदार्थ विक्रीचा व्यवसाय करणा-यांवर मोक्काअंतर्गत कठोर कारवाई करता येणार आहे.छत्रपती संभाजीनगरमध्ये अमली पदार्थ विरोधात मोहिम सुरू असून छत्रपती संभाजीनगरमध्ये अतिक्रमण विरोधात मोठ्या प्रमाणात धडक कारवाई सुरु आहे, अँटी-नार्कोटिक्स युनिट प्रत्येक पोलीस ठाण्यात स्थापन करण्यात आले आहे. या माध्यमातून कारवाया गतिमान झाल्या असून, विशेषतः शाळा संपर्क अभियान मोठ्या प्रमाणात राबवले जात आहे.गेल्या वर्षी छत्रपती संभाजीनगरमधील ३७९ ते ३८९ शाळांना भेटी देण्यात आल्या असून, २५७ कार्यशाळांद्वारे अंमली पदार्थविरोधी जनजागृती करण्यात आली आहे. बेहराम पाडा यासारख्या संवेदनशील भागांमध्ये



धडक मोहिमा राबवण्यात येतील. अमली पदार्थ विक्री करणा-यांवर कठोर कारवाई होईल. परदेशी नागरिक येथे येउन गुन्हे करून निकाल लागेपर्यंत राहतात, त्यांची कारवाई रखडते. याबाबत केंद्र शासनाशी चर्चा सुरू असून, लघु गुन्ह्यांमध्ये केस परत घेउन तत्काळ रिपोर्ट करून आरोपींचे 'डिपोर्टेशन' करता येईल, यासाठी प्रभावीत कार्यप्रणाली तयार केली जात आहे.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अंमली पदार्थ विक्री प्रकरणांमध्ये अनेकदा आरोपी आपले वय कमी असल्याचे दाखवतात. याचा गैरफायदा रोखण्यासाठी व कायद्याच्या कमी वयाच्या अज्ञान नियमात सुधारणा करून, जसे बलात्कार प्रकरणांमध्ये गुन्ह्याचे स्वरूप पाहून निर्णय घेतला जातो, तसेच पद्धतीने दोषींचे वय दोन वर्षांनी खाली आणण्याबाबत विचार सुरू आहे. राज्यात अंमली पदार्थ तस्करांविरुद्ध विशेष मोहीमा, ड्रग्ज मुक्त अभियान सुरू आहे. नार्कोकोऑर्डीनेशन यंत्रणेची पुनर्रचना करण्यात आली असून अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली आहे.राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केले आहेत. असेही मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत सांगितले.



भारताचा चिवट लढा

## इंग्लंडचा २२ धावांनी विजय

**लंडन/वृत्तसंस्था :** क्रिकेटच्या महाकुंभात क्रिकेटची पंढरी म्हणून ओळखल्या जाणा-या लॉर्ड्सवर भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला आहे. पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील तिस-या सामन्यात इंग्लंडने भारताचा पराभव करत २-१ अशी विजयी आघाडी घेतली असून भारताने इंग्लंडशी चिवट लढा दिला. दरम्यान इंग्लंडने केवळ २२ धावांनी विजय मिळविला. सामन्याचा प्रारंभ दोन्ही संघांनी सारख्याच ताकदीने केला होता. इंग्लंडने (पान २ वर)

# महायुतीचे मंत्री नागडे फिरतायेत त्यांना कपडे द्या




**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या नोटांच्या बंडलांसोबतच्या व्हीडीओमुळे सत्ताधारी शिवसेनेची चांगलीच कोंडी झाली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधान परिषदेतील सदस्य अनिल परब यांनी सोमवारी या व्हीडीओ प्रकरणाची एसआयटी चौकशी करण्याची मागणी केली आहे. मंत्री संजय शिरसाट यांचा एक व्हीडीओ गत आठवड्यात व्हायरल झाला होता. त्यात ते कॉटवर उघडे बसून सिगारेट पित असताना दिसून येत आहेत. विशेषतः त्यांच्या जवळ एक पैशांची बॅग पडली असल्याचेही दिसून येत आहे. ठाकरे गटाने ही बॅग त्यांना मिळालेल्या ५० खोक्यांपैकी १ असल्याची टीका केली आहे. या प्रकरणी त्यांच्यावर टीकेची झोड उठली असताना आता हा मुद्दा थेट विधिमंडळातही पोहोचला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अनिल परब यांनी सोमवारी हा मुद्दा विधान परिषदेत उपस्थित केला. तसेच या प्रकरणी योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली. अनिल परब म्हणाले की, सध्या चड्डी बनियन गँग किंवा चड्डी टॉवेल गँगचे व्हीडीओ सध्या महाराष्ट्रभर फिरत आहेत. या गँगचे व्हीडीओ विशेषतः एका मंत्र्याचे बेडरूममधील व्हीडीओ बाहेर येत आहेत. हे सगळे उघडे फिरत आहेत. त्यांना सरकारतर्फे एक-दोन कपडे तर द्या. काय चाललंय महाराष्ट्रात? मंत्री उघडे नागडे फिरत आहेत. बेडरूमधला व्हीडीओ आला कसा बाहेर? बेडरूममधले व्हीडीओ बाहेर येत आहेत याचा अर्थ मंत्री सुरक्षित नाहीत. बेडरूममध्ये सूट घालून झोपा असे मी (पान २ वर)

# सिगारेटसारखा इशारा आता समोसा, जिलेबीवर देखील !

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सध्याच्या काळात ब-याच जणांना लठ्ठपणाचा आजार बळावत आहे. त्यात जंक फूडबाबत सरकार मोठे पाउल उचलण्याच्या तयारीत आहे. आता सिगारेट, तंबाखूसारखे समोसा आणि जिलेबीवर ग्राहकांना इशारा देणारी सूचना छापली जाणार आहे. लहान मुलांमध्ये लठ्ठपणा आणि युवकांमध्ये आवश्यकतेपेक्षा



वाढणारे वजन यामुळे केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने जंक फूडवर इशारा देणारी सूचना लावण्याची तयारी केली आहे.रिपोर्टनुसार, आरोग्य मंत्रालयाने एआएमएमएससह अनेक केंद्रीय संस्थांना अशाप्रकारचे पोस्टर्स लावण्याचे आदेश दिले. ज्यात स्पष्टपणे दररोज करण्यात येणा-या नाश्त्यात किती फॅट आणि साखर आहे त्याचा उल्लेख करण्यात यावा. विशेषतः पहिल्यांदाच अशाप्रकारे जंक फूडवर तंबाखूसारखा इशारा देणारी सूचना जारी करण्याची तयारी करण्यात (पान २ वर)

# मोदी सरकार सुप्रीम कोर्टात हतबल

**निमिषा प्रिया यांचा जीव वाचविण्यासाठी केवळ 'ब्लड मनी'चा पर्याय**

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सुप्रीम कोर्टात सोमवारी केंद्र सरकारने हतबलता दर्शवली. निमिषा प्रिया यांची फाशी रोखण्यासाठी सरकार आणखी काही करू शकत नाही, असे कोर्टात सरकारच्या वतीने सांगण्यात आले. हे खूप दुर्दैवी आहे. सर्व प्रयत्न केले. पण आम्ही काही करू शकत नाही. त्याला काही मर्यादा आहेत, असे अटर्नी जनरल आर वेंकटरमणी यांनी कोर्टात सांगितले.

वेंकटरमणी यांनी आता केवळ एकच पर्याय असल्याचेही सांगितले. निमिषा प्रिया यांच्या हातून खून झालेल्या संबंधित व्यक्तीचे कुटुंब 'ब्लड मनी' म्हणजे आर्थिक भरपाई घेण्यासाठी तयार व्हायला हवे. मात्र, ही खासगी गोष्ट असल्याने सरकार त्यात काही करू शकत नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



***काय आहे प्रकरण?***

निमिषा प्रिया या केरळातील पलक्कड जिल्ह्यातील रहिवासी आहेत. येमेनमध्ये त्यांचा बिझनेस पार्टनर तलाल अबदो मेहदी यांच्या खून प्रकरणात येमेन येथील कोर्टाने फाशीची शिक्षा ठोठावली आहे. निमिषा यांनी आपल्यावरील आरोपांविरोधात दाखल केलेली याचिकाही कोर्टाने फेटाळली आहे. आता त्यांना १६ जुलैला फाशी दिली जाणार आहे.दरम्यान, संबंधित व्यक्तीच्या कुटुंबाने आर्थिक भरपाई घेण्यासही नकार दिल्याचे समजते. त्यामुळे निमिषा प्रिया यांना फाशी होण्यापासून वाचण्याची शक्यता आता धूसर झाली आहे. त्या २००८ पासून नर्स म्हणून काम करत होत्या. येमेनमध्ये २०१४ मध्ये नागरी संघर्ष सुरू झाल्यानंतर (पान २ वर)

## सुवर्ण मंदिर RDX ने उडवण्याची धमकी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमृतसरमधील सुवर्ण मंदिर आरडीएक्सने उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. ही धमकी एका अज्ञात व्यक्तीने ईमेलद्वारे दिली आहे. मेल मिळताच शहरात खळबळ उडाली आहे. यानंतर शिरोमणी गुरु द्वारा प्रबंधक समितीने (एसजीपीसी) आपल्या पातळीवर, सुवर्ण मंदिर, परिक्रमा, लंगर भवन आणि सर्व धर्मशाळांची सुरक्षा कडक केली आहे. टास्क फोर्सकडून सतत तपासणी सुरू आहे. कुठल्याही संशयित व्यक्तीवर अथवा कृतीवर लक्ष ठेवण्यासंदर्भात टास्क फोर्सला निर्देश देण्यात आले आहेत. (पान २ वर)

# सत्ताधारी पक्षाच्या आमदारांसाठी नवे दारूचे परवाने का?

## मद्य धोरणावर दानवे संतापले!

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचा महसूल वाढवण्यासाठी सरकारने नव्याने सव्वातीनशेहून अधिक नवे दारू परवाने देण्याचा निर्णय घेतला आहे. यावर विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी कडाडून टीका केली. सत्ताधारी पक्षाच्या आमदारांसाठी नवे दारूचे परवाने दिले जात आहेत का? असा सवाल दानवे यांनी विधान परिषदेत केला. माता-भगिनींचा या दारू धोरणाला विरोध असल्याचे दानवे म्हणाले.नव्याने दारू परवाने देण्याच्या राज्यातील महायुती सरकारवर विरोधक तुटून पडले आहेत. अंबादास दानवे यांनीही विधान परिषदेत हा निर्णय सत्ताधारी पक्षाच्या आमदारांना दारू परवाने मिळावेत यासाठी घेण्यात आला आहे का? असा प्रश्न सरकारला विचारला. राज्य उत्पादक शुल्क विभागाच्या वतीने राज्यामध्ये ३२८ नवीन दारूचे परवाने देण्यात येत आहेत. ८ महसूली विभागात हे परवाने दिले जाणार आहेत. १९७२ पासून असे परवाने राज्यात बंद होते. राज्याचे उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्राचे मद्य धोरण आखण्यासाठी समिती गठीत करण्यात आली होती. या



समितीतील लोकं दारूचे वितरण व पुरवठा व्यवस्था नियंत्रित करत असतात. राज्याचा महसूल वाढविण्यासाठी अशाप्रकारे दारूच्या ३२८ नवीन दुकानांना परवाने दिले जात असतील तर ते राज्याच्या दृष्टीने योग्य नाही. माता - भगिनी यांचा या धोरणाला कठोर विरोध आहे. सत्ताधारी पक्षाच्या आमदाराना परवाने देण्यासाठी हे नवीन ३२८ दुकानांना परवानगी दिली जात आहे का? अशी स्थिती (पान २ वर)



# शेतकऱ्यांच्या कर्जमुक्ती लढ्याची ऐतिहासिक सभा

**अमरावती/प्रतिनिधीः- 'सातबारा कोरा कोरा' यात्रेची ऐतिहासिक सभा आंबोडा येथे संपन्न झाली. १४२ किलोमीटरचा संघर्षमय प्रवास पार करून हजारो शेतकरी आणि शेतमजूर या ठिकाणी एकत्र आले. जात, धर्म, पंथ विसरून सर्वांनी एकसंध होऊन – 'आम्ही शेतकरी आहोत' या ओळखीवर एकवटले.**

आंबोड्याची सभा निर्णायक ठरली -शेतकऱ्यांचा हुंकार. 'आता लढा निर्णायक टप्प्यावर आला आहे – सरकारला गुडघ्यावर आणल्याशिवाय मागे हटायचं नाही!' बच्चू कडूंच्या आंदोलनाला राजकीय आणि सामाजिक पाठिंबा सभेमध्ये आमदार रोहित पाटील यांनी जाहीर केला.'बच्चू कडू यांच्या शेतकरी कर्जमुक्तीच्या आंदोलनाला मी तन-मन-धनाने पाठिंबा देतो.'तसेच सत्यपाल महाराज म्हणाले, 'आजच्या घडीला शेतकऱ्यांना वाचवणार असेल,

**■ १४२ किमीचा प्रवास,आंबोडा येथे घडला इतिहास!**

**■ २४ जुलैला संपूर्ण महाराष्ट्रात चक्काजाम आंदोलन**



तर तो एकच – बच्चूभाऊ कडू!'

**शासनाच्या धोरणांवर घणाघात:** बच्चू कडू यांनी शासनाला लक्ष्य करत म्हटलं, 'राज्य शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकरी आत्महत्या करत आहे. आणि (पान २ वर)

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# महिला कर्मचाऱ्याच्या विनयभंगप्रकरणी शाखा अभियंता निलंबित

## ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख यांच्या आंदोलनाला यश

**अकोला/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (म.जी.प्रा.) मूर्तिजापूर येथील कार्यालयातील कंत्राटी संगणक चालक पदावर कार्यरत असलेल्या महिलेसोबत असभ्य वर्तन करीत विनयभंग केल्याप्रकरणी अखेर संबंधित शाखा



अभियंत्याला निलंबित करण्यात आले आहे. तसेच दुसऱ्या अधिकाऱ्यावर कारवाईचा प्रस्ताव मंत्रालयाकडे पाठविण्यात येणार आहे. ही कारवाई ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख यांच्या सोमवारी झालेल्या ठिय्या आंदोलनानंतर झाली आहे.या प्रकरणात महिला कर्मचाऱ्याने संबंधित अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप करत मूर्तिजापूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानंतरही संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने आमदार नितीन देशमुख यांनी प्राधिकरणाच्या कार्यालयात थेट आंदोलन केले. त्यांनी या मुद्द्यावर विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी प्रस्ताव मांडण्याचा प्रयत्न केला होता, परंतु तो सभागृहात घेतला गेला नाही. यावर आ. देशमुख यांनी नाराजी व्यक्त करत विधानसभा अध्यक्षही 'मॅनेज' झाल्याचा गंभीर आरोप केला. 'सदरील अधिकारीच म्हणत होते की लक्षवेधी लागत नाही, यावरूनच सगळं स्पष्ट होतं. अध्यक्षांनी मुद्दाम लक्षवेधी घेतली नाही. त्यामुळेच आज मी अधिवेशनाला गैरहजर राहून एका बहिणीस न्याय मिळावा म्हणून ठिय्या आंदोलन करीत आहे,' असे भावनिक उद्गार त्यांनी यावेळी काढले.या आंदोलनावेळी जिल्हा प्रमुख गोपाल दातकर, मंगेश काळे, किरण ठाकरे व महिला पदाधिकारी यांच्यासह शिवसेनेचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या मूर्तिजापूर उपविभागात कार्यरत शाखा अभियंता राजेंद्र अमृतराव इंगळे यांनी महिलेशी असभ्य वर्तन केल्याचा आरोप असून, त्यांच्या विरोधात गुन्हाही दाखल झाला आहे. या पार्श्वभूमीवर मध्यवर्ती कार्यालयाकडून आलेल्या निर्देशानुसार इंगळे यांना १४ जुलैपासून निलंबित करण्यात आल्याचे आदेश महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे प्रभारी मुख्य अभियंता एस. एस. गव्हाणकर यांनी सायंकाळी जारी केले.

## बोरगाव मार्गावर ऑटो चालकाचा मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-** बोरगाव धर्माळे येथील चक्रधर शोरूमच्या समोरील रोडवर एका ऑटो चालकाचा मृत्यू झाल्याची घटना आज सोमवार १४ जुलै चे सकाळी उघडकीस आली आहे. विनोद सुरेश साकोरे (वय ४०,रा.नांदगाव पेठ बस स्टॅन्ड) असे मृतकाचे नाव आहे. माहितीनुसार मृतक विनोद साकोरे याला दारूचे व्यसन होते, गेल्या आठ दिवसापासून तो सतत दारू पिऊन राहत होता. यामुळे त्याची पत्नी पिंकी त्याला सोडून माहेरी गेली. या नंतर तो आणखीन दारू पिऊ लागला आणि जेवण बंद केले. रविवारच्या सायंकाळी तो आपला ऑटो एमएच २७ बी डब्ल्यू ७३१६ घेऊन घरून निघाला आणि रात्री पण घरी नाही आला. सोमवारच्या सकाळी त्याचा मृतदेह बोरगाव धर्माळे चक्रधर शोरूम च्या समोर दिसला. याची माहिती तिथून जाणाऱ्या एका व्यक्तीने त्याचे भावाला दिली तसेच पोलिसांना सुचित केले. आठ दिवस सतत दारू पिऊन जेवण न केल्याने त्याचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. गणेश मारुतीराव साकोरे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल केला आहे.




# जिल्ह्यातील शेकडो बार आणि रेस्टॉरंटला टाळे

**-सरकारच्या धोरणाविरुद्ध परमिट रूम केले बंद**
**-जिल्हाधिकारी कार्यालयावर काढला विशाल मोर्चा**

**अमरावती/प्रतिनिधीः-** शासनाच्या वतीने परवाना वार्षिक दरांवर १५ टक्के आणि १० टक्के वॅट वाढविण्यात आला आहे. या दरवाढीमुळे बारसंचालकांवर आर्थिक संकट कोसळले आहे. त्यांच्या व्यवसायावर संकट ओढले आहे. या दर वाढीचा परमिट रूम असोसिएशनच्या वतीने विरोध करण्यात आला आहे. हा निर्णय परत घेण्याच्या मागणीसाठी आज सोमवार १४ जुलै रोजी परमिट रूम बंद ठेवून संचालकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर विशाल मोर्चा काढला. वॅट हटवा परमिट रूम वाचवा.. दहा टक्के वॅट हटवा... दरवर्षी १५ टक्के वाढ थांबवा... वापस घ्या... वापस घ्या वॅट वृद्धी वापस घ्या.... अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या. शहरातील १२५ आणि जिल्ह्यातील ४५० असे एकूण ५७५ बार आणि रेस्टॉरंट वर सोमवारी टाळे दिसले. बार संचालकांनी जबरदस्त आक्रोश सरकारच्या विरोधात व्यक्त केला. जिल्हाधिकारी मार्फत शासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,शासनाच्या वॅट व परवाना शुल्क वाढीव या निर्णयाचा व्यापाराला फटका बसत आहे. शासनाने बारा वर्षांपूर्वी लावलेला अन्याकारक वॅट आणि त्यामध्ये केलेल्या वृद्धीमुळे पूर्वी पासूनच बार व्यवसायीकांवर संकट कोसळले आहे. आता लायसन्स नुतनीकरण वार्षिक शुल्क मध्ये पंधरा टक्के आणि वॅटमध्ये पाच टक्के वाढीचा निर्णय घेतलेला आहे.

शासनाच्या नवीन निर्णयामुळे परमिट रूम बंद होण्याच्या मार्गावर पोहचले आहे.लवकरात लवकर ही दरवाढ रद्द करण्याच्या मागणीसाठी हा बंद पुकारण्यात आला. जर शासनाने मागण्या पूर्ण नाही केल्या तर यापेक्षा तीव्र आंदोलन करण्यात येणार असा इशारा यावेळी देण्यात आलेला आहे. या आंदोलनात आशिष देशमुख, सूर्यकांत जयस्वाल, नितीन मोहोड, अंगद जयस्वाल, संजय मानकर, जयंत वाकोडे, अनिल तरडेजा, मदन जयस्वाल, संजय छाबडा, दिगंबर गुल्हाने, विनोद रहाटे, सतपाल सिंग अरोरा, विनोद भगत, राजू मुळे, विजय जयस्वाल, आकाश शिरभाते, आशिष बेतारीया, रोहित खुराना, प्रशिक पाटोकार, ज्ञानेश्वर ठाकरे, लाठी नंदा, सुरेश चांदवानी सह जिल्ह्यातील बार संचालक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

## इंडिका कार व ऑटो रिक्षामध्ये भीषण अपघात; ६ गंभीर, ३ चिमुकले किरकोळ जखमी

**अमरावती/प्रतिनिधा-** भातकुली मार्गावर १३ जुलै रोजी दुपारी अडीच ते तीन वाजेच्या दरम्यान इंडिका कार आणि ऑटो रिक्षामध्ये भीषण अपघात झाला. समोरून भरधाव वेगात आलेल्या इंडिका कारने ऑटो रिक्षाला जबर धडक दिल्याने रिक्षाला तीन पलटया बसल्या. या अपघातात रिक्षाचालकासह पाच प्रवासी गंभीर जखमी झाले असून तीन लहान मुले किरकोळ जखमी आहेत.अपघातात जखमी झालेल्यांमध्ये शहा नवाज शहा (वय २६, रा. हमजा प्लॉट, अकोला),महबूब शहा इब्राहिम शहा (वय ६०, रा. हमजा प्लॉट, अकोला), अफरोज शहा गफ्फार शहा (वय ३९, ऑटो रिक्षा चालक, रा. जुना शहर, अकोला), फैजिया अंजुम अजहर शहा (वय ३०, रा. पिंजर, महान पो.स्टे.), नाजिया परवीन महबूब शहा (वय २८, रा. जुना शहर, अकोला), फैमादे बानो शकील शहा (वय ५०, रा. हमजा प्लॉट, जुना शहर, अकोला) तसेच, तीन लहान मुलांना किरकोळ दुखापत झाली आहे.

# पान १ व १० वरून

## शुभांशूंचा परतीचा प्रवास सुरू

जास्त माल घेउन परत येईल. त्यात नासाचे हार्डवेअर आणि ६० हून अधिक प्रयोगांमधील डेटा समाविष्ट असेल. अवकाश संशोधनासाठी हे खूप महत्वाचे आहे.चारही अंतराळवीर २६ जून रोजी भारतीय वेळेनुसार दुपारी ४:०१ वाजता आयएसएसवर पोहोचले. ॲक्सियम मिशन ४ अंतर्गत, अंतराळवीर २५ जून रोजी दुपारी १२ वाजता निघाले. स्पेसएक्सच्या फाल्कन-९ रॉकेटला जोडलेल्या ड्रॅगन कॅप्सूलमधून ते केनेडी स्पेस सेंटरमधून उड्डाण करत होते. तांत्रिक बिघाड आणि हवामानाच्या समस्यांमुळे हे अभियान ६ वेळा पुढे ढकलण्यात आले.

## सामाजिक न्याय विभागात

रु पयांचा निर्णय घेण्यात आला आहे. १३ वर्षे (२०१३) झाले हेच ठेकेदार आहेत, याचा एक पॅटर्न तयार झाला आहे. गेल्या १० वर्षात कोणतंही नवीन टेंडर न काढता काम सुरू आहे. यात एकाच टेंडरवर १,५०० कोटींचं पेमेंट झालं आहे.

दरम्यान, कुंभार यांनी हा घोटाळा असल्याचं सांगताना याची चौकशी करण्याची तसंच इतरही काही मागण्या केल्या आहेत. त्यांनी म्हटलं की, हे १५०० कोटींचं टेंडर तात्काळ रद्द करण्यात यावं. रिंग करणा-या कंपन्यांना ब्लॅकलिस्ट करण्यात यावं. जिल्हानिहाय टेंडर प्रणाली लागू करु न त्यात स्थानिक महिला गट, युवक, संस्थांना संधी मिळावी. मागील १३ वर्षांचा गैरव्यवहार आणि विना-टेंडर काम याची देखील चौकशी करण्यात यावी. ही बाब सामाजिक न्याय विभागातील पारदर्शकतेचा आणि सार्वजनिक निधी वापरावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा आहे. कृपया मुख्यमंत्र्यांनी या घोटाळ्याकडं त्वरित लक्ष द्यावं आणि कठोर कारवाई करावी, अशी मागणीही यावेळी विजय कुंभार यांनी केली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील हॉटेल व्हिट्स खरेदीचा टेंडर गैरव्यवहारात संजय शिरसाट अडकल्यानंतर, पैशानं भरलेल्या बॅगेसह व्हिडिओ व्हायरल झाला होता. पण आता आणखी एका नव्या मोठ्या टेंडर घोटाळ्यात त्याचं नाव आहे.

## समृद्धीवरून 121 किलो गांजाची

तीन गांजा तस्कर पोलिसांच्या ताब्यात असून त्यातील एक फरार झाला आहे.नाशिक ग्रामीण पोलिसांचे पथक अद्यापही त्याच्या मागावर असून तिघांना सिताफीने अटक करण्यात आली आहे. या कारवाईत तब्बल ३६ लाख २९ हजार रु पये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नागपूरवरु न मुंबईच्या दिशेने या गाड्या येत होत्या, त्यातील दोन्ही गाड्या जप्त केल्या असून एका गाडीचा ड्रायव्हर जंगलाचा आधार घेउन जंगलातून फरार झाला आहे. आतापर्यंत त्याच्यावर ११ गुन्हे दाखल असून तो नाशिकमधील सराईत गुन्हेगार असल्याची माहिती पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी माहिती दिली. पोलिसांनी भारत चव्हाण, तुषार काळे, संदीप भालेराव या तिघांना अटक केली असून सुनील अनार्थे हा आरोपी फरार आहे. आरोपींवर नाशिक शहरातील विविध पोलीस ठाण्यात तब्बल ११ गंभीर गुन्हे दाखल असून तो कुख्यात टिप्पर गँगचा सराईत गुन्हेगार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ग्रामीण पोलिस दलातील एक अधिकारी आणि एक अंमलदार या कारवाईच्या दरम्यान किरकोळ जखमी झाले आहेत. गुजरात नागपूरमार्गे मुंबई शहरात हे गांजा तस्कर गांजाची विक्री करणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे याबाबत नाशिक ग्रामीण पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी माहिती दिली.

## इंग्लंडचा 22 धावांनी विजय

पहिल्या डावात ३८७ धावांची दमदार खेळी केली, त्याला भारतानेही तितक्याच धावांनी म्हणजे ३८७ धावांनी प्रत्युत्तर दिले. एक क्षण असा वाटला की सामना बरोबरीत फसू शकेल. पण मग इंग्लंडने दुस-या डावात भारतापुढे १९३ धावांचे आव्हान उभे केले, पण पाचव्या दिवशी एकामागोमाग एक विकेट्स कोसळल्या आणि भारताचा डाव अवघ्या १७० धावांवर आटोपला. कर्णधार शुभमन गिल, उपकर्णधार ऋषभ पंत, करु ण नायर, यशस्वी जैस्वालकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती, पण सर्वांची कामगिरी अपुरी ठरली. ल?र्ड्सच्या खेळपट्टीवर इंग्लंडनी आपल्या अनुभवाचा आणि परिस्थितीचा पुरेपूर फायदा घेतला आणि विजय मिळवला.

## महायुतीचे मंत्री नागडे फिरतायेत

सांगितलेच नाही. पण तुमची यंत्रणा बेडरू मपर्यंत पोखरली गेली आहे असे मला सांगायचे आहे. डिझिटलायझेशन फ्रॉड हा थेट मंत्र्यांच्या घरापर्यंत गेला आहे.

त्यामुळे मंत्रीच सुरक्षित नसतील तर सर्वसामान्यांचे काय हाल असतील? हे सांगणे न बरे. त्यामुळे याची उच्चस्तरीय चौकशी लावून आलेला व्हीडीओ खरा आहे की खोटा आहे, हे तपासण्यासाठी तो न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठवा. त्यावर एसआयटी नेमा. सर्वप्रथम मंत्र्यांना सुरक्षा द्या. त्यानंतर जनतेला सुरक्षा द्या असे माझे २१८ च्या माध्यमातून म्हणणे आहे. या प्रकरणी सभागृहात सविस्तर चर्चा घ्यावी. मंत्र्यांच्या सुरक्षेवर अडीच तासांची चर्चा ठेवा. कारण, आज मंत्रीच सुरक्षित नसतील तर सर्वसामान्य जनता काय सुरक्षित राहणार? म्हणून मंत्र्याच्या आपण कोणत्या नियमाखाली आपण हा विषय घेणार याचे रु लिंग द्या, असे अनिल परब सरकारवर निशाणा साधताना म्हणाले.

**चड्डी-टॉवेल गँगचा संबंध कुणाशी?**

गत आठवड्यात सत्ताधारी शिवसेनेचे बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांचा एक व्हीडीओ व्हायरल झाला होता. त्यात ते आमदार निवासातील कॅन्टीनच्या एका कर्मचा-याला मारहाण करताना दिसून आले होते. या कॅन्टीनमधून आपल्याला शिळे अन्न मिळाल्याचा आरोप त्यांनी केला होता. विशेष म्हणजे आमदार गायकवाड सदर कर्मचा-याला मारहाण करत होते, तेव्हा त्यांच्या अंगावर बनियन व टॉवेल होती. त्यामुळे अनिल परब यांनी त्यांच्या या पेहरावाचा दाखला देत विधान परिषदेत बोलत होते.

**संजय शिरसाट यांचे प्रकरण काय?**

राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचाही एक व्हीडीओ गत आठवड्यात व्हायरल झाला होता. त्यात ते आपल्या खोलीत कॉटवर सिगारेट ओढत बसल्याचे दिसून येत आहेत. यावेळी त्यांच्या अंगावर बनियन व चड्डीच होती. तसेच त्यांच्या शेजारी एक पैशांचे बंडल असणारी बॅगही पडलेली होती. अनिल परब यांनी या दोन्ही नेत्यांचा दाखला देत सरकारला त्यांना कपडे घेउन देण्याची मागणी केली.

## सिगारेटसारखा इशारा आता

आली आहे. लोकांना नाश्त्यातील पदार्थांमध्ये साखर, तेलाचे प्रमाण किती आहे याची माहिती देणे बंधनकारक आहे. या पदार्थांच्या यादीत लाडूपासून वडापाव, भजी यासह अनेक खाद्याचा समावेश आहे. लवकरच कॅफे आणि सार्वजनिक ठिकाणी अशाप्रकारे इशारा देणारे फलक लावण्यात येणार आहेत. साखर आणि फॅट्स हे नवीन तंबाखूजन्य पदार्थ आहेत त्यामुळे आपण काय खातोय हे जाणून घेण्याचा अधिकार लोकांना आहे असं नागपूरचे कार्डियोल ?जिकल सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष अमर अमाले यांनी म्हटलं.दरम्यान, २०५० पर्यंत ४४.९ कोटी भारतीय अधिक वजन आणि लठ्ठपणाचे बळी ठरतील असा अंदाज आहे. यात अमेरिकेनंतर भारताचा नंबर येतो. सरकारचा प्लॅन या जेवणावर बंदी आणण्याचा नाही. परंतु जर लोकांना गुलाब जाममध्ये ५ चमचे साखर आहे हे माहिती झाले तर कदाचित ते दुस-यांदा खाताना दोनदा विचार करतील असं डायबीटोल ?जिस्ट सुनील गुप्ता यांनी सांगितले.

## मोदी सरकार सुप्रीम कोर्टात

त्यांचे पती मुलीसह भारतात परतले. मात्र, निमिषा तिथेच राहिल्या. होत्या.काही कालावधीनंतर निमिषा यांनी येमेनी नागरिकासोबत तिथे नर्सिंग होम सुरू करण्यासाठी भागिदारी केली. निमिषा यांच्या म्हणण्यानुसार, संबंधित व्यक्ती आपला शारीरिक छळ करायची. त्याने आपला पासपोर्ट घेतला होता. आपला पासपोर्ट मिळवून स्वतःचा बचाव करण्यासाठी संबंधित व्यक्तीला गुंगीचे औषध दिले. पण ओव्हरडोस झाल्याने त्या व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे निमिषा प्रिया यांचे म्हणणे आहे.

## सुवर्ण मंदिर RDX ने

च्क्रध्व के मुख्य सचिव कुलवंत सिंह मनण यांनी याची पुष्टी केली आहे. तसेच, कोतवाली पोलीस स्टेशन आणि अमृतसर पोलीस आयुक्तांनाही यासंदर्भात माहिती देण्यात आली आहे, असेही मनण यांनी सांगितले.

यासंदर्भात बोलताना, एसजीपीसीचे प्रमुख हरजिंदर सिंग धामी म्हणाले, संबंधित प्रकरणाचा तपास सुरू करण्यात आला आहे. सुरु वातीच्या तपासानुसार, कुणीतरी जाणूनबुजून दहशत पसरवण्यासाठी अशा प्रकारचा ईमेल केला असल्याची शक्यता आहे.

***धमकीच्या पार्श्वभूमीवर, सुरक्षा संस्था पूर्णपणे सतर्क -*** मात्र, धमकीच्या पार्श्वभूमीवर, अमृतसर पोलीस आणि इतर सुरक्षा संस्था पूर्णपणे सतर्क झाल्या आहेत. सुवर्ण मंदिर आणि आसपासच्या परिसरात सीसीटीव्ही निगराणी वाढवण्यात आली आहे. याशिवाय भाविक आणि पर्यटकांचे सखोल स्कॅनिंग केले जात आहे. अधिका-यांनी सर्वसामान्य नागरीक आणि भाविकांना शांतता राखण्याचे आणि कोणत्याही संशयास्पद हालचाली आढळल्यास त्वरित माहिती देण्याचे आवाहन केले आहे.

## सत्ताधारी पक्षाच्या आमदारांसाठी

असेल तर या धोरणाला आमचा विरोध असणार आहे. राज्याचे जनजीवन या धोरणामुळे विस्कळीत होउ शकते याकडेही दानवे यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

***रु ग्णवाहिकांमध्ये ऊसनवारीवर डिझेल..*** १०२ रु ग्णवाहिका गर्भवती महिला, लहान बालके आणि गंभीर घटनेच्या वेळेस सुविधा देणारी व्यवस्था आहे. केंद्र सरकारचे अनुदान न मिळाल्यामुळे या सुविधांची देयके रखडले गेल्याचे शासनाचे म्हणणे अत्यंत खेदजनक आहे. गावोगावी ऊसनवारी पद्धतीने या रु ग्णवाहिकांमध्ये डिझेल भरले जात आहे. राज्य सरकारची आर्थिक स्थिती इतकी गंभीर झाली आहे का? केंद्र सरकारचा निधी आला नाहीतर ही योजना चालणार नाही का? आणि राज्य राज्य सरकार या योजनेसाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून देणार का? अशी विचारणा दानवे यांनी सभागृहात केली.

***सरकारचे अभिनंदन..*** अखंड हिंदुस्थानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्य आणि पराक्रमाचे साक्षीदार १२ गड किल्ल्यांचा युनोस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये समावेश करण्यात आला आहे. यासाठी केंद्र व राज्य सरकारचे अभिनंदन. या गड किल्ल्यांचा समावेश जागतिक वारसा स्थळांमध्ये झाल्याने आपली जबाबदारी वाढली आहे. फक्त मोठ्या निधीची घोषणा करून चालणार नाही तर कायमस्वरू पी उपायोजना करणे आवश्यक आहेत. गडकिल्ल्यांच्या देखभालीसाठी आवश्यक कर्मचारी आणि इतर व्यवस्थांची निर्मिती करणेही तितकेच गरजेचे असल्याचे अंबादास दानवे म्हणाले.

## शेतकऱ्यांच्या कर्जमुक्ती लढ्याची

सरकार आंधळ्याचं सोंग घेतंय!' 'येत्या २४ जुलैला संपूर्ण महाराष्ट्रात चक्काजाम आंदोलन करण्यात येईल,' असा तीव्र इशारा बच्चू कडू यांनी दिला आहे.

**महामार्ग ठप्प, ट्रॅक्टरचा महासागरः** नागपूर–कोल्हापूर राज्य महामार्गावर ३ तासांहून अधिक काळ शेतकऱ्यांनी चक्काजाम केला. शेकडो ट्रॅक्टर घेऊन शेतकरी मोर्चात सहभागी झाले होते. काहींनी लाटा, काटा, रुमणे घेऊन शासनाच्या लुटीचा हिशोब मागण्यासाठी मैदानात प्रवेश केला. सभेनंतर शासनाने हालचाली सुरू केल्या असल्या, तरी शेतकऱ्यांच्या डोळ्यातली आग आणि रस्त्यावरचा रणसंग्राम हे स्पष्टपणे सांगतात की 'हे आंदोलन आता थांबणार नाही, हे आंदोलन फक्त मागणीसाठी नाही, हे आहे स्वाभिमानासाठी!' 'सातबारा कोरा' ही आता घोषणा उरलेली नाही – ती जनतेची मागणी आणि शासनासाठी आव्हान बनली आहे. २४ जुलैचा चक्काजाम महाराष्ट्राच्या राजकारणाला हादरा देणार, यात शंका नाही. या लढ्याला शब्द नको – कृती हवी! शेतकरी उठला आहे, आता सरकारनेही जागं व्हायला हवं! अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

## इलेक्ट्रिक सिमेंटचे पोल घेऊन जाणारा

मोर्शी येथे भरती करण्यात आले. जखमींवर उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्रथमोपचार करून जखमीपैकी सचिन धनु लोखंडे,रोशन शामराव धारवाडे,रोशन लंगडाजी कासदेकर,अनिल महेश जानवंशी यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात रवाना करण्यात आले. दीपक गणेश भोकरे यांना किरकोळ मार असल्याने त्यांचा उपचार उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे सुरू आहे.या भीषण अपघातात जखमींना तानाजी बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष राहुल पंडागरे, रवी परतेती,स्वप्निल फुके व आष्टगाव येथील ग्रामवासी यांची मदत मिळाली.मोर्शीचे ठाणेदार सुरज बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शिवराज पवार,सचिन भाकरे व त्यांची पोलीस अधिनस्त चमू यांनी घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा आटोपला.पुढील तपास मोर्शी पोलीस करीत आहे.

## फेक वेडिंग'च्या नावाखाली

संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सहायक पोलिस निरीक्षक महेश इंगोले, पोलिस उपनिरीक्षक संजय वानखडे, महेंद्र येवतीकर, दीपक सुंदरकर, गजानन ढेवले, आस्तीक देशमुख, मनोज ठोसर, संग्राम भोजने, मंगेश शिंदे, योगेश पवार, राजीक रायलीवाले, विशाल वाकपांजर, सागर ठाकरे, चेतन कराळे, संदीप खंडारे, राहुल दुधे, चेतन शर्मा, राजापेठ येथील महिला अंमलदार सुचित्रा यावले, पूजा चंदनपत्रे यांनी केली.

## सुंदरलाल चौकात आढळला

तिला जमिनीवर रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला. तिने तत्काळ पोलिसांना याची माहिती दिली. फ्रेजरपुरा पोलिसांनी घटनास्थळावर पोहोचून पंचनामा केला आणि मृतदेह पोस्टमार्टम साठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवला. पुढील तपास पोलीस करत आहेत.

## अचलपूर तालुक्यात प्रभाग रचना

रामापूर बेलज.

धोतरखेडा - गौरखेडा, धोतरखेडा, वडगांव फ, दर्याबाद, सावळी दातुरा, वडगांव फ, खांजमानगर, हरम, भीलोना, चमक बु, चमक खुर्द, नायगांव..

पथ्रोट- परसापूर, कासमपूर, उपातखेडा, रामापूर बु, वाघाडोह, जवळापूर , पथ्रोट.

शिंदी बु - शिंदी बु, काकडा, तुळजापूर जहाँ, टवलार, रासेगांव, कोल्हा, येवता, कुष्ठा बु, कुष्ठा खुर्द, इर्सापूर, वडनेर भुजंग, बळेगांव, चौसाळा.

असदपूर - बोरगांव दोरी, वासनी बू, वासनी खुर्द, दोनोडा, निजामपूर, खैरी, बोर्डी, सावली बु, बोपापूर, बोरगांव पेठ ,असदपूर शहापूर, निंभारी, सावळापूर, येसुर्णा, येलकी, हिवरापूर्णा.

**पंचायत समिती सर्कल निहाय ग्रा.पं. यादी -**

धामणगाव गढी - धामणगांव गढी, खरपी,निमदरी, वझझर ,पिंपळखुटा, देवगांव, हनवतखेडा, एकलासपूर.

खरपी सर्कल - खरपी, पांढरी, म्हसोना,मल्हारा, मालेपूर, निमकुंड, कोठारा, बेलखेडा.

कांडली- कांडली.

कविठा बू - कविठा बु, अंबाडा, घोडगांव, खेलदेवमाली, नारायणपूर, अवहीं, भूगांव, रामापूर बेलज.

धोतरखेडा - गौरखेडा, धोतरखेडा, दर्याबाद, सावळी दातुरा.

वडगांव फ - खांजमानगर, हरम, भीलोना, चमक बु, चमक खुर्द, नायगांव.

परसापूर -परसापूर ,कासमपूर, उपातखेडा, रामापूर बु, वाघाडोह, जवळापूर .

पथ्रोट - पथ्रोट.

शिंदी बु - शिंदी बु, काकडा, तुळजापूर जहाँ, टवलार.

रासेगांव- कोल्हा, येवता, कुष्ठा बु, कुष्ठा खुर्द, इर्सापूर, वडनेर भुजंग, बळेगांव, चौसाळा.

बोपापुर- बोरगांव दोरी, वासनी बू, वासनी खुर्द, दोनोडा, निजामपूर, खैरी, बोर्डी, सावली बु, बोपापूर, बोरगांव पेठ.

असदपूर - असदपूर ,शहापूर, निंभारी, सावळापूर, येसुर्णा, येलकी, हिवरापूर्णा.

## मार्की-वातोंडा पुलावर निकृष्ट

डांबराचे हातांनीच पोपळेच्या पोपळे निघत असल्याचा आरोप केला. त्यामुळे निकृष्ट झालेल्या या रस्त्याचे पितळ पहिल्याच पावसात उघडे पडल्याचे चित्र आहे.

ग्राम पंचायतने रस्त्यावरील पुलाच्या कामात भ्रष्टाचार झालेल्या कामाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली असून दोषींवर कारवाई करण्याची मागणी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

रस्त्याचे काम सुरवातीपासूनच निकृष्ठ होत असल्याचा आरोप होत असतांनाही संबंधित अधिकारी व लोकप्रतिनिधींनी सदर ठेकेदाराला पाठिशी घालून प्रवाशी व वाहनधारकांच्या जिवाशी खेळ चालवित निकृष्ठ कामाकडे दुर्लक्ष केले. पुल कामात भ्रष्टाचार झाल्याचा एक मुखी ग्रामस्थांमधून सूर निघत असून पुल असुरक्षित झाला आहे. तेव्हा संबंधित अधिकारी व लोकप्रतिनिधी हा प्रकार किती गांभीर्याने घेतात? किंवा मोठ्या दुर्घटनेची भविष्यात वाट बघतात? हे बघावे लागणार आहे.

## विभागीय लोकशाही दिनात

लहाने, उपायुक्त संतोष कवडे, राजीव फडके, सहाय्यक पोलीस आयुक्त पंकज कुमावत, तहसीलदार प्रज्ञा काकडे यांच्यासह महसूल, पोलीस, महापालिका, सहकार, कृषी, जलसंधारण व ऊर्जा विभागाचे अधिकारी तसेच पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व अधिकारी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून यावेळी बैठकीला उपस्थित होते.

यावेळी विभागीय लोकशाही दिनात दाखल एकूण १६ प्रकरणांवर चर्चा करण्यात आली. सदर दाखल प्रकरणांवर पंधरा दिवसांत आवश्यक कार्यवाही करुन अंतीम

अहवाल सादर करण्याच्या सूचना सिंघल यांनी संबंधित विभाग प्रमुखांना केल्या.

विभागीय लोकशाही दिनासाठी सामान्य प्रशासन विभागाव्दारे ३ स्वीकृत अर्ज, १० अस्वीकृत अर्ज (सामान्य तक्रारी) तसेच ३ प्रकरणे वेळेवर दाखल झालीत. यात एक प्रकरण महिला लोकशाही दिन अंतर्गत समाविष्ट होते, असे एकूण १६ प्रकरणांवर चर्चा करण्यात आली असून ही प्रकरणे तत्काळ निकाली काढण्यासाठी संबंधित विभागांनी स्थळ पाहणी, मुद्देनिहाय चौकशी, पडताळणी करुन सुस्पष्ट अंतीम अहवाल तत्काळ सादर करावा, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी यावेळी दिले. लोकशाही दिनासाठी अमरावती विभागातून उपस्थित राहिलेल्या तक्रारदारांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. मागील लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनात सुनावणीसाठी येवू नये. न्यायप्रविष्ट किंवा अर्धन्यायिक प्रकरणांसंदर्भात तत्काळ अहवाल सादर करण्यात यावा. लोकशाही दिनासाठी दाखल होणाऱ्या तक्रार अर्जांवर वेळेत कार्यवाही होण्यासाठी संबंधित विभागाने जबाबदारीपूर्वक प्रयत्न करावे, अशा सूचना विभागीय आयुक्त सिंघल यांनी यावेळी केल्या.

## ४३ गोवंशांची अवैध तस्करी करणा-या

जनावरांना चारा पाण्यासाठी केकतपूर येथील गौरक्षणमध्ये नेण्यात आले. जनावरांना खाली काढत असतांना त्यातील ९ जनावरे दगावल्याचे निष्पन्न झाले.पोलिसांनी मिळालेल्या आरोपीला आपले नाव विचारले असता सिद्दिकी रईस खान व इसुफ कुरेशी आरिफ कुरेशी रा.मध्यप्रदेश असे सांगितले.

महाराष्ट्र शासनाने गोवंश हत्याबंदीचा कायदा अमलात आणला असतांना सुद्धा कायद्याला धाब्यावर बसवून मध्यप्रदेश येथून गोवशांची मोठ्या प्रमाणात अवैध वाहतूक सुरू असल्याचा संताप गोरक्षकांनी व्यक्त केला.मध्यप्रदेश येथून छुप्या मार्गाने गोवंशांना कत्तलीसाठी नेत असून शासनाने गोवंशांच्या होणाऱ्या अवैध तस्करीवर वेगळा कायदा अमलात आणून आरोपीविरुद्ध कठोरात कठोर कार्यवाही करण्यात यावी.अशी मागणी गोरक्षकांनी केली आहे.याप्रकरणी मोर्शीचे ठाणेदार सुरज बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर वाहन चालकांविरुद्ध गोवंश प्रतिबंधक कायद्याअन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरची कारवाई पोलीस अधिक्षक विशाल आनंद,अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सुरज बोंडे यांचे नेतृत्वात पो.स्टे.मोर्शी येथील पोउपनी आकाश शिवणकर,तुषार चव्हाण,पो.कॉ.छत्रपती करपते,स्वप्नील बायस्कर,अथर्व कोहळे यांनी केली आहे.

## हिवरखेड येथील युवकाचे प्रेत

मृतकाचा भाऊ धनराज हा मोर्शी पोलिसांसोबत माळू नदीवर जाऊन तेथे बचाव पथकाच्या मदतीने प्रेत बाहेर काढण्यात आले.सदरचे प्रेत हे दिलीप शंकर नागले (वय २८) याचे असल्याचे निष्पन्न झाले. लगेच मोर्शी पोलिसांनी मृतक दिलीपचे प्रेत उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे शवविच्छेदनाकरिता रवाना केले. उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मृतकाचे शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात दिले. याप्रकरणी मोर्शी पोलिसांनी मर्ग गुन्हा दाखल करून सदर युवकाची आत्महत्या की काय? त्या अनुषंगाने युद्धस्तरावर तपास सुरू केला आहे.

## चाकूहल्ल्यात महिलेचा मृत्यू,

दाखल करण्यात आले आहे. घटनेनंतर आरोपी फरार झाले आहेत. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, चौघांचा शोध सुरू आहे. या घटनेनंतर परिसरात भीतीचं आणि रोषाचं वातावरण आहे. पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला असला, तरी नागरिकांचा संयम सुटू लागला आहे. अमरावतीत एकाच दिवशी दोन खूनाच्या घटना घडल्याने शहरात भीती वाढली आहे.

# जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ मंगळवार, १५ जुलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com

# रोजगार हमी योजनेचा फज्जा : शासनाला कोट्यवधींचा गंडा

## पातूर तालुक्यात वृक्ष लागवडीत मोठा घोळ : संबंधित अधिकाऱ्यांचे पाठबळ?

■ नासीर शेख ■

**खेट्री : पातूर तालुक्यात ग्रामीण भागांतील रोजगार हमी योजनेचा फज्जा उडाल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. वृक्ष लागवडीच्या नावावर कंत्राटदारांकडून शासनाला कोट्यवधी रुपयांचा गंडा घालण्याचा प्रकार सुरू आहे. विशेष म्हणजे, या सगळ्या गैरप्रकाराला काही संबंधित अधिकाऱ्यांचेही पाठबळ असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.**






गावागावांत कागदोपत्री वृक्ष लागवड दाखवून रोजगार हमी योजनेतील मजुरांच्या नावावर मोठ्या प्रमाणावर देयके काढली जात आहेत. प्रत्यक्षात मात्र अनेक ठिकाणी वृक्ष लागवडीचा मागमूसही नाही. ग्रामस्थांनी वेळोवेळी तक्रारी करूनही संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत, उलट भ्रष्टाचार करणाऱ्यांना अभय दिले जात असल्याची नागरिकांची तीव्र भावना आहे. रोजगार हमी योजनेचा उद्देश रोजगार देणे आहे, पण भ्रष्ट यंत्रणेमुळे योजनेचाच गैरफायदा घेतला जात आहे – याकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची वेळ आली आहे.

कंत्राटी पद्धतीने सुरू असलेली वृक्ष लागवड मोहीम तालुक्यात वृक्ष लागवडीचे काम कंत्राटी पद्धतीने दिले जाते. कंत्राटदार व अधिकाऱ्यांची मिलीभगत होऊन केवळ कागदोपत्री वृक्ष लागवड दाखवून मजुरांच्या नावावर देयक उचलली जात आहेत. या मोहिमेत प्रत्यक्ष कार्यरत मजुरांचे शोषण होत असून, योजनेचा मूळ उद्देश हरवत चालला आहे.

**अभियंतेच गायब, मग देखरेख कोण करतं?**

रोजगार हमी योजनेचे अभियंतेच वृक्ष संगोपनासाठी वेळोवेळी पाहणीस जात नसल्याने गैरव्यवहाराला चालना मिळत आहे. प्रत्यक्ष भेट न देता केवळ कागदोपत्री निरीक्षण दाखवून खानापूरती जबाबदारी पूर्ण केली जाते, परिणामी घोळ थांबत नाही.

**वृक्ष वाढत नाहीत, पण देयकं मात्र वाढतात!**

वर्षानुवर्षे वृक्ष संगोपनाच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची देयकं उचलली गेली. मात्र झाडे पाच फूटांवरच अडकली आहेत. अशी परिस्थिती असतानाही संगोपनासाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च झाला आहे. यावरून वृक्ष वाढीच्या आधारावर देयकं निश्चित करण्यात आली होती का? यावर संशय व्यक्त केला जात असून सखोल चौकशीची गरज आहे.

**चौकशीसाठी समिती गठित करण्याची मागणी**

संपूर्ण प्रकरणाची केवळ थातूरमातूर चौकशी करून प्रकरण दडपले जाते. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी या गंभीर प्रकरणाची स्वतंत्र समिती मार्फत सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी वृक्षप्रेमी व सजग नागरिकांकडून होत आहे.

## जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका: प्रारूप प्रभाग रचनेबाबत हरकती/सूचना मागवल्या

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ४५) च्या कलम ९२ पोट-कलम (१) अन्वये वाशिम जिल्ह्यातील आगामी सार्वत्रिक निवडणुकांसाठीच्या जिल्हा परिषद क्षेत्रांतील निवडणूक विभागांची व कलम ५८ (१) (अ) अन्वये पंचायत समित्यांमधील निवडणूक गणांच्या प्रारूप प्रभाग रचनेबाबत राज्य शासनाने प्राधिकृत केलेले अधिकारी जिल्हाधिकारी, वाशिम यांच्या क्रमांक २०२५/जि.प.नि./कावी- ४१९ दिनांक १४/०७/२०२५ च्या आदेशानुसार अधिसूचना जाहीर करण्यात आली आहे. या अधिसूचनेद्वारे प्रारूप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना मागवण्यात आल्या आहेत.

याबाबतची माहिती जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस. यांनी दिली आहे. अधिसूचनेनुसार, प्रारूप प्रभाग रचना पुढील ठिकाणी प्रसिद्ध करण्यात आली आहे:

(१) जिल्हाधिकारी, वाशिम यांचे कार्यालयातील फलकावर. (२) जिल्हा परिषद, वाशिम यांचे कार्यालयातील फलकावर. (३) तहसीलदार, कारंजा, मानोरा, मंगरुळपीर, मालेगाव, रिसोड व वाशिम यांचे कार्यालयातील फलकावर. (४) पंचायत समिती, कारंजा, मानोरा, मंगरुळपीर, मालेगाव, रिसोड व वाशिम यांचे कार्यालयातील फलकावर. या आदेशाच्या मसुद्यावर कुणाचीही हरकत किंवा सूचना असल्यास त्यासंबंधीची सविस्तर लेखी निवेदने किंवा हरकती जिल्हाधिकारी, वाशिम यांच्याकडे दिनांक २१ जुलै पर्यंत सादर कराव्यात. उपरोक्त तारखेनंतर जिल्हाधिकारी, वाशिम यांच्याकडे आलेली कोणतीही निवेदने, हरकती किंवा सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. नागरिकांनी या प्रारूप प्रभाग रचनेचे अवलोकन करून, आवश्यकतेनुसार आपल्या हरकती किंवा सूचना वेळेत सादर कराव्यात, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## सामाजिक उपक्रम पंधरवाडा २०२५ चे आयोजन



■ प्रतिनिधी | कारंजा ■

दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट,अमरावती द्वारा संचालित कमलप्रकाश फार्मसी कॉलेज अँण्ड रिसर्च सेंटर,खेर्डा येथे संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा आईसाहेब डॉ.कमलताई रा.गवई यांचा वाढदिवस व डॉ.वा.पु.राऊत यांची जयंती तथा संस्थेचे श्रद्धास्थान स्मृतीशेष श्री.दादासाहेब गवई यांच्या स्मृती दिनाचे औचित्य साधून दि.११ जुलै २०२५ ते २५ जुलै २०२५ पर्यंत सामाजिक उपक्रम पंधरवाडा २०२५ आयोजित करण्यात आला. या उपक्रमाच्या चौथ्या दिवशी सोमवार,दि.१४ जुलै २०२५ ला विद्यार्थी व कर्मचाऱ्यांमध्ये आत्मनियंत्रण, मनःशांती आणि सकारात्मक विचारांचा विकास व्हावा यासाठी ध्यानसाधना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.प्रा.पुनम अवघाते यांनी सांगितले की,ध्यान हे एक शक्तिशाली साधन असून त्याद्वारे आत्मिक व मानसिक स्वास्थ्य साधता येते. प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांचा मोठ्या संख्येने सहभाग होता.

## सर्व परमिट रूम धारकांचा एकदिवसीय बंद आणि धरणे आंदोलन!

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राज्य शासनानेपरमिट रूम व्यवसायांवर लागू केलेल्या १०ℨ व्हॅट करात वाढ आणि तब्बल १५०ℨ पर्यंत वाढवलेली उत्पादन शुल्क (एक्साईज ड्युटी) यामुळे वाशिम जिल्ह्यातील परमिट रूम व्यवसाय संकटात सापडले आहेत. या निर्णयाच्या निषेधार्थ 'वाशिम जिल्हा बार' लिकर्स असोशिएशन' ने १४ जुलै २०२५ रोजी एकदिवसीय परमिट रूम बंद आंदोलन पुकारले होते. यासोबतच त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून शासनाच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त केला.असोशिएशनचे अध्यक्ष भानवत गाभणे (रिसोड) यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी वाशिम यांना याबाबत निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात सांगण्यात आले की, 'पूर्वी केवळ ५ टक्के व्हॅट होता. परंतु, दि. १ नोव्हेंबर २०२३ पासून तो १० टक्के पर्यंत वाढवण्यात आला. याविरोधात याआधीही दि. १६/११/२०२३ रोजी मुकमोर्चा काढून निवेदन देण्यात आले होते. मात्र, शासनाने दुर्लक्ष करत पुन्हा टॅक्स वाढवला, जो आमच्या व्यवसायासाठी मारक ठरत आहे.'



**व्यवसाय बंद, मजूर बेरोजगार होण्याची शक्यता :** परमिट रूम व्यवसाय हा केवळ व्यापाऱ्यांचा नव्हे तर त्यावर अवलंबून असलेल्या हजारो मजूर वर्गाचा रोजगाराचा स्रोत आहे. करांमधील ही प्रचंड वाढ परवडणारी नसून, व्यवसायच बंद करण्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. यामुळे अनेक मजूर बेरोजगार होतील, तसेच अवैध दारू विक्रीला चालना मिळेल व शासनाच्या महसुलालाही मोठा फटका बसेल, असा इशारा संघटनेने दिला.

**असोशिएशनची प्रमुख मागणी :** १. वाढवलेला १० टक्के व्हॅट त्वरित मागे घ्यावा. २. उत्पादन शुल्कातील १५० टक्के वाढ रद्द करण्यात यावी. ३. दरवर्षी १५ टक्के लायसन फीमध्ये केली जाणारी वाढ थांबवावी.

**अधिकाऱ्यांना पाठवलेली प्रत व पुढील इशारा :** हे निवेदन केवळ जिल्हाधिकारी वाशिम यांना नव्हे तर राज्य उत्पादन शुल्क आयुक्त मुंबई, व उत्पादन शुल्क अधीक्षक वाशिम यांनाही पाठविण्यात आले आहे. शासनाने तातडीने योग्य निर्णय न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देखील संघटनेने दिला आहे. या आंदोलनात संघटनेचे अध्यक्ष भागवत गाभणे रिसोड,कार्याध्यक्ष रामदास राउत शेलू बाजार,उपाध्यक्ष रमेश जैस्वाल वाशिम, रामेश्वर सुर्वे कारंजा, सचिव शंकर लक्ष्मणराव इंगोले वाशिम, सहसचिव अतुल जैस्वाल मानोरा,कोषाध्यक्ष भावनवास जिवणानी वाशिम, संघटक प्रमोद ओझा मालेगांव, सदस्य सुरेश राठोड कारंजा,विजय परळीकर आदी सहभागी झाले होते.

## शिर्डी येथील पुजारी प्रशिक्षण शिबिरासाठी साईश्रद्धा संस्थांनला निमंत्रण

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

श्री साईबाबा संस्थान शिर्डीशी सलग्नीत असलेल्या देशभरातील तसेच इतर देशातील साई मंदिरातील पुजाऱ्यंना प्रशिक्षण देण्यासाठी शिर्डी येथे सहा दिवशीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी शेलुबाजार येथील साईश्रद्धा संस्थांनच्या पुजाऱ्यालाही आमंत्रित करण्यात आले आहे या शिबिरासाठी मंदिराचे पुजारी म्हणून काम पाहत असलेले राजू डांगे हे शिर्डी येथे होणाऱ्या पुजारी प्रशिक्षण शिबिरासाठी रविवारी रवाना झाले आहे.

श्री साईबाबांचा आध्यात्मिक प्रकाश भक्तांच्या हृदयात रुजला आणि हळूहळू श्री साईभक्तांच्या संख्येत वाढत होत गेली. त्याचाच परिणाम म्हणून देश-विदेशातही श्री साईबाबांच्या मंदिरांच्या संख्यामध्ये



प्रचंड वाढ झालेली आहे. आज प्रत्येक कोपरा हा श्री साईबाबांनी व्यापला आहे. या सर्व मंदिरांमध्ये व साईभक्तांमध्ये राबविलेल्या पद्धती आणि प्रणाली यामध्ये एकसुत्रीपणाचे अनुसरण असणे आवश्यक आहे. याकरिता देशभरात पसरलेल्या मंदिरांच्या पुजाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची साईभक्तांची मागणी लक्षात घेऊन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे वतीने या पुजाऱ्याऱ्यांना प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

## देवानंद वानखेडे यांचा १७ जुलैपासून अन्नत्याग आंदोलनाचा इशारा



■ प्रतिनिधी | रिसोड ■

तालुक्यातील अंचळ गावात असलेल्या स्मशानभूमीच्या अत्यंत वाईट अवस्थेमुळे ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. सदर स्मशानभूमीची स्थिती इतकी दयनीय आहे की, मृत व्यक्तींच्या अंत्यविधी दरम्यान कुटुंबीयांना मरणानंतरसुद्धा मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. विशेषतः सध्या सुरू असलेल्या पावसाळ्यात परिस्थिती अधिकच बिकट झाली असून, अंत्यविधीसाठी नेणारा रस्ताही चिखलाने भरून गेलेला असतो.

गावकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, स्मशानभूमीकडे जाण्यासाठी कोणतीही नीट रस्ता व्यवस्था नाही. पावसाच्या पाण्याने संपूर्ण परिसर चिखलात बदलतो. याशिवाय, रात्रीच्या वेळी विजेची कोणतीही सुविधा नसल्याने अंधारात अंत्यविधी पार पाडण्याची वेळ येते. स्मशानभूमीमध्ये काटेरी झुडपांचे साम्राज्य झाले असून, बसण्यासाठी कोणतीही व्यवस्था नाही. स्मशानभूमीची जमीन पूर्णपणे उतार व चढावयुक्त असल्याने भू-सपाटीकरण आवश्यक झाले आहे. त्याचप्रमाणे, स्मशानभूमीला लागून नदी वाहत असल्यामुळे पावसात पुराचे पाणी थेट अंत्यविधीच्या ठिकाणी शिरते, त्यामुळे शववहातूक व विधी करताना मोठी अडचण निर्माण होते.

या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अंचळ गावातील सामाजिक कार्यकर्ते देवानंद वानखेडे यांनी वेळोवेळी ग्रामपंचायत विभागाशी संपर्क साधला. त्यांनी यासंदर्भात पत्रव्यवहार देखील केला.

## गुणवंत मागासवर्गीय वसतीगृहात प्रवेशासाठी २३ जुलै पर्यंत ऑनलाईन अर्ज करावे

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत वाशिम येथील गुणवंत मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, चिखली रोड, नालंदा नगर, वाशिम येथे सन २०२५-२६ या शैक्षणिक सत्रासाठी एकूण ५९ रिक्त जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. या प्रवेशासाठी जात व प्रवर्गनिहाय आरक्षणानुसार गुणवत्ता यादीनुसार ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. मे २०२५ मध्ये १० वी परीक्षा उत्तीर्ण केलेले आणि वाशिम शहरातील महाविद्यालयात ११ वी किंवा आयटीआय / पॉलीटेक्नीकच्या पहिल्या वर्षात प्रवेश घेतलेले विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र आहेत.

## 'आईच्या कुशीत परतलेला शूरवीर पुत्र' ३५ वर्षांची देशसेवा करून परतलेल्या जवानाचं मालेगावात जल्लोषात स्वागत

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

तीन दशकांहून अधिक काळ देशाच्या सीमांवर तैनात राहून अनेक संकटांना छाती देणारा, रणभूमीवर अडथळ्यांना न जुमानणारा, ३५ वर्षांची अखंड देशसेवा बजावणारा अनिल सुदामा चक्रनारायण जेव्हा आपल्या जन्मगावी परतले... तेव्हा मालेगावच्या रस्त्यांवर गजर झाला, फुलांचा वर्षाव झाला, आणि आईच्या कुशीत परतलेल्या शूर पुत्राला साऱ्या गावाने डोळ्यांत आनंदाश्रू ठेवून वंदन केलं.जन्मभूमी आणि कर्मभूमीचा संगम यापेक्षा भावनिक क्षण कोणता असेल?त्यांच्या सेवानिवृत्तीचा दिवस – १ जुलै २०२५. त्रिपुरा येथून ते शेवटचं कर्तव्य पूर्ण करून मालेगावात पोहचले. १३ जुलै रोजी त्यांच्या स्वागतासाठी सारा मालेगाव शहर एकवटलं होतं. डॉ. बाबासाहेब



आंबेडकर चौक ते सत्य साई ग्रामीण सेवा केंद्र पर्यंत त्यांची मिरवणूक निघाली. ढोल-ताशा, बँड, फुलांचा वर्षाव, जयघोष, आणि रस्त्यावर उभे असलेले शेकडो नागरिक... एक विजयी शिलेदार आपल्या मावळ्यांमध्ये परतल्याची साक्ष देत होते.त्यांची आई आणि पत्नी देखील सोबत होती... ज्यांनी प्रत्येक बदलीच्या वेळी मनात शंका, डोळ्यात पाणी आणि ओठांवर प्रार्थना ठेवली होती. त्यांचाही ही सत्कार झाल्याने उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले.

१९९० मध्ये भारतीय सैन्यात भरती झाल्यानंतर अनिल चक्रनारायण यांनी राजस्थान, जम्मू-काश्मीर, अनंतनाग, पंजाब, आसाम, मेघालय, त्रिपुरा यांसारख्या संकटग्रस्त सीमांवर देशसेवा केली. एलं घ्हेजमूदे पदापर्यंतच्या प्रवासात त्यांनी अनेक अडचणींना सामोरं जात आपलं कर्तव्य बजावलं.माजी सैनिक लीलाधर चक्रनारायण यांनी त्यांच्या जीवनप्रवासाची माहिती देताना सांगितले की, 'अनिल यांनी फक्त बंदुका चालवल्या नाहीत, तर प्रत्येक सैनिकाच्या हृदयात देशभक्तीचा दीप पेटवला.'कार्यक्रमाची सुरुवात बौद्धाचार्य ज्ञानबा वानखडे यांच्या त्रिशरण पंचशील वंदनेने झाली. उपस्थित मान्यवरांनी पुष्पहार, भेटवस्तू देऊन त्यांचा सपत्नीक सत्कार केला.

## मुलीच्या आत्महत्येमागे वारंवार त्रास, धमकी आणि जातीवाचक शिवीगाळ? तिघांविरुद्ध गुन्हा दाखल!

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील एका अल्पवयीन मुलीने गळफास लावून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. प्राथमिक माहितीनुसार, सदर मुलीवर तिघा व्यक्तींकडून सातत्याने मानसिक त्रास दिला जात होता, तसेच बोलण्यासाठी जबरदस्ती आणि धमक्या दिल्या जात होत्या. याच त्रासाला कंटाळून तिने आत्महत्येचे पाऊल उचलल्याचा आरोप वडिलांनी आपल्या जबानी तक्रारीत केला आहे.

मयत अल्पवयीन मुलगी आपल्या कुटुंबासह राहत होती. तिचे वडील यांनी दिलेल्या माहितीनुसार, दस्तापूर येथील अमोल टोणे, आतिष चवरे आणि एक अजून अनोळखी इसम हे तिघे गेल्या सहा महिन्यांपासून गावात येऊन सतत पीडितेला त्रास देत होते. 'आमच्यासोबत बोलत जा, नाहीतर तुझ्या घरच्यांना मारून टाकू,' अशी धमकी दिली जात होती. तसेच तिघे मिळून जातीवाचक शिवीगाळ करत असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. १२ जुलै २०२५ रोजी दुपारी पीडिता घरी एकटी असताना सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास तिच्या वडिलांनी घरी परत येताच तिला घरात नाईलॉनच्या दोरीने गळफास लावलेल्या अवस्थेत पाहिले. तातडीने तिला मंगरुळपीर येथील शासकीय दवाखान्यात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासून तिला मृत घोषित केले.या घटनेनंतर वडिलाने मंगरुळपीर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, वरील तिघांविरोधात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (ॅन्ए), बालकांचे लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (इ्ध्णएध) २०१२, तसेच अनुसूचित जाती

## फसव्या घोषणा करणाऱ्या सरकारला अधिवेशनात जाब विचारणार : आ. साजिद पठाण

### मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थ्यांचे आझाद मैदानावर छत्री आंदोलन : कायमस्वरूपी रोजगाराची मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत सहा महिन्यांच्या कालावधीसाठी राज्यातील विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये नियुक्त करण्यात आलेल्या बेरोजगार युवक-युवतींचा प्रशिक्षण कालावधी आता संपत आला असून, या प्रशिक्षणार्थ्यांमध्ये पुढील भवितव्याबाबत अस्वस्थता निर्माण झाली आहे. 'आम्हाला प्रशिक्षण नको, आता कायमस्वरूपी रोजगार द्या' असा जोरदार आवाज देत राज्यभरातील हजारो प्रशिक्षणार्थीनी आज मुंबईतील आझाद मैदानावर छत्री आंदोलन केले.

अतिवृष्टीच्या परिस्थितीत देखील प्रचंड संख्येने उपस्थित राहून आंदोलनकर्त्यांनी सरकारचे लक्ष वेधले. या आंदोलनाला काँग्रेस पक्षाच्या आमदारांनी भरघोस पाठिंबा दिला. अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान



पठाण यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन आंदोलनकर्त्यांना आश्वस्त केले की, 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील सर्व प्रशिक्षणार्थ्यांचा प्रश्न पावसाळी अधिवेशनात प्रभावीपणे मांडून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी काँग्रेस पक्ष खंबीरपणे त्यांच्यासोबत उभा राहील.'

या आंदोलनात सरकारवर तीव्र शब्दांत टीका करताना आमदार पठाण म्हणाले की, 'महायुती सरकारने केवळ निवडणूकपूर्व मतांसाठी बेरोजगार युवक-युवतींचा वापर केला असून, आता त्यांना दुर्लक्षित केले जात आहे. हे केवळ आश्वासनाचे नाटक असून, सरकारने बेरोजगारांच्या भावनांशी विश्वासघात केला आहे. या फसव्या सरकारला सत्तेवरून खाली खेचण्यासाठी सर्वांनी एकत्र यावे.'

आंदोलनात युवा कार्य प्रशिक्षणार्थ्यांचे प्रमुख नेते माजी खासदार हरिभाऊ राठोड, बालाजी पाटील चाकूरकर, हभप श्री संत तुकाराम बाबा महाराज, अनुप चव्हाण, प्रकाश साबळे यांसह गुड्डू पठाण, मो. मोईन उर्फ मंटूभाई, रिजवान खान, खिजर नवाब आणि महाराष्ट्रभरातून आलेले हजारो प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते.

प्रशिक्षणाऐवजी आता स्थिर व कायमस्वरूपी रोजगाराची मागणी करत हे आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता असून, सरकारने तातडीने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी जोरदार मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक २३० ■ मंगळवार १५ जुलै २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


# छत्रपती शिवाजी महाराजांची दुर्गसंपदा महाराष्ट्राच्या शौर्याचा वारसा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केले महाराष्ट्राचे अभिनंदन

**मुंबई जनमाध्यम :** महाराष्ट्रातील रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, स्वर्णदुर्ग, विजयदुर्ग, खान्देरी हे ११ किल्ले आणि तमिळनाडूतील जिंजी असे एकूण १२ किल्ले जागतिक वारसा म्हणून घोषित करण्यात आले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी घडवलेली ही दुर्ग संपदा ही महाराष्ट्राच्या शौर्याचा आणि सांस्कृतिक वारसा आहे. या ऐतिहासिक किल्ल्यांचा युनोस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश होणे, ही संपूर्ण महाराष्ट्र आणि देशासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत निवेदन करताना काढले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, भौगोलिक परिस्थि?तीचा उत्तम वापर करून किल्ले बांधणी, गनिमी काव्याला अनुकूल भूरचनेचा उत्तम वापर, वैशिष्ट्यपूर्ण दरवाजे, लष्करी रणनिती, ग?निमी कावा याला पूरक ठरणारी डोंगरी किल्ल्यांची निर्मिती करण्यात आली. पूर्वीच्या राजांनी किल्ले महसूल विषयक नियंत्रणासाठी बांधले. मात्र शिवाजी महारा?जांनी याचा वापर लोक कल्याणार्थ निर्माण झालेल्या स्वराज्य बांधणीसाठी केला. हा विचार युनेस्कोने अद्वितीय वैश्विक मूल्य म्हणून मान्य केला आहे.

वारसा यादीत किल्ल्यांचा समावेश झाल्याबाबत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे विशेष आभार आहे. त्यांच्याकडे देशातल्या वेगवेगळ्या भागातून ७ प्रस्ताव युनोस्कोमध्ये नामांकन होण्याकरिता गेले होते. त्यापैकी पंतप्रधानांनी निर्णय घेऊन छत्रपती शिवरायांचे किल्ले हेच जागतिक वारसा म्हणून नामांकन करायचे ठरविले. या संपूर्ण प्रक्रियेत सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी आभार मानले.

सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत असणाऱ्या पुरातत्त्व वास्तूसंग्रालयाचे, संचालनालयाचे संचालक यांनी हा प्रस्ताव तयार केला. संपूर्ण भारतातून भारतीय पुरातत्व सर्वेक्षणास ८ प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यामध्ये




महाराष्ट्राच्या २ प्रस्तावांचा समावेश होता. त्यातील भारतातील मराठा लष्करी भूप्रदेश या प्रस्तावाची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावतीने निवड करण्यात आली. या नामांकनाच्या कार्यवाहीचा भाग म्हणून प्रस्तावाची तांत्रिक पडताळणी करण्यासाठी द. कोरिया येथील श्री. कोगली यांनी महाराष्ट्र, तमिळनाडू राज्यातील किल्ल्यांना भेट दिली. यासंबंधी नवी दिल्ली येथे जुलै २०२४ मध्ये झालेल्या यूनेस्कोच्या जागतिक वारसा समितीचे ४६ व्या अधिवेशनातील चर्चासत्रात महाराष्ट्रातील तज्ज्ञांनी भाग घेतला. युनेस्को मुख्यालय, पॅरिस येथे या प्रस्तावाचे तांत्रिक सादरीकरण करण्यात आले. सर्व सदस्य देशांमध्ये मतदानाद्वारे यावर सदस्य देशांची मते आजमावण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर बैठका घेण्यात आल्या. विदेश मंत्रालय, युनेस्को, भारताचे राजदूत आणि अनेक दे?शांच्या राजदूतांशी थेट संपर्क साधून नामांकन झालेल्या किल्ल्याचे महत्त्वही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी विषद केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ११ जुलै २०२५ रोजी युनेस्कोच्या सांस्कृतिक समितीच्या आंतराराष्ट्रीय बैठकीत एकमताने भारताने ही विजयश्री खेचून आणली आहे. जवळपास सगळ्या कमिटीपैकी, मतदानाचा अधिकार २० देशांना होता. या २० ही देशांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे हे किल्ले जागतिक वारसा स्थळ आहे, असे मतदान केले. त्यामुळे एकमताने, याठिकाणी हा प्रस्ताव मंजूर झाला. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेल्या अद्वितीय किल्ल्यांचा वारसा जपण्यासाठी हातभार लावावा, असेही त्यांनी सांगितले.

ऐतिहासिक क्षणाबद्दल सभागृहामार्फत महाराष्ट्र शासन सांस्कृतिक विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग, पुरातत्व व वस्तूसंग्रहलय व संचलनालय आणि या कार्यातील योगदान दिलेल्या सर्व मान्यवरांचे, महाराष्ट्रातील जनतेचे मुख्यमंत्र्यांनी अभिनंदन केले.

# चक्क ..गावांतील विद्यार्थ्यांनी तळेगाव बस स्थानकात भरवली शाळा

## बस प्रशासन होश मे आओ.. नारेबाजी



**तळेगाव (श्या.पं.), जनमाध्यम-** आर्वी तसेच तळेगाव डेपो अंतर्गत येणाऱ्या एकांबा, पारडी, बोटोना, थार, बोरखेडी या ग्रामीण भागातील बसफेऱ्यांचा प्रश्न चांगलाच पेटला. वारंवार निवेदन देऊन सुद्धा एसटी प्रशासनाकडून उडवाउडवीचे उत्तर मिळत असल्याने शेवटी विद्यार्थ्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला. बसअभावी या पाच गावांतील शेकडो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने सोमवार १४ जुलै रोजी तळेगाव बस स्थानकात विद्यार्थ्यांनी आक्रोश व्यक्त करीत तब्बल दीड तास शाळाच भरवली. बस प्रशासन होश मे आओ असे नारे दिले. अखेर लेखी आश्वासनानंतर विद्यार्थ्यांनी आंदोलन मागे घेतले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते. पर्यायी व्यवस्था म्हणून ये-जा करण्याकरिता बस हाच एक पर्याय असतो. मात्र, २३ जून पासून शाळा-महाविद्यालय सुरू झालेली असून महिना लोटला असताना एकांबा, पारडी, बोटोना, थार, बोरखेडी या मार्गावरील बस सेवा बंद आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. बससेवा सुरू करण्याच्या मागणीसाठी अनेकदा निवेदने देण्यात आली. मात्र, या निवेदनाची दखल घेण्यात आली नाही. अखेर त्रस्त झालेल्या विद्यार्थ्यांनी तळेगाव बस स्थानकात शाळा भरवली. 'बस प्रशासन होश मे आओ', रस्ता आमचा, हक आमचा बस द्या!' अशा नारेबाजी देत तळेगाव आगार परिसर दणाणून सोडला. या आंदोलनाचे गांभीर्य लक्षात घेता सहायक पोलिस निरीक्षक भोयर यांना मध्यस्थी करावी लागली. बस फेऱ्या नियमित सुरू करू, अशा लेखी स्वरूपात एसटी महामंडळानी मागण्या मान्य केल्याचे लिहून दिले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आंदोलन मागे घेतले. यावेळी विद्यार्थी काँग्रेसचे विश्वभूषण पाटील, शिक्षक तुषार नायकुजी, पालक वर्गातून विजय येरुडकर, विनोद दातीर, चंद्रशेखर टिपले, व शेकडो विद्यार्थी उपस्थित होते

एसटी प्रशासनाला वारंवार निवेदन दिले पण नेहमी त्यांनी शब्द फिरवला. एकांबा, पारडी, बोटोना, थार, बोरखेडी येथील विद्यार्थ्यांचे प्रचंड शैक्षणिक नुकसान झाले. सोबतच आष्टी शहर कृषी बाजारासाठी प्रसिद्ध असल्याने शेतकरी मजूर वर्गाचे, दुध-दहीचा व्यवसाय करणाऱ्या गवळी बंधूंना सुद्धा बरेच हाल सहन करावे लागत आहे. त्यामुळे आंदोलन करणे गरजेचे होते. तळेगाव व आर्वी आगरप्रमुखाने बस सुरळीत करण्याचे आश्वस्त केले. जर बस काही कारणास्तव सुरू केली नाही, तर अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करू.

- **विश्वभुषण पाटील** ( विद्यार्थी नेतृत्व).

### ठाणेदार यांच्या मध्यस्थीने निघाला तोडगा

दरम्यान उन्हामध्ये विद्यार्थी बसले असल्याने ठाणेदार मंगेश भोयर यांनी तात्काळ बस स्थानक गाठून आंदोलन कर्त्या विद्‍यार्थ्यांची समजूत काढली व तातडीने बस प्रशासनाची संपर्क करून या विद्यार्थ्यांच्या समस्येवर तातडीने मार्ग काढण्याच्या सूचना दिल्या यानंतर बस प्रशासनाने सुद्धा तातडीने मध्ये लवकरच यावर तोडगा काढण्यात येईल असे आश्वासित केल्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले,

# तळेगाव येथील ३०० खाटांचे रुग्णालय त्वरीत कार्यान्वित करा

## खासदार अमर काळे यांची आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर यांचेकडे मागणी

**तळेगाव (शा.पं.)** जनमाध्यम : येथे महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग मंत्रालयाच्या दि. ९ नोव्हेंबर २०२३ चो शासन निर्णयानुसार ३०० खाटांचे सामान्य रुग्णालय मंजूर करण्यात आले होते. याबाबतचे पत्र जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय, वर्धा यांचेकडे प्राप्त सुध्दा झाले आहे. या ३०० खाटांच्या शासकीय रुग्णालयाच्या मंजूरीची बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्याने त्या भागातील लोकांच्या मनात सर्व प्रकारच्या वैद्यकीय सुविधा आपल्याला जवळच आपल्या भागात तळेगाव येथे उपलब्ध होईल अशी आशा त्या भागातील लोकांच्या मनात निर्माण झाली. परंतु आज एक वर्षाचा कालावधी लोटून सुध्दा या रुग्णालयाबाबत




काहीही हालचाली नसल्याने व याबाबत त्या भागातील लोकांकडून खासदार अमर काळे यांना सतत विचारणा होत होती. लोकांच्या सततच्या पाठपुराव्यात पाहता खासदार अमर काळे यांनी लोकांच्या सततच्या पाठपुराव्याची दखल घेतली. त्यांना सुध्दा हा मुद्दा व लोकांची वैद्यकीय उपचाराबाबतची होणारी हेळसांड लक्षात घेता त्यांनी तळेगाव येथील मंजूर करण्यात आलेले रुग्णालय तात्काळ कार्यान्वित करण्याबाबतची मागणी आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर यांचेकडे पत्राद्वारे दि.१४ रोजी त्यांचे मंत्रालयीन कक्षात भेट घेऊन केली. या बैठकीत तळेगाव येथील मंजुर असलेले ३०० खाटांचे शासकीय रुग्णालय त्वरीत कार्यान्वित करण्याबाबत शासन स्तरावर सकारात्मक पाऊल उचलले जातील असे मंत्री महोदयांनी आश्वासन दिले.

# आज जागतिक कौशल्य दिनाचे आयोजन

वर्धा जनमाध्यम : जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त दि.७ ते १५ जुलै पर्यंत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहाचा समारोप व बक्षिस वितरण जिल्हाधिकारी यांच्या हस्ते ब्रम्हकुमारी राजयोग मेडिटेशन सेंटर, गोपूरी वर्धा येथे दुपारी १२ वाजता आयोजीत करण्यात आला आहे. कार्यक्रमाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.जागतिक युवा कौशलय दिन सप्ताह दरम्यान जिल्हातील विविध शाळा महाविद्यालय मध्ये घेण्यात आलेल्या कार्यक्रम उदा. निबंध, वादविवाद स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा तसेच इतर स्पर्धा, जिल्हा कौशल्य विकास मार्गदर्शन केंद्र वर्धा, सानिध्य फाउंडेशन व युथ पिस फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आले होते.सदर स्पर्धाचा बक्षिस वितरण सोहळा आज दिनांक १५ जुलै रोजी जागतिक युवा कौशल्य दिनानिमीत्य विविध विषयांवर मार्गदर्शन सुद्धा केले जाणार आहे. जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविणाऱ्या योजनांची माहीती दिली जाणार आहे. असे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त निता औघड वर्धा यांनी कळविले आहे.

### बालदंत उपचारातील प्रगत पाऊल

# सहा वर्षीय बालकाची संपूर्ण मौखिक पुनर्वसन शस्त्रक्रिया



**वर्धा जनमाध्यम** - लहान मुलांचे मौखिक आरोग्य सांभाळणे हे पालकांसोबतच दंतचिकित्सकांसाठीही एक आव्हानच असते. असे असताना केवळ सहा वर्षाच्या बालकाचे संपूर्ण मौखिक पुनर्वसन करणारी शस्त्रक्रिया सामान्य बधिरीकरणाच्या साहाय्याने सावंगी मेघे येथील शरद पवार दंत रुग्णालयातील दंतचिकित्सक चमूद्वारे यशस्वीरित्या करण्यात आली.सावंगीच्या दंत रुग्णालयात भरती झालेल्या या बालरुग्णाच्या दाताला कीड लागून तोंडात पस जमा झाल्याने इतरही अनेक मौखिक समस्या निर्माण झाल्या होत्या. बालदंतरुग्णांवर पारंपरिक पद्धतीने अनेक टप्प्यांमध्ये विविध प्रक्रियांसह दंतचिकित्सा करणे, हे एक मोठे आव्हान असते. बालरुग्ण वारंवार दातांच्या दवाखान्यात येण्यास इच्छुक नसतात आणि आले तरी उपचारांसाठी दंतचिकित्सकांना सहकार्य करण्याइतपत सहनशीलता त्यांच्यात नसते. त्यामुळे रुग्णाची मौखिक तपासणी करून संपूर्ण पुनर्बांधणी प्रभावी उपचारासह एकाच सत्रात पूर्णत्वाला नेण्याचा निर्णय रुग्णालयातील दंतचिकित्सकांनी घेतला.या बालरुग्णावर सामान्य बधिरीकरणाच्या साहाय्याने दात काढण्यापासून तर पल्पेक्टॉमी (पल्प थेरपी), कॉम्पोसिट भरती, स्पेस मेंटेनर्स, पिट व फिशर सीलंट्स, स्टेनलेस स्टील क्राउन अशा सर्व उपचार प्रक्रिया एकाच टप्प्यात पार पाडण्यात आल्या. बालकाची मौखिक कार्यक्षमता पुनर्संचयित करीत त्याच्या वेदना कमी करण्यासह भविष्यात समस्या उद्भवू नये व त्याचे दीर्घकालीन दंतआरोग्य सुदृढ राहावे, याची काळजी यावेळी घेण्यात आली. ही शस्त्रक्रिया बलदंतचिकित्सा विभागातील डॉ. रामकृष्ण येलुरी यांच्या मार्गदर्शनात डॉ. आकृती चंद्रा, डॉ. मृणाली देशकर, डॉ. आश्रय निमजे, डॉ. आकांक्षा आखतकर व डॉ. शेफाली यांनी यशस्वीरित्या पूर्णत्वाला नेली.

# सालफळ येथे अनधिकृत गौण खनिज वाहतूक कारवाईत ट्रॅक्टर जप्त

**वर्धा जनमाध्यम** : आर्वी तालुक्यातील सालफळ येथे बेकायदा रेती उपसा करून वाहतूक करणाऱ्यांविरोधात आर्वी तहसील कार्यालयाने कारवाईचा बडगा उगारला आहे. या कारवाईत एक ट्रॅक्टर जप्त करण्यात आला आहे.गौण खनिज वाहतूक करण्याकरिता विहित परवानगी न घेता अनधिकृतपणे गौण खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनावर कार्यवाही करण्याकरिता तहसील कार्यालयाचे पथक कार्यरत असून सदर पथक गस्त करीत असतेवेळी दिनांक १३ जुलै रोजी मौजा सालफळ येथे अनधिकृत रेती वाहतूक करत असताना विना क्रमांकाचा ट्रॅकटर आढळून आला. महसूल पथकास पाहून चालक व इतर लोक पळून गेले. स्थानिक चौकशी केली असता गावकऱ्यांनी ट्रॅक्टर मोरेश्वर भोंगाडे रा.मारडा यांच्या मालकीचा असल्याचे सांगितले. सदर वाहन चालकाजवळ कोणताही वाहतूक परवाना नसल्याने ट्रॅक्टर जप्त करून तहसिल कार्यालय आर्वी येथे जमा करण्यात आला आहे. ट्रॅक्टर वाहनावर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई



सोबत फौजदारी कारवाईसुद्धा करण्यात येणार आहे. सदर कारवाई जिल्हाधिकारी वान्मथी सी., उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाठ, तहसीलदार हरीश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार साईकिरण आवुलवार, ग्राम महसूल अधिकारी नवज्योत जामनिक, महसूल सेवक आशिष ढानके यांच्या पथकाने केली आहे.मागील काही दिवसापासून अवैध गौण खनिज व अवैध रेती वाहतूक करणारे महसूल विभागाच्या रडारवर असल्याने सातत्याने कारवाई केल्या जात आहे. त्यामुळे अवैध गौण खनिज व रेती वाहतुकीस आळा बसल्याचे दिसून येत आहे. आर्वी तालुक्यात बेकायदा रेती उपसा व वाहतूक करणाऱ्यांविरोधात यापुढेही अशीच कडक कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार हरीश काळे यांनी दिली आहे.


**नावात बदल**

माझे पूर्वी

**KHER KHAN**

असे नाव होते.

माझे पासपोर्ट नंबर

X7915431 वरील नाव

**SHER KHAN**

हे नाव नमूद आहे. वरील नाव नमूद करावे.

पत्ता :- म्हसाळा, वर्धा ४४२००१


# मित्रांसोबत गेलेला व्यक्ती चार दिवसांपासून घरी परतला नाही

## बेपत्ता व्यक्तीचा घातपाताचा संशय ?

**आष्टी (श.), जनमाध्यम** : तालुक्यातील आबाद किन्ही येथील राहुल तायडे (३९) ह. मु. नवीन आष्टी हा चार दिवसांपासून घरी परतलेला नाही. या प्रकरणी पोलिसात तक्रार नोंदविण्यात आली आहे. राहुलचा शोधही घेतला जात असून घातपाताचा संशय व्यक्त केला जात आहे.

आष्टी येथे एका महिलेच्या घरी तिचा भाऊ व एक मित्र आला. त्यांची ओळख राहुल तायडे याच्या सोबत झाली. गौरव व गोपाल हे दोघेही राहुल सोबत ओळख करून वरुडला जात आहे, असे सांगण्यात आले. ११ जुलै रोजी तिघेही एम. एच. ३२ ए.एम. १८५४ क्रमांकाच्या दुचाकीने वरूडसाठी निघाले. पण, चार दिवसांपासून राहुल घरी परतलेला नाही. शिवाय त्याचा मोबाईल बंद येत आहे. शोध घेऊनही राहुल न मिळाल्याने आष्टी पोलिस ठाणे गाठून तक्रार नोंदविण्यात आली आहे. आष्टी पोलीस पुढील तपास करीत आहे,


**कोर्ट विद्यमान श्री.ए.आर.सुर्वे दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) आर्वी ता. आर्वी,जि.वर्धा**

**वारस प्रमाणपत्र ०५/२०२५** — **Indian Succ. Act of 372 of 1925**

पे.ता.०८/०८/२०२५

प्रोसेस क्र.५२५९/२५ दिनांक १३/०५/२०२५

**अर्जदार :** प्रकाश महादेवराव सुने

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** दि सिनिअर सुपरिटेंडेन्ट ऑफ पोस्ट ऑफिस

ज्याअर्थी **शांता नामदेवराव दुधे ही दि.२१/०७/२०२३ रोजी रोहना येथे मयत झालेली आहे. अर्जदार प्रकाश महादेवराव सुने,रा.प्लॉट नं. २२, सेंन्ट्रल एक्साईज ले-आउट टेलिफोन एक्सचेन्ज चे मागे खामला, नागपूर ता.जि.नागपूर** हयांनी या न्यायालयात सदर्हू **मयत शांता नामदेवराव दुधे नावाने Saving bank Account bearing No. 1835773220 सब पोस्ट ऑफिस नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे जमा असलेली रक्कम ८,२८,०४३/- (आठ लाख अठठाविस हजार, त्रैच्याळीस रुपये फक्त )** मिळण्याकरिता इंडियन सक्शेसन ॲक्ट चे कलम ३७२ अंतर्गत **सक्शेसन प्रमाणपत्र** मिळावे असा अर्ज दाखल केलेला आहे.

मयत शांता नामदेवराव दुधे यांच्या नावांनी सब पोस्ट ऑफिस नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे जमा असलेली रक्कम येथे जमा असणारी रक्कम अर्जदाराला मिळण्याकरिता,तसेच त्यांच्या मिळकतीचे प्रतिनिधीत्व करण्याकरिता अर्जदार यांनी सक्शेसन प्रमाणपत्र मिळावे, याकरिता सदरचा अर्ज केलेला आहे.

सदर्हू अर्जदार प्रकाश महादेवराव सुने मयत शांता नामदेवराव दुधे हिचे वारसान नव्हे असे कोणास समजविण्याचे असले तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आंत त्यांनी दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर, आर्वी, जि.वर्धा हया न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास कोर्ट अर्जदार यांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सक्शेसन प्रमाणपत्र देण्यात येईल.

करिता आज दिनांक २३/०५/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,

**सहायक अधीक्षक**

दिवाणी न्यायालय, व.स्तर, आर्वी



**कोर्ट विद्यमान श्री. मलिक विराणी, तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, सेलू यांचे न्यायालय**

क्रमांक/अ.का/सामान्य/कावी-६५५/२०२५

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी यांचे कार्यालय

दिनांक :- १०/०७/२०२५

**जाहीरनामा**

अर्जदार महानंदा झित्रुजी नगराळे, रा. सुरगाव ता. सेलू जि. वर्धा / लग्नानंतरचे नाव महानंदा प्रविण सुटे रा. ह. मु. सावंगी (मेघे) यांनी कलम १३ (३) अन्वये जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ अंतर्गत अर्जदार यांचा जन्म वडीलांचे राहते घरी मौजा सुरगाव, ता. सेलू जि. वर्धा येथील असून अर्जदार यांचा जन्म दिनांक २४/०१/१९८२ ची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, सुरगाव ता. सेलू जि. वर्धा यांचे कार्यालयातील अधिकृत नोंदणी पुस्तीके मध्ये घेण्याचा आदेश होण्याबाबत अर्ज / प्रकरण सादर केले आहे.

अर्जदार यांची जन्म-मृत्यु नोंदणी बाबत हितसंबधीत व्यक्तीचे आक्षेप / हरकती असल्यास ते त्यांनी स्वतः किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी मार्फत पुराव्यासह कार्यालयीन वेळेत जाहीरनामा प्रसिध्दी दिनांकाचे १५ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावे. उशिरा प्राप्त होणारे किंवा पुरावे नसणारे आक्षेप / हरकती ग्राहय धरल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- सेलु

दिनांक : १०/०७/२०२५

**सही**

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी सेलू**



**जाहिर नोटिस**

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार अहमदखान सुजातखान पठान यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणे: मौजा पुलगाव, मौजा नं. ३९ ता. देवळी व जि.वर्धा येथील नगर परिषद च्या ह?द्दीतील वार्ड कं. १७ जुना व ७ नविन झोन नं. १ घर/मालमत्ता कं. ११७ व १२२ नविन (विक्रीपत्रा नुसार) व ५१०/४१६ (कर पावती नुसार) नझुल ब्लॉक कं. १२ मधील प्लॉट कं. १२६ ज्याची एकूण आराजी ३५.९५ चौ. मी. म्हणजेच ३८७.०० चौ. फुट इतकी असुन त्याची चतुःर्सिमा :-

**पुर्वेसः रोड,**
**पश्चिमेसः न. पं. गल्ली,**
**उत्तरेसः सैय्यद रज्जाक अली यांची मालमत्ता,**
**दक्षिणेसः सफदहुसेन शेख मुनीर,**

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. २२,००,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्त्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून तीन दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**ॲड. सचिन एस. कुरझडकर**

साई नगर वर्धा

मो. नं. ९८६००४१३६१



### छत्रपती शिवाजी महाराजांची दुर्गसंपदा; महाराष्ट्राच्या शौर्याचा वारसा

# मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत केले महाराष्ट्राचे अभिनंदन

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, स्वर्णदुर्ग,



विजयदुर्ग, खान्देरी हे ११ किल्ले आणि तमिळनाडूतील जिंजी असे एकूण १२ किल्ले जागतिक वारसा म्हणून घोषित करण्यात आले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी घडवलेली ही दुर्ग संपदा ही महाराष्ट्राच्या शौर्याचा आणि सांस्कृतिक वारसा आहे. या ऐतिहासिक किल्ल्यांचा युनोस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश होणे, ही संपूर्ण महाराष्ट्र आणि देशासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत निवेदन करताना काढले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, भौगोलिक परिस्थितीचा उत्तम वापर करून किल्ले बांधणी, गनिमी काव्याला अनुकूल भूरचनेचा उत्तम वापर, वैशिष्ट्यपूर्ण दरवाजे, लष्करी रणनिती, गनिमी कावा याला पूरक ठरणारी डोंगरी किल्ल्यांची निर्मिती करण्यात आली. पूर्वीच्या राजांनी किल्ले महसूल विषयक नियंत्रणासाठी बांधले. मात्र शिवाजी महाराजांनी याचा वापर लोक कल्याणार्थ निर्माण झालेल्या स्वराज्य बांधणीसाठी केला. हा विचार युनेस्कोने अद्वितीय वैश्विक मूल्य म्हणून मान्य केला आहे. वारसा यादीत किल्ल्यांचा समावेश झाल्याबाबत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे विशेष आभार आहे. त्यांच्याकडे देशातल्या वेगवेगळ्या भागातून ७ प्रस्ताव युनोस्कोमध्ये नामांकन होण्याकरिता गेले होते. त्यापैकी पंतप्रधानांनी निर्णय घेउन छत्रपती शिवरायांचे किल्ले हेच जागतिक वारसा म्हणून नामांकन करायचे ठरविले. या संपूर्ण प्रक्रियेत सहकार्य करणा-या सर्वांचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी आभार मानले. सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत असणा-या



पुरातत्त्व वास्तूसंग्रालयाचे, संचालनालयाचे संचालक यांनी हा प्रस्ताव तयार केला. संपूर्ण भारतातून भारतीय पुरातत्व सर्वेक्षणास ८ प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यामध्ये महाराष्ट्राच्या २ प्रस्तावांचा समावेश होता. त्यातील भारतातील मराठा लष्करी भूप्रदेश या प्रस्तावाची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावतीने निवड करण्यात आली. या नामांकनाच्या कार्यवाहीचा भाग म्हणून प्रस्तावाची तांत्रिक पडताळणी करण्यासाठी द. कोरिया येथील श्री. कोगली यांनी महाराष्ट्र, तमिळनाडू राज्यातील किल्ल्यांना भेट दिली. यासंबंधी नवी दिल्ली येथे जुलै २०२४ मध्ये झालेल्या यूनेस्कोच्या जागतिक वारसा समितीचे ४६ व्या अधिवेशनातील चर्चासत्रात महाराष्ट्रातील तज्ञांनी भाग घेतला. युनेस्को मुख्यालय, पॅरिस येथे या प्रस्तावाचे तांत्रिक सादरीकरण करण्यात आले. सर्व सदस्य देशांमध्ये मतदानाद्वारे यावर सदस्य देशांची मते आजमावण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर बैठका घेण्यात आल्या. विदेश मंत्रालय, युनेस्को, भारताचे राजदूत आणि अनेक देशांच्या राजदूतांशी थेट संपर्क साधून नामांकन झालेल्या किल्ल्याचे महत्त्वही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी विषद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ११ जुलै २०२५ रोजी युनेस्कोच्या सांस्कृतिक समितीच्या आंतराराष्ट्रीय बैठकीत एकमताने भारताने ही विजयश्री खेचून आणली आहे. जवळपास सगळ्या कमिटीपैकी, मतदानाचा अधिकार २० देशांना होता. या २० ही देशांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे हे किल्ले जागतिक वारसा स्थळ आहे, असे मतदान केले. त्यामुळे एकमताने, याठिकाणी हा प्रस्ताव मंजूर झाला. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेल्या अद्वितीय किल्ल्यांचा वारसा जपण्यासाठी हातभार लावावा, असेही त्यांनी सांगितले. ऐतिहासिक क्षणाबद्दल सभागृ?हामार्फत महाराष्ट्र शासन सांस्कृतिक विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग, पुरातत्व व वस्तूसंग्रहलय व संचलनालय आणि या कार्यातील योगदान दिलेल्या सर्व मान्यवरांचे, महाराष्ट्रातील जनतेचे मुख्यमंत्र्यांनी अभिनंदन केले.

## पुढील अधिवेशनात धर्मांतर विरोधी कायदा आणणार

■ *गृह राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर* ■

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात धर्मांतर विरोधात कायद्याच्या अभ्यासासाठी मुख्यमंत्र्यांनी पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली



समिती नेमली आहे. या समितीच्या अहवालातील सूचनांचा विचार करून पुढील अधिवेशनात धर्मांतरविरोधी कायदा मान्यतेसाठी सादर केला जाईल, असे गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधान परिषदेत सांगितले. सदस्य श्रीमती उमा खापरे यांनी पुणे जिल्ह्याच्या दौंड तालुक्यातील केडगाव येथे पंडिता रमाबाई मुक्ती मिशन या संस्थेच्या अनाथ आश्रमात मुली व महिला यांचे धर्मांतरण केले जात असल्याबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री प्रवीण दरेकर, श्रीमती मनिषा कायंदे, सदाशिव खोत यांनी सहभाग घेतला.याबाबत माहिती देताना राज्यमंत्री भोयर म्हणाले की, केडगाव येथील अनाथ आश्रमामध्ये मुलींचे धर्मांतरण तसेच मुलींना मारहाण करणे, सार्वजनिक शौचालय साफ करायला लावणे, जातीवरून शिवीगाळ करणे, वाईट वागणूक देणे अशा फिर्यादीवरून ८ डिसेंबर २०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. या संस्थेतील अनियमितता तसेच सुरू असलेल्या बेकायदेशीर कृत्यासंदर्भात तपासी अधिकारी म्हणून पोलीस उपअधीक्षक दर्जाच्या महिला पोलीस अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचा अधिक तपास सुरू असून एका महिन्यात याचा चौकशी अहवाल प्राप्त होईल, आणि त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्याबाबत संबंधित विभागाला कळविण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

## विदर्भातील अतिवृष्टी व पुरपरिस्थितीमुळे नुकसानग्रस्तांना तातडीने मदत पोहोचवण्यासाठी जिल्हास्तरावर कार्यवाही -मंत्री गिरीश महाजन

**मुंबई/प्रतिनिधी :** अतिवृष्टी व मुसळधार पावसामुळे विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये दि. ८ व ९ जुलै २०२५ या कालावधीत झालेल्या पूरपरिस्थिती उद्भवली होती. शासनाने आपत्ती व्यवस्थापनासाठी जिल्हाधिका-यांना संपूर्ण अधिकार प्रदान केले असून, नुकसानग्रस्त नागरिकांना तातडीने मदत पोहोचवण्यासाठी जिल्हास्तरावर कार्यवाही सुरू आहे, अशी माहिती जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण पाट बंधारे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापनमंत्री गिरीश महाजन यांनी विधानपरिषदेत निवेदनाद्वारे सादर केली. मंत्री श्री. महाजन म्हणाले , नागपूर विभागातील नागपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा, गडचिरोली व चंद्रपूर या जिल्ह्यांना मोठ्या प्रमाणावर फटका बसला आहे. ७ नागरिकांचा दुर्दैवी मृत्यू, तर ४ जण जखमी तर १७ मोठी जनावरे व १० लहान जनावरांचा मृत्यू झाला. ४० घरे पूर्णतः ढासळली, तर १,९२७ घरांचे अंशतः नुकसान झाले. २०९ गोठ्यांचे नुकसान झाले. ७१५ नागरिकांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्यात आले.

मंत्री श्री. महाजन म्हणाले, यावेळी २०,८५४ हेक्टर क्षेत्रावरील शेतीचे नुकसान झाले असून बाधित शेतकरी संख्या २९,९२० आहे. पंचनामे करण्याचे काम सुरू असून, अहवाल अद्याप शासनाकडे सादर होणे बाकी आहे. घरांच्या पडझडीसाठी निधी जिल्हा पातळीवर वितरीत करण्यात आला आहे. तसेच घरगुती भांडी, कपडे, टपरीधारक व दुकानदार यांना मदतीसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.



अमरावती विभागामध्ये देखील ८ व ९ जुलै दरम्यान अतिवृष्टीमुळे हानी झाली असून १ व्यक्ती मृत, १ जखमी, ९ घरे पूर्णतः ढासळली, १८० घरांचे अंशतः नुकसान झाले. ४ जनावरे दगावली ३,४११ हेक्टरवरील शेतीचे नुकसान पंचनामे सुरू करण्यात आले आहेत. राज्य शासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून, नुकसानग्रस्त नागरिकांना तातडीने मदत पोहोचवण्याद्यत आहे, असे मंत्री महाजन यांनी सांगितले.

**नागपूर विभागातील पूरस्थिती आणि नुकसानः** नागपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा, गडचिरोली व चंद्रपूर या जिल्ह्यांत अतिवृष्टीमुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली. ७ नागरिकांचा मृत्यू, ४ जखमी, १७ मोठी व १० लहान जनावरे मृत्युमुखी पडली. १,९२७ घरांचे अंशतः नुकसान तर ४० घरे पूर्णतः उद्धवस्त झाली आहेत. २०९ गोठ्यांचे नुकसान झाले असून ७१५ नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यात आले आहे. २० हजार ८५४ हेक्टर क्षेत्रावरील शेतीचे नुकसान झाले असून बाधित शेतकरी संख्या २९ हजार ९२० आहे. या ठिकाणी पंचनाम्याचे कार्य सुरू आहे. अमरावती विभागात देखील अतिवृष्टीचा परिणाम दिसून आला. एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून एक व्यक्ती जखमी झाला आहे. १८० घरांचे अंशतः नुकसान तर ९ घरे पूर्णत? पडली आहेत. ४ जनावरे दगावली असून ३ हजार ४११ हेक्टर शेती क्षेत्राचे नुकसान झाले आहे. संबंधित जिल्ह्यांमध्ये पंचनाम्याची कार्यवाही सुरू आहे.

## आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त सहकारी संस्थांच्या मदतीने पर्यावरण संवर्धनासह विविध उपक्रम राबवा-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्ष २०२५ साजरे करताना विविध उपक्रम राबविले जात आहेत. हे उपक्रम राबवत असताना पर्यावरण संवर्धन आणि वृक्षारोपण यावर अधिक भर द्यावा. सर्व उपक्रम विविध सहकारी संस्थांच्या सक्रिय सहभागातून आणि मदतीने राबवावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्ष २०२५ निमित्त विविध कार्यक्रमांची आखणी करण्यासाठी विधानभवन येथे राज्य शिखर परिषदेच्या आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.या बैठकीला सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री नितेश राणे, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, सहकार राज्यमंत्री पंकज भोयर, मुख्य सचिव राजेशकुमार उपस्थित होते.



मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त सहकार, कृषी,पणन, दुग्ध व्यवसाय, अन्न, नागरी पुरवठा विभाग, ग्रामविकास विभाग, मत्स्यव्यवसाय विभाग, अपारंपारिक उर्जा विभाग यांनी समन्वयातून आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त कार्यक्रमांचे काटेकोरपणे नियोजन करावे. वर्षभरात राबविण्यात येणा-या उपक्रमांची माहिती व्यापक प्रमाणात जनतेपर्यंत पोहोचवावी. आंतरराष्ट्रीय वर्षानिमित्त राबवण्यात येणा-या सर्व कार्यक्रमांना वृक्ष लागवडीची जोड द्यावी. सहकार पुरस्कार २०२५ साठी सहकारी संस्थांनी प्रस्ताव सादर करण्याचा दिनांक १८ जुलै वरून ३१ जुलै करण्यात यावा असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त केंद्र व राज्य शासनाचे विविध उपक्रम समन्वयाने राबविण्यात यावे. राज्यातील सहकार क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी राज्याने सहकार क्षेत्रात केलेली प्रगती आणि दिलेल्या योगदानाची माहिती राज्यातील जनतेला होण्यासाठी हा कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात यावा. राज्यस्तरीय शिखर समितीमार्फत वर्षभरात राबविण्यात येणा-या कार्यक्रमांबाबतची माहिती समितीस वेळोवेळी सादर करावी. सहकार क्षेत्रामधील आव्हाने बदलली असून या क्षेत्राचा अभ्यास करून सहकार कायद्याचे पुनर्विलोकन करणे गरजेचे आहे. सहकार कायद्यात कोणत्या तरतुदी असाव्यात याबाबत अभ्यासगट तयार करून, त्याचा अहवाल समितीसमोर सादर करावा असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.लेखक विद्याधर अनास्कर यांनी लिहिलेले 'गोष्ट रिझर्व्ह बँकेची' या पुस्तकाचे प्रकाशन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्त सहकार विभागामार्फत विविध उपक्रमांच्या माहितीचे सादरीकरण केले.महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादितचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी अहिल्यानगर शिर्डी येथे आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त राबवण्यात आलेल्या कार्यक्रमांची माहिती सादर केले. मुंबई आणि नागपूर येथे सहकार दिंडीचे आयोजन करण्यात आले. राजस्थानचे राज्यपाल हरिभाउ बागडे यांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय सहकार परिषद पार पडली. आगामी कालावधी देखील विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत. सहकार ध्वज यात्रा, सहकार मॅरेथॉन तसेच या सर्व उपक्रमांना वृक्ष लागवडीची जोड देखील देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. या बैठकीला अपर मुख्य सचिव वित्त ओ.पी.गुप्ता, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, प्रधान सचिव (सहकार व पणन) प्रवीण दराडे, प्रधान सचिव (कृषी) विकास चंद्र रस्तोगी, प्रधान सचिव (ग्रामविकास) एकनाथ डवले, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंग, सचिव (अन्न व नागरी पुरवठा) विनिता सिंगल, सचिव (पशुसंवर्धन व दुग्धविकास विभाग) एन.रामास्वामी यासह सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था दीपक तावरे, साखर आयुक्त, पणन संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे, महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था फेडरेशन मर्यादित प्रदेश सुहास पटवर्धन, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक प्रतिनिधी, नागरी सहकारी बँक प्रतिनिधी, सहकारी साखर कारखाना प्रतिनिधी उपस्थित होते.

## नॉर्थ कॅनरा गौड स्वारस्वत को -ऑप बँकेत झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी एसीबी मार्फत चौकशी

**मुंबई/प्रतिनिधी :** नार्थ कॅनरा गौड स्वारस्वत को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्यवस्थापकीय संचालक, कर्मचारी आणि यु.बी. इंजिनिअरींगचे मुख्य वित्तीय अधिकारी व इतर संबंधित यांनी आपसात संगनमत करुन सन २०१८ ते २०२१ यादरम्यान बँकेच्या गिरगाव शाखेतील यु.बी. इंजिनिअरींग कंपनीचे अवसायक यांनी बंद केलेले बँक खाते मुख्य वित्तीय अधिकारी यांच्या बनावट पत्राच्या आधारे उघडून व सिग्नेटरी अर्थॉरिटीमध्ये बदल करुन त्यात आर्थिक व्यवहार केले. याबाबत १.८३ कोटी रुपये इतरत्र वळविली असल्याच्या तक्रारीही प्राप्त झाल्या असून या प्रकरणाचा तपास करणारा पोलीस अधिकारी यांचेही बँकेसोबत संबंध असल्याची तक्रार असल्याने या संपूर्ण प्रकरणाची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी केली जाईल, अशी माहिती गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधान परिषदेत दिली. यासंदर्भात सदस्य प्रसाद लाड, प्रवीण दरेकर यांनी लक्षवेधी सूचना मांडली, त्यावेळी गृह राज्यमंत्री श्री.कदम यांनी माहिती दिली. या बँकेतील आर्थिक गैरव्यवहाराच्या प्रकरणावर विधान परिषदेत स्पष्टीकरण देताना राज्यमंत्री श्री.कदम यांनी स्पष्ट केले की, संबंधित वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांच्याविरुद्ध कुठल्याही आर्थिक देवाण-घेवाणीचा लेखी पुरावा चौकशी दरम्यान मिळालेला नाही.

## बनावट खतांविरोधात राज्यांनी कठोर पावले उचलावीत

### केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांचे सर्व मुख्यमंत्र्यांना पत्र

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशभरात बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या खतांच्या विक्रीबाबत वाढती चिंता व्यक्त करत केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण तसेच ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रादेशांच्या मुख्यमंत्र्यांना पत्र



लिहून कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत. शेतक-यांचे नुकसान टाळण्यासाठी आणि त्यांना गुणवत्तापूर्ण खते वेळेवर व योग्य दरात उपलब्ध करून देण्यासाठी हे पाउल उचलण्यात आले आहे. केंद्रीय मंत्री श्री. चौहान यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे की, कृषी ही भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे आणि शेतक-यांचे उत्पन्न स्थिर ठेवण्यासाठी दर्जेदार खतांची वेळेवर उपलब्धता अत्यावश्यक आहे. त्यांनी बनावट खतांची विक्री, अनुदानावरील खतांचा काळाबाजार आणि जबरदस्तीने टॅगिंग करण्यासारख्या बेकायदा प्रकारांवर कठोर कारवाई करण्याची गरज अधोरेखित केली आहे. पत्रात पुढे म्हटले आहे की, खतांची उपलब्धता सुनिश्चित करणे ही राज्यांची जबाबदारी असून, काळाबाजार, जादा किमतीत विक्री आणि अनुदानावरील खतांचे चुकीच्या पद्धतीने वितरण यावर कडक नजर ठेवावी. खतांच्या उत्पादन आणि विक्रीवर नियमित देखरेख ठेवून सॅम्पलिंग आणि चाचणी प्रक्रियेद्वारे निकृष्ट दर्जाच्या खतांवर नियंत्रण ठेवावे. पारंपरिक खतांसह नॅनो-खते किंवा जैव-उत्तेजकांचे जबरदस्तीने टॅगिंग थांबवून दोषींविरुद्ध परवाना रद्द करणे, गुन्हे नोंदविणे आणि कायदेशीर कारवाई करावी. शेतक-यांना या प्रकारांपासून वाचवण्यासाठी त्यांना जागरूक करणे आणि त्यांच्याकडून अभिप्राय घेण्यासाठी प्रभावी यंत्रणा तयार करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. शेतकरी व शेतकरी गटांना देखरेख प्रक्रियेत सहभागी करून ख-या-खोट्या उत्पादनांची ओळख पटवण्याची यंत्रणा विकसित करावी, असेही केंद्रीय मंत्री श्री. चौहान यांनी म्हटले आहे. केंद्रीय मंत्र्यांनी राज्य शासनाला आवाहन केले आहे की, वरील मार्गदर्शक तत्वांच्या आधारे राज्यव्यापी मोहीम राबवून बनावट आणि निकृष्ट खतांचा संपूर्ण बंदोबस्त करावा. राज्य पातळीवर या प्रक्रियेवर नियमित देखरेख ठेवली गेल्यास हा शेतक-यांच्या हितासाठी प्रभावी आणि शाश्वत उपाय ठरू शकतो, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

## कंत्राटी कर्मचा-यांच्या वेतनाला विलंब झाल्यास कारवाई -आरोग्य मंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात कंत्राटी कर्मचा-यांचे वेतन वेळेवर आणि नियमाप्रमाणे झाले पाहिजे. एखादी कंपनी कंत्राटी कर्मचा-यांचे वेतन वेळेत अथवा नियमाप्रमाणे देत नसल्याचे निदर्शनास आल्यास याबाबत चौकशी करुन कारवाई करण्यात येईल, असे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधान परिषदेत सांगितले.सदस्य राजेश राठोड यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत श्रीमती उमा खापरे, सदस्य विक्रम काळे यांनी सहभाग घेतला. आरोग्य मंत्री श्री. आबिटकर म्हणाले की, केंद्र शासनाकडून जानेवारी २०२५ पासून निधी प्राप्त न झाल्याने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत आरोग्य विभागातील कर्मचा-यांचे मानधन प्रलंबित राहिले होते. सध्या हा निधी प्राप्त झाला असून मे २०२५ अखेर पर्यंतच्या मानधनासाठीचा निधी जून महिन्यात वितरित केलेला आहे. भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होउ नये, यासाठी राज्य शासनामार्फत उपाययोजना करण्यात येतील, असेही त्यांनी याबाबतच्या एका प्रश्नाच्या उत्तरात नमूद केले.

## विधानभवनातून

### कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र सेल स्थापन करण्यात येणार-एकनाथ शिंदे

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील महानगरपालिका व नगरपालिका यांच्यासमोरील कचरा व्यवस्थापनातील अडचणी दूर करण्यासाठी स्वतंत्र सेल स्थापन करण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. याबाबत सदस्य विजय देशमुख यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी सदस्य अभिमन्यू पवार, अर्जुन खोतकर यांनी उपप्रश्न उपस्थित केला. उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, सोलापूर शहरातून दररोज संकलित होणा-या कच-याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याचे काम सोलापूर बायोएनर्जी कंपनी



लिमिटेड यांच्याकडून करण्यात येत आहे. या ठिकाणी दररोज ३०० टन क्षमतेचा बायोगॅस प्रकल्प कार्यरत असून, ओल्या कच-यापासून बायोगॅस आणि खत निर्मिती केली जाते, तर सुका कचरा वेगळा करून तो प्रक्रिया उद्योगांकडे पाठविला जातो. नगरपालिका व महानगरपालिका मध्ये कच-याचे योग्य वर्गीकरण होणे अत्यावश्यक आहे. लहान नगरपालिका व महानगरपालिका यांच्या याबाबत अडचणी सोडवण्यासाठी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव यांना आधीच सूचना दिल्या आहेत. राज्य शासनाकडून अशा सर्व ठिकाणी आवश्यक ती मदत देण्यात येईल. महापालिकेतील आयत्या वेळी ठराव घेण्यासंबंधीची प्रक्रिया पारदर्शक राहावी यासाठी नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांना ठरावांची पडताळणी करण्याचे निर्देश दिले जातील. राज्यमंत्री श्रीमती मिसाळ म्हणाल्या, सोलापूर शहरात घंटागाड्यांद्वारे घराघरातून कचरा संकलन केले जाते. मात्र, काही झोपडपट्टी वस्ती परिसरांमध्ये घंटागाड्या फिरवूनही कचरा साचतो, अशी समस्या आहे. सध्या सोलापूर शहरात जवळपास सात लाख टन कचरा डंप झालेला आहे. यापैकी सुमारे पाच लाख टन कचरा उचलण्यात आला आहे.

### एसटी स्वायत्त संस्था, एसटीचे कदापि खासगीकरण होउ देणार नाही- प्रताप सरनाईक

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य शासनाचा अंगीकृत सार्वजनिक उपक्रम असलेली असलेली एसटी सुमारे ८३ हजार कर्मचा-यांची ' मातृसंस्था ' आहे. भविष्यात एसटीचे कदापि खासगीकरण होणार नाही, त्यामुळे कर्मचा-यांनी अशा अफवांवर विश्वास ठेवू नये, असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले. मुंबईतील परळ बसस्थानकामध्ये कामगार नेते भाई जगताप यांच्या संकल्पनेतून राष्ट्रीय एसटी कामगार काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बर्गे यांच्या पुढाकाराने कर्मचारी व प्रवाशांसाठी जलशीतकाचे लोकार्पण करताना मंत्री सरनाईक बोलत होते. यावेळी राष्ट्रीय एसटी कामगार काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बर्गे, प्रादेशिक व्यवस्थापक यामिनी जोशी, विभाग नियंत्रक अभिजीत पाटील यांच्या सह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मंत्री श्री. सरनाईक म्हणाले, एसटीचा कर्मचारी अत्यंत मेहनती आहे. तो काम करीत असलेल्या ठिकाणी त्याला मुलभूत सोयी - सुविधा पुरविणे ही एसटी प्रशासनाची नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे चालक-वाहक विश्रांती गृह, तेथील प्रसाधनगृह स्वच्छ असली पाहिजेत. त्यासाठी आपण लवकरच खासगी स्वच्छता संस्था नेमत असून, त्यांच्या कडून विश्रांती गृहाच्या स्वच्छतेबरोबर कर्मचा-यांचे गणवेश स्वच्छ धुवून इस्त्री करून कर्मचा-यांना देण्याबाबत व्यवस्था करण्यात येणार आहे. एवढेच नाही तर कर्मचा-यांची दाढी व केश कर्तनाची व्यवस्थादेखील स्वच्छता संस्थेच्यावतीने करण्यात येईल. कर्मचा-यांच्या मुलभूत गरजा कडे अशा प्रकारे लक्ष दिल्यास कर्मचा-यांसाठी कामगिरी करणा-यांसाठी अनुकूल मानसिक परिस्थिती निर्माण करणे शक्य होते.

### मृद व जलसंधारण विभागासाठी 8667 पदांना मान्यता-मंत्री संजय राठोड

**मुंबई/प्रतिनिधी :** मृद व जलसंधारण विभागाच्या कामकाजात गतिमानता आणण्यासाठी आणि कार्यरत असणा-या यंत्रणेला बळकटी देण्यासाठी शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर मृद व जलसंधारण विभागाने नव्याने एक आकृतिबंध तयार करून तो वित्त विभागाकडे पाठवला होता. या प्रस्तावानुसार, ८६६७ पदांना वित्त विभागाने मान्यता दिली असून, ही पद भरती



लवकरच केली जाईल, अशी माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी विधानपरिषदेत दिली.सदस्य रणजितसिंह मोहिते पाटील यांनी यासंदर्भात प्रश्न विचारला होता, त्यावेळी ते बोलत होते. मंत्री राठोड म्हणाले की, २०१७ साली या विभागाला स्वतंत्र मान्यता दिल्यानंतर १६,४२३ पदांचा आकृतिबंध तयार करण्यात आला होता. ही पदे जलसंपदा व कृषी विभागाकडून वर्ग होणे अपेक्षित होते. मात्र, अद्याप ती पदे मृद व जलसंधारण विभागाला मिळालेली नाहीत, अशी माहिती मंत्री राठोड यांनी दिली.राज्यातील बदलत्या हवामान परिस्थिती, भूजल पातळीतील घसरण, व लोकाभिमुख पाणलोट व्यवस्थापन यासाठी फिल्डवर काम करणारी सशक्त यंत्रणा आवश्यक असल्याचे मंत्री राठोड यांनी स्पष्ट केले.

### एमआयडीसी पुन्हा नफ्यात आणणार- राज्यमंत्री इंद्रनील नाईक

**मुंबई/प्रतिनिधी :** डावोस येथे १५ लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार झाले आहेत. यात जेएसडब्ल्यू सारख्या मोठ्या कंपन्यांनी महाराष्ट्रात उद्योग उभारणीसाठी रस दाखवला आहे. छत्रपती संभाजीनगर, पुणे, चंद्रपूर आणि गडचिरोलीसारख्या भागांत गुंतवणूक येत आहे. त्यामुळे यावर्षी एमआयडीसीमध्ये झालेली १४१६.८२ कोटी रुपयाची तूट १००ऽ भरून काढली जाईल. एमआयडीसी पूर्वी नेहमीच नफ्यात असायची, सध्या तुटीत गेली असली तरी ती पुन्हा नफ्यात आणू, असे प्रतिपादन उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी विधान परिषदेत केले.महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची तूट भरून काढण्यासाठी करण्याच्या उपाययोजनेसंदर्भात सदस्य शशिकांत शिंदे यांनी प्रश्न विचारला होता, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी झालेल्या चर्चेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनीही सहभाग घेतला. राज्यमंत्री नाईक म्हणाले की, राज्यातील औद्योगिक क्षेत्रात देखभाल-दुरुस्ती, वाढलेली पाण्याची र?यल्टी, वीजदर, कर्मचा-यांचे वेतन व भत्ते तसेच औद्योगिक बांधकामासाठी रस्ते तयार करणे ह्यासारखा महत्त्वाच्या कारणांमुळे एमआयडीसीमध्ये यावर्षी तूट आली आहे. विदर्भ-मराठवाड्यासारख्या भागात सवलतीच्या दरात जमीन दिली जाते. पाण्यासाठी देण्यात येणार रॉयल्टी वर्षानुवर्षे बदललेली नाही, ती सुधारित करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.पाणीपट्टी संदर्भातही सांगितले की, गावांची वाढ, पाण्याच्या वापरात वाढ आणि एमआयडीसीने उभारलेली धरणं असूनही अर्ध्यापेक्षा जास्त पाणी स्थानिक स्वराज्य संस्थांना द्यावे लागते, हे देखील खर्च वाढण्याचं महत्त्वाचं कारण आहे, असेही राज्यमंत्री नाईक यांनी सांगितले.

### औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांना चालना देण्यासाठी विविध उपाययोजना सुरू

**मुंबई/प्रतिनिधी :** चंद्रपूर जिल्ह्यातील आकापूर - मारेगाव औद्योगिक क्षेत्रामध्ये १९४.२६ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली असून, या परिसरात औद्योगिकरणाला चालना देण्यासाठी विविध उपाययोजना सुरू आहेत. चंद्रपूर औद्योगिक क्षेत्रातील ५० भूखंड ऑनलाईन प्रणालीद्वारे उद्योगांसाठी उपलब्ध करून देण्यात आले होते, त्यापैकी ४८ भूखंडांचे वाटप पूर्ण झाले असून १० भूखंडावर उद्योग सुरू असल्याची माहिती उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी विधान परिषदेत दिली.सदस्य श्रीमती उमा खापरे, प्रवीण दरेकर यांनी एमआयडीसीमार्फत चंद्रपूर जिल्ह्यातील उद्योगांना देण्यात सोयीसुविधेनुसार तेथील स्थानिकांना रोजगार मिळावा, यासंदर्भात प्रश्न विचारला होता, त्यावेळी ते बोलत होते.राज्यमंत्री श्री.नाईक म्हणाले की, मागील चार वर्षांमध्ये चंद्रपूर औद्योगिक क्षेत्रात १० मोठे उद्योग स्थापित झाले आहे. या औद्योगिक क्षेत्रात सुमारे ३,०७५ कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून, जवळपास ४,७९५ रोजगाराच्या संधी निर्माण होणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तथापि, काही उद्योग विशेषतः स्टील उद्योगांमुळे पर्यावरण परवानग्यांमध्ये होणा-या विलंबामुळे त्यांच्या कामकाजास अडथळे येत आहेत.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## बालसुधारगृह सुरक्षित?

बालशिक्षणाची थोर परंपरा असलेल्या महाराष्ट्रात आज मात्र काही घटना अशा घडत आहेत की, ज्यामुळे समाज म्हणून आपण कुठे चाललो आहोत, अशी चिंता निर्माण झाली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील 'विद्यादीप' बालसुधारगृहातील अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचाराची समोर आलेली घटना गंभीर आहे. बालसुधारगृहाची सुरक्षा व्यवस्था भेदून नऊ अल्पवयीन मुलींनी पलायन केले. त्यापैकी सात मुलींचा पाठलाग करून पोलिसांकडून त्यांना ताब्यात घेतले गेले. या घटनेने बालसुधारगृहाच्या व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बालसुधारगृह हा तुरुंग वाटत असेल किंवा तेथे गैरप्रकार घडत असतील, तर त्याचे पर्यवसान अशा घटनांत होत असते. या सुधारगृहातील उघड झालेल्या घटनांनी सारा महाराष्ट्रच हादरला. सुधारगृहात मुलींचे साधे पोट दुखले, तरी प्रेग्नन्सी टेस्ट केली जाते. दुखणे कुठलेही असो, एक पांढरी गोळी उपचारासाठी दिली जाते. यातून काही मुलींना जंतुसंसर्गही झाला, असे सांगण्यात येते. दुखणे फारच गंभीर असेल, तर मुलींच्या अंगावर म्हणे 'पवित्र पाणी' शिंपडले जाते आणि कपाळावर क्रॉस काढले जाते. न ऐकल्यास मुलींना जबर मारहाण केली जाते.एका मुलीला तर तोंडातून रक्त येईपर्यंत मारझोड करण्यात आली. झोपण्याच्या खोलीत कॅमेरे लावल्यामुळे, कपडेही कॅमेऱ्यासमोरच बदलावे लागतात, अशा तक्रारी आहेत. त्यामुळे हे बालसुधारगृह म्हणायचे की छळछावणी? असा प्रश्न निर्माण होतो. अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचार प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, जिल्हा महिला बालविकास अधिकाऱ्याला तत्काळ निलंबित करण्यात येईल, चौकशी समितीचा अहवाल येताच सर्व दोषींवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत केली आहे. याप्रकरणी चौकशीसाठी तीन वरिष्ठ महिला पोलिस निरीक्षकांच्या समितीची स्थापना केली असून, त्यांनी ८० मुलींशी संवाद साधला आहे. महिला पोलिसांजवळच या लहान मुली दुःख प्रकट करू शकतील. ज्या मुली गप्प बसून सर्व सहन करत होत्या, त्याही कदाचित बोलू लागतील. संबंधित संस्थेच्या मान्यतेची मुदत संपली असेल, तर ती पुन्हा देण्यात येणार नाही आणि मान्यता असेल, तर रद्द करण्यात येईल, हा सरकारचा निर्णय स्वागतार्ह आहे. धक्कादायक म्हणजे मुलींना जबरदस्तीने धर्मांतरासाठी भाग पाडले जात असल्याच्या तक्रारी असून, त्याची गंभीर दखल घेण्याची गरज आहे. त्यासाठी जबरदस्ती करणाऱ्या महिलेवर गुन्हा दाखल करा, अशी मागणी विधान परिषदेत करण्यात आली आहे.सरकारने त्यात प्राथमिक तथ्य आढळल्यास या मागणीची अवश्य पूर्तता केलीच पाहिजे. २०१७ साली देखील नागपूरमधील शासकीय बालसुधारगृहातून १४ अल्पवयीन मुले पळाली होती. फरार मुलांमधील बहुतेक मुले परराज्यांतील होती. शहापूर येथील एका नामांकित शाळेत स्वच्छतागृहामध्ये रक्त सांडल्याचे आढळून आल्यानंतर, सव्वाशे विद्यार्थिनींची गणवेश काढून तपासणी केल्याची भयंकर घटना घडली. मुख्याध्यापकांच्या आदेशावरून, कोणाची मासिक पाळी आली आहे हे शोधण्यासाठी सहावी ते दहावीच्या विद्यार्थिनींची गणवेश उतरवून तपासणी करण्यात आली. विशेष म्हणजे शाळेमध्ये पाण्याचा अभाव असल्याने, मुलींनी भिंतीला पुसलेल्या रक्ताचे डाग प्रोजेक्टरमधून सर्व विद्यार्थ्यांना दाखवले गेले आणि विद्यार्थिनींच्या बोटांचे ठसे घेतल्याचा आरोप पालकांनी केला आहे. अर्थातच या प्रकारामुळे विद्यार्थिनी भेदरलेल्या असून, त्यांच्या मानसिक स्थितीवर गंभीर परिणाम झाला आहे. मुख्याध्यापिकांवर कारवाई झाली असली, तरी संस्थाचालक काय करत होते, असा प्रश्न पडतो. बदलापूरमध्ये गेल्या वर्षी चिमुकल्यांवर अत्याचार झाला, तेव्हाही संस्थाचालकांची बेपर्वाईच त्यास कारणीभूत ठरली होती. उमलत्या वयातील मुलींना फुलांप्रमाणे जपणे आवश्यक असते. त्यांची काळजी घेण्याचे सोडून शारीरिक तपासणी करण्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला. विद्यार्थिनींना अंतर्वस्त्रे उतरवण्यास भाग पाडणाऱ्या मुख्याध्यापिकेस आणि सफाई कामगार महिलेला पोलिसांनी अटक केली असून, संस्थाचालकांसह चार शिक्षकांवर 'पोक्सो'अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. पण यासाठी संतप्त पालकांवर आंदोलन करण्याची वेळ आली, हे लक्षात घेतले पाहिजे. २०२३ मधील एका अहवालानुसार, पुण्याच्या बालसुधारगृहात अवघ्या दोन वर्षांत जवळपास ७०० मुले दाखल झाली होती. शिक्षणाचा अभाव आणि व्यसनाधीनतेमुळे बालगुन्हेगारी वाढत चालली आहे. येरवड्यात मध्यंतरी किरकोळ कारणावरून चार अल्पवयीन मुलांनी एकाला कोयत्याने वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. वाईट संगत, गुन्हेगारीचे आणि झटपट पैसे मिळवण्याचे आकर्षण, पालकांच्या दुर्लक्षामुळे बालगुन्हेगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. अल्पवयीन मुलांना अटक करता येत नसल्याने पुढील कायदेशीर कारवाई होत नाही आणि त्यांची रवानगी सुधारगृहात केली जाते. याचा गैरफायदा उचलून विविध गुन्ह्यांत अल्पवयीन मुलांचा वापर आणि सहभाग वाढला आहे. अनेक मुलांवर खून, बलात्कार, मारामारी यांसारखे गंभीर गुन्हे असतात. त्यांना बालसुधारगृहात ठेवल्यानंतर वेगवेगळे छंद, खेळांत गुंतवणे, अभ्यासात मग्न ठेवणे आणि कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे आवश्यक असते. याबाबत राज्यातील महिला व बाल शिक्षण विभागाची जबाबदारी देखील मोठी आहे. लहानपणीच मुले चुकीच्या मार्गाला लागल्यास त्यांच्या व कुटुंबीयांच्या आयुष्याचा सत्यानाश होतो. बालसुधारगृहात पाठवलेली मुले तिथे सुधारतील, त्यांना ती संधी दिली जाईल, त्यांचे समुपदेशन केले जाईल, अशी आशा असते. राज्यातीलच नव्हे तर देशभरातील बालसुधारगृहांमधील वास्तव भयावह असून त्याबाबत सरकार, समाजसेवी संस्था आणि लोकप्रतिनिधी, समाजसेवकांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. कारण जेथे विशेषतः महिला आणि मुले सुरक्षित असतात, तोच समाज प्रगती करत असतो हे ध्यानात घेण्याची गरज आहे.

# कर्नाटकात नेतृत्वबदलाचा संघर्ष कायम

कर्नाटकच्या सिद्धरामय्या सरकारमध्ये सर्व काही ठीक नाही. उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार आणि मुख्यमंत्र्यांच्या गटांनी नेतृत्वबदलाचे दावे करण्यास अलीकडेच सुरुवात केली. याशिवाय काही नेते आपल्याच सरकारला घेरण्याचा प्रयत्न करत आहेत. काहींनी भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत, तर काहींनी विकासावरून आरोप करत माध्यमांसमोर विधाने केली आहेत. त्यामुळे पक्षांतर्गत राजकीय संघर्ष जनतेसमोर आला आहे. काँग्रेसचे सरचिटणीस रणदीप सुरजेवाला यांनी निरीक्षक म्हणून बंगळूरुला येऊन आमदार आणि नेत्यांशी या विषयावर व्यक्तिशः चर्चा केली. त्यांनी ही बैठक नेतृत्वबदलासाठी नसल्याचे सांगितले असले, तरी प्रत्यक्षात ते त्यासाठीच आले होते, हे सर्वज्ञात आहे. आपले निरीक्षण आणि नेतृत्वबदलाबाबत काय केले पाहिजे, याचा अहवाल ते पक्षश्रेष्ठींना देतीलच; परंतु सरकारमधील राजकीय गोंधळ त्यांना कितपत समजला असेल, याबद्दल शंकाच आहे.

त्याचे कारण त्यांनीही नेतृत्वबदल होणार नसल्याचे सांगितले आहे. सुरजेवाला यांना कर्नाटकमध्ये का यावे लागले, याचे चिंतन केले, तर खरे कारण लक्षात येते. गेल्या एका आठवड्यात पक्षांतर्गत अशी अनेक विधाने समोर आली, ज्यामुळे काँग्रेस सरकारच्याच अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला. एकीकडे आमदार बी. आर. पाटील यांनी गृहनिर्माण विभागातील भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित केला, तर दुसरीकडे आमदार राजू कागे यांनी ढासळणाऱ्या प्रशासकीय व्यवस्थेचा मुद्दा उपस्थित केला.

याच सुमारास काँग्रेसचे आमदार इक्बाल हुसेन यांनी सत्ता परिवर्तनाचा मुद्दा उपस्थित केला. एका निवेदनात त्यांनी म्हटले होते की, पक्षश्रेष्ठींच्या मनात काही तरी मोठे चालले आहे. सत्ता परिवर्तन होण्याची शक्यता आहे. इक्बाल हे डी. के. शिवकुमार यांचे समर्थक असल्याने त्यांना मुख्यमंत्री बनवण्याची कसरत त्यांनी सुरू केली आहे. काँग्रेस पक्षश्रेष्ठींसमोर अडीच वर्षांच्या फॉर्म्युल्यावर चर्चा झाली होती.

त्यामुळे आता डी. के. शिवकुमार यांना मुख्यमंत्री करावे, अशी आठवण त्यांनी पक्षश्रेष्ठींना करून दिली होती; पण मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांचे समर्थक अशा कोणत्याही फॉर्म्युल्याला नकार देत आहेत. दरम्यान, सिद्धरामय्या यांच्या चिरंजीवांना विश्वास आहे की, ते पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करतील. नेतृत्वबदलाबाबत कर्नाटक काँग्रेसमध्ये सुरू असलेली सुंदोपसुंदी आणि परस्परविरोधी विधानांनी पक्षश्रेष्ठी नाराज झाले आहेत. त्यामुळेच तर त्यांनी सुरजेवाला यांना बंगळूरुला पाठवले.

आता अशा सर्व नेत्यांना सुरजेवाला यांच्या माध्यमातून इशारा देण्यात आल्याचे समजते. सार्वजनिक ठिकाणी अशी विधाने करणे टाळण्याचा सल्ला त्यांना देण्यात आला असल्याचे सांगितले जात आहे. सुरजेवाला यांनी काही नेत्यांशी खासगीतही चर्चा केली. आमदारांना भेटण्याचा त्यांचा निर्णय पक्षश्रेष्ठींनी सिद्धरामय्या मंत्रिमंडळात संभाव्य फेरबदल किंवा अगदी नेतृत्व बदलाबद्दल आमदारांचे मन जाणून घेण्याचा प्रयत्न म्हणून नेतृत्वाच्या विविध गटांनी पाहिला. तथापि काँग्रेस श्रेष्ठींनी नेतृत्वबदलाची शक्यता फेटाळून लावली.

सिद्धरामय्या या वर्षाच्या अखेरीस शिवकुमार यांना मुख्यमंत्री बनवतील, अशा अटकळींना पूर्णविराम मिळाला आहे. शिवकुमार गटातील आमदार गेल्या काही काळापासून दोघांमध्ये अडीच वर्षांचा कार्यकाळ वाटपाचा फॉर्म्युला अमलात येण्याची शक्यता वर्तवत आहेत. सिद्धरामय्या गटाने अशा कोणत्याही कराराचे अस्तित्व नाकारले आहे. उलट त्यांनी शिवकुमार यांच्या दोन पदे भूषवण्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. पक्षाच्या सूत्रांनी असेही सूचित केले आहे की, सध्या नेतृत्वबदलाची चर्चाही केली जात नाही. सिद्धरामय्या गटातील सूत्रांना विश्वास आहे की, ते पाच वर्षे मुख्यमंत्रीपदी राहतील.



**कर्नाटकमध्ये मागच्या वेळी समन्वय नसल्याने काँग्रेसची सत्ता गेली. आताही येथे काँग्रेस सत्तेत येऊन दोन वर्षे झाली असताना नेतृत्वबदलाच्या मागणीने जोर धरला होता. येथे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांचा गट अडीच वर्षांच्या तडजोडीकडे लक्ष वेधत आहे, पण पक्ष सिद्धरामय्या यांना बदलणार नाही. यामुळे पक्षांतर्गत संघर्ष निर्माण राहून मध्य प्रदेश किंवा राजस्थानसारखी परिस्थिती निर्माण होऊ शकते.**

मुख्यमंत्र्यांच्या जवळच्या एका नेत्याने सांगितले की, ते काँग्रेसचे एकमेव मागासवर्गीय मुख्यमंत्री आहेत. श्रेष्ठींनी अलीकडेच पक्षाच्या सुमारे दोन डझन वरिष्ठ मागासवर्गीय नेत्यांचा समावेश असलेली ओबीसी सल्लागार परिषद स्थापन केली आहे. परिषदेची पहिली बैठक लवकरच बंगळूरमध्ये होत आहे. बैठकीनंतर सिद्धरामय्या त्यांच्यासाठी जेवणाचे आयोजन करतील. अशा पार्श्वभूमीवर एका ओबीसी नेत्याला पक्षश्रेष्ठी कसे हटवू शकतात, असा सवाल केला जात आहे. काँग्रेस श्रेष्ठींमधील सूत्रांनी सांगितले की सुरजेवाला यांच्या भेटीचा उद्देश नेतृत्वातील एका गटात निर्माण झालेली निराशा दूर करणे हा होता. निधी वाटपाबाबत एक-दोन आमदारांनी उघडपणे आपली निराशा व्यक्त केली.

दुसरीकडे, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या विधानांमुळे संमिश्र संकेत मिळाले होते. ते म्हणाले होते, 'हे हायकमांडच्या हातात आहे. हायकमांडच्या मनामध्ये काय चालले आहे हे कोणीही सांगू शकत नाही. हायकमांडला पुढील कारवाई करण्याचा अधिकार आहे; परंतु कोणीही अनावश्यक समस्या निर्माण करू नये,' राज्यातील काही काँग्रेस नेत्यांनी ऑक्टोबरमध्ये नेतृत्व बदलाच्या दाव्यांबाबत विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना ते बोलत होते. सुरजेवाला यांच्या भेटीबद्दल विचारले असता खरगे म्हणाले की, सुरजेवाला यांच्या अहवालाच्या आधारे आणि त्यांच्याकडून मिळालेल्या अभिप्रायाच्या आधारे आम्ही कोणती पावले उचलायची हे ठरवू. आता खरगे यांच्या विधानाचा वेगवेगळा अर्थ लावला जात आहे. कर्नाटकमधील सत्ताधारी काँग्रेस दोन गटांमध्ये विभागली गेली आहेत.

एका गटाला सिद्धरामय्या यांना मुख्यमंत्री म्हणून कायम ठेवण्याची इच्छा आहे, तर दुसऱ्या गटाला शिवकुमार यांच्यासाठी मार्ग मोकळा होणे अपेक्षित आहे. शिवकुमार गटाच्या मते सरकारच्या कार्यकाळाच्या मध्यभागी नेतृत्वबदल करण्याबाबत करार झाला होता. अर्थात हा दावा मुख्यमंत्र्यांच्या गटाने फेटाळून लावला आहे. सप्टेंबरनंतर 'क्रांतिकारी' राजकीय घडामोडींचे संकेत देणाऱ्या सहकार मंत्री के. एन. राजन्ना यांच्या वक्तव्यानंतर बदलांबाबतच्या अटकळींना पुन्हा उधाण आले होते. अशा वेळी सुरजेवाला यांची भेट झाली आहे.

सिद्धरामय्या यांचे जवळचे सहकारी राजन्ना यांनी असेही संकेत दिले होते की, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री सतीश जारकीहोली हे शिवकुमार यांच्या जागी पुढील प्रदेशाध्यक्ष असतील. पक्षाच्या वर्तुळात मंत्रिमंडळात फेरबदलाचीही चर्चा आहे. कर्नाटकचे काँग्रेस आमदार एच. ए. इक्बाल हुसेन यांनी दावा केला होता की, शिवकुमार यांना पुढील दोन ते तीन महिन्यांमध्ये राज्याचे मुख्यमंत्री होण्याची संधी मिळू शकते. हे सरकार सत्तेत येण्यापूर्वी आमच्या (काँग्रेस) ताकदीची तुम्हाला सर्वांना माहिती आहे. हा विजय मिळवण्यासाठी कोणी संघर्ष केला, घाम गाळला आणि जोमदार प्रयत्न केले हे सर्वांना माहिती आहे.

आम्हाला विश्वास आहे की, पक्षश्रेष्ठींना परिस्थितीची जाणीव आहे आणि ते डी. शिवकुमार यांना संधी देण्यासाठी योग्य वेळी योग्य निर्णय घेतील. हुसेन यांनी सांगितले की, २०२३ च्या विधानसभा निवडणुकीनंतर काँग्रेसश्रेष्ठींनी सरकार स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्या वेळी आम्ही सर्वजण दिल्लीत एकत्र होतो. सोनिया गांधी, राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांनी निर्णय घेतला. सर्वांना हे माहीत आहे की, पुढचा निर्णयही तेच घेतील.

आपल्याला वाट पाहावी लागेल; मात्र नव्या घडामोडींनुसार त्यांच्या म्हणण्याला काहीही अर्थ नाही. पाच वर्षे आपणच मुख्यमंत्री राहू, असे सिद्धरामय्या यांनी ठामपणे सांगितले. सिद्धरामय्या आणि शिवकुमार यांचे हातात हात घालून उंचावतानाचे छायाचित्र प्रसिद्ध झाल्यानंतर त्यांनी सिद्धरामय्या हेच मुख्यमंत्री राहतील, आमच्यात कोणताही संघर्ष नाही, असे सांगितले; परंतु त्यांचे त्यापुढचे वाक्य जास्त महत्त्वाचे आहे. पक्षश्रेष्ठींचा तसा निर्णय असेल तर मी काय करणार, माझ्यापुढे काय पर्याय आहे, अशी उलट विचारणा त्यांनी केली. मागे त्यांनी पक्षाच्या निर्णयाविरोधात घेतलेली भूमिका आणि शिवकुमार आणि शशी थरूर यांच्या भाजपच्या प्रवेशाच्या चर्चा पाहता ही वादळापूर्वीची शांतता आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो.

**श्रीनिवास राव**

# शशी थरूर यांची पक्षांतर्गत बंडखोरी !

काँग्रेसचे केरळ मधील नेते शशी थरूर हे या ना त्या कारणाने गेले काही दिवस मिडिया मध्ये गाजत आहेत.मागे त्यांनी अखिल भारतीय काँग्रेसच्या अध्यक्षपदाची निवडणूक लढवली, तेंव्हा ते बरेच दिवस प्रकाश झोतात होते.सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या अगदी निकटचे असलेल्या मल्लिकार्जुन खर्गे यांच्या विरोधात अध्यक्षपदाची निवडणूक लढवण्याचा त्यांचा निर्णय धाडसी असाच होता.परंतु ते धाडस त्यांनी दाखविले आणि निवडणुकीत चुरस निर्माण केली.मल्लिकार्जुन खर्गे हे थरूर यांचा खूप मोठ्या मताधिक्याने पराभव करतील,असा जो अंदाज व्यक्त केला जात होता,तो अंदाजही त्यांनी खोटा ठरवला.

मल्लिकार्जुन खर्गे यांच्या विरोधात शशी थरूर यांनी एक हजाराहून अधिक मते मिळवून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला.कोण आहेत शशी थरूर? शशी थरूर यांनी जून २००२ ते फेब्रुवारी २००७ या काळात संयुक्त राष्ट्रांचे उप सरचिटणीस - संपर्क आणि सार्वजनिक माहिती या पदावर काम केले आहे.२००६ साली संयुक्त राष्ट्रांच्या सरचिटणीस पदाच्या निवडणुकीत ते भारताचे अधिकृत उमेदवार होते.त्या निवडणुकीत ते क्रमांक दोनवर राहिले होते.मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये ते परराष्ट्र राज्यमंत्री होते.२००९ साली ते केरळ मधील तिरुअनंतपुरम मतदार संघातून पहिल्यांदा लोकसभेवर निवडून आले.त्यानंतर ते तिरूअनंतपूरम या मतदार संघातून कॉंग्रेसच्या तिकीटावर तीन वेळा निवडून आले आहेत.



बंडखोर प्रवृत्तीचे,शशी थरूर हे आपल्या निरनिराळ्या वक्तव्यांमुळे कॉंग्रेसची डोकेदुखी होऊन बसले आहेत.ऑपरेशन सिंदूर प्रकरणानंतर केंद्र सरकारने,भारताची बाजू निरनिराळ्या देशांत मांडण्यासाठी काही शिष्टमंडळे वेगवेगळ्या देशात पाठवली होती.त्या शिष्टमंडळांचे नेतृत्व शशी थरूर यांनी केले होते.या शिष्टमंडळात समावेश करण्यासाठी, कॉंग्रेसतर्फे जी नावे सुचविली गेली होती,त्यामध्ये शशी थरूर यांच्या नावाचा उल्लेख नव्हता.परंतु केंद्र सरकारने त्यांचा शिष्टमंडळात समावेश केला आणि परराष्ट्र धोरणावरील त्यांचा अभ्यास लक्षात घेता त्यांच्याकडे शिष्टमंडळाचे नेतृत्व सोपवले.

कॉंग्रेसने यावर थोडी नाराजी व्यक्त केली,पण ते प्रकरण तिथेच संपणार नव्हते.शशी थरूर यांनी भारताची बाजू भक्कमपणे मांडली.त्यांचा अनुभव लक्षात घेता, त्यांच्याकडून ते अपेक्षीतच होते.परंतु त्यांनी परराष्ट्र धोरणाबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची केलेली तारिफ, कॉंग्रेसला रूचणार नव्हतीच.त्यावरून कॉंग्रेसच्या काही नेत्यांनी त्यांच्यावर टिकाही केली.ते भाजपाचे सुपरस्पोक्सपरसन असल्याची टिका त्यांच्यावर करण्यात आली.शशी थरूर यांचे नाव न घेता कॉंग्रेसचा एक नेता म्हणाला की, आमच्यासाठी राष्ट्र प्रथम आहे आणि पक्ष नंतर आहे परंतु काही जणांसाठी मोदी प्रथम आहेत आणि राष्ट्र नंतर आहे.

शशी थरूर यांच्यावर ही टिका सुरू असतानाच, त्यांनी केरळ मधील एका स्थानिक वर्तमानपत्रात आणीबाणीवर टिका करणारा लेख लिहून आणखी खळबळ उडवून दिली.त्यांनी आणीबाणी जारी केल्याबद्दल माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यावर टीका केलीच शिवाय त्यांचे सुपुत्र संजय गांधी यांच्यावरही टीका केली.सक्तिची नसबंदी आणि दिल्लीतील तुर्कमान गेट परिसरातील झोपडपट्ट्यांवर बुलडोझर फिरवण्यात आला,त्या संबंधात संजय गांधी यांच्यावर त्यांनी टीका केली.ही टीका अर्थातच कॉंग्रेसच्या जिव्हारी लागली.एवढेच नव्हे तर आणीबाणी हा काळा अध्याय होता अशी टिप्पणी करून, थरूर यांनी कॉंग्रेसच्या जखमेवर मीठ चोळले.त्यानंतर एका सर्व्हेचा उल्लेख करून, थरूर यांनी केरळ मधील कॉंग्रेसच्या काही नेत्यांना डिवचले.

या सर्व्हेनुसार पुढील वर्षी होणाऱ्या केरळ विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसचा विजय झाल्यास, मुख्यमंत्री पदासाठी शशी थरूर यांना २८.३ टक्के लोकांनी पसंती दर्शविली आहे.यावरुन मग केरळमधील कॉंग्रेसच्या काही नेत्यांनी टीका टिप्पणी केली.केरळमधील कॉंग्रेसचे नेते मुरलीधरन यांनी,शशी थरुर यांना प्रश्न केला की, थरूर यांनी प्रथम ते नक्की कोणत्या पक्षात आहेत, हे ठरवावे.कॉंग्रेसप्रणित युनायटेड डेमॉक्रॅटिक फ्रंटचा पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत विजय झाला तर कॉंग्रेसकडे मुख्यमंत्री पदासाठी योग्य असे अनेक उमेदवार आहेत.शिवाय मुख्यमंत्री पदाचा उमेदवार निवडण्याची, एक विशिष्ट पद्धत आहे.शशी थरूर हे कॉंग्रेसमध्ये नाराज असतील आणि त्यांची पक्षामध्ये घुसमट होत असेल तर त्यांनी पक्षातील सर्व पदांचा राजीनामा द्यावा आणि आपला मार्ग निवडावा,असा सल्लाही मुरलीधरन यांनी थरूर यांना दिला.एकंदरीत शशी थरुर हे पक्षात नाराज असले तरी ते पक्षाचा त्याग करून भाजपामध्ये जातील असे वाटत नाही.परंतु आपल्या परखड स्वभावानुसार, शिस्तभंगाच्या संभाव्य कारवाईला न घाबरता ते पक्षावर टीका करत राहतील, अशीच शक्यता दिसून येत आहे.कॉंग्रेसचा आजवरचा इतिहास पाहता,शशी थरूर यांच्याविरोधात कारवाई होण्याची शक्यता फारच कमी आहे.

**अभय गोखले**

## जगात मुस्लीम लोकसंख्येचा विस्फोट होणार

संपूर्ण जग आज तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहे. कधी युद्धाचा भडका उडेल हे सांगता येत नाही. राक्षशी महत्वकांक्षा, विस्तारवादी वृत्ती, व्यापार युद्ध म्हणजे आर्थिक गणितं यामुळे संपूर्ण जग होरपळत असताना, त्यात आतंकवादाचे चटकेही जग रोज सोसतच आहे. अशा सर्व स्फोटक परिस्थितीत अमेरिकेच्या प्यु रिसर्च सेंटरच्या अहवालाने जगाची झोप उडवली आहे. या सेंटरच्या अहवालानुसार जगात मुस्लीम लोकसंख्येचा विस्फोट होणार आहे. २०१० ते २०२० पर्यंतच्या अभ्यासावरून काढलेल्या निष्कर्षात या दहा वर्षात मुस्लीम लोकसंख्येत ३४.७ कोटींनी वाढ झाली आहे. त्यामुळे इस्लाम हा जगातील सर्वात वेगाने वाढणारा धर्म ठरला. संपूर्ण जगातले मुस्लीम साधारण १५ ते ४९ या वयोगटातील आहेत. जगात हिंदूंची संख्या १.२ अब्ज आहे. भारतात मुस्लिमांची १४.३ टक्क्यांवरून १५.२टक्के झाली आहे. म्हणजेच भारतातल्या मुस्लीम लोकसंख्येमध्ये ३.५६ कोटींची वाढ झाली आहे. मात्र गेल्या दहा वर्षात हिंदूंच्या प्रमाणात १टक्के घट झाली आहे.लोकसंख्येच्या बाबतीत भारत हा आधीच जगात पहिल्या क्रमांकावर आहे. अशा परिस्थितीत भारतातील लोकसंख्या( विशेषतः मुस्लिमांची) अशीच वाढत राहिली तर, भविष्यात नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास तर होईलच पण अन्नधान्याचा तुटवडा आणि प्रचंड बेरोजगारीला आळा घालण्याचे मोठे आव्हान आपल्यासमोर असेल.

**माधवी पत्की**
नागपूर

## पावसाळा : निरोगी राहण्याचे सूत्र!

सृष्टीला नवजीवन देणारा ऋतू म्हणजे पावसाळा! बहरलेली सृष्टी, झाडाझुडपांची हिरवळ यामुळे मन प्रसन्न होते. मात्र, या ऋतूमध्ये हवा दमट असते, रोगजंतूंची संख्या वाढते, पाणी दूषित होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे सर्दी, ताप, त्वचाविकार, जंतुसंसर्ग, डेंग्यू, मलेरिया यांसारखे आजार पसरतात. म्हणूनच या ऋतूत आपले आरोग्य जपण्यासाठी विशेष काळजी घेणे आवश्यक असते. पावसाळ्यात पचनशक्ती कमी होते. भूक मंदावल्यामुळे अपचनाचे विकार होतात. यावर उपाय म्हणजे आठवड्यातून एखादा दिवस एकभुक्त राहावे, म्हणजे दुपारी व्यवस्थित जेवण करून रात्री न जेवणे. हे आरोग्याच्या दृष्टीने फायदेशीर ठरते. रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी ताजी फळे, भाज्यांचा आहारात समावेश करावा. डेंग्यू, मलेरिया या आजारांपासून बचाव करण्यासाठी घराच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवावा. डासांचे प्रमाण वाढू नये म्हणून घरात व सभोवताल पाणी साठू देऊ नये. पावसाळ्यात थोडी अधिक जागरूकता व काळजी घेतल्यास आपण सहजपणे निरोगी राहू शकतो.स्वच्छता, योग्य आहार आणि वैयक्तिक स्वच्छतेचे पालन, हेच या ऋतूतील आरोग्याचे मंत्र आहेत.

**प्रिया बागडदेव**
छिंदवाडा

जनमाध्यम सवाद
वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया, मत-मतांतरे ९८२२६६४०६७ क्रमांकावर पाठवा.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# मंगल कार्यालयांचे जीएसटीत घोळ : ग्राहकांच्या खिशाला चोट

## विवाह सोहळ्यांमध्ये लाखो रुपये खर्च ; मात्र जीएसटीची पावती नाहीच!



**कर विभाग आणि स्थानिक प्रशासन झोपेत?**

या सर्व प्रकारावर जीएसटी विभाग, जिल्हा प्रशासन आणि महापालिका यांची कोणतीही ठोस कारवाई दिसत नाही. परिणामी व्यावसायिक बिनधास्तपणे जीएसटी बुडवतात, आणि शासनाच्या तिजोरीत जाणारे कोट्यवधी रुपये खिशात घालतात.

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - विवाह म्हटलं की आनंद, सोहळा, नातेवाईकांची रेलचेल... आणि त्यासोबतच येतो लाखोंचा खर्च! विशेषतः मंगल कार्यालय, लॉन, डेकोरेशन, जेवण व्यवस्थापन यासाठी हजारो-लाखो रुपये मोजावे लागतात. मात्र या खर्चामध्ये सर्वसामान्य ग्राहकांच्या नकळत एक मोठा आर्थिक गैरप्रकार घडतो आहे तो म्हणजे जीएसटी घोटाळा.

अनेक मंगल कार्यालये, लॉन्स, इव्हेंट मॅनेजमेंट सेवा, कॅटरिंग कंपन्या ग्राहकांकडून जीएसटीसह पैसे वसूल करतात, मात्र त्याबाबत कोणतीही अधिकृत पावती, बिल अथवा कर पावती देत नाहीत. जीएसटी कायद्याच्या उल्लंघनासारखी ही गंभीर बाब असून, बोगस बिल प्रणालीच्या माध्यमातून सरकारची मोठ्या प्रमाणात फसवणूक केली जाते. सध्या एक विवाह सोहळा आयोजित करण्यासाठी मंगल कार्यालयाचे भाडे, वीज, पाण्याचा वापर, स्वयंपाकासाठी लागणाऱ्या भांड्यांची यादी, सजावट, जेवणाची सोय, स्वच्छता आदींसाठी ग्राहकांकडून १ ते ३ लाखांपर्यंत रक्कम घेतली जाते. या व्यवहारांवर सर्रास ५% ते १८% जीएसटी आकारला जातो, पण बिलात जीएसटीचा उल्लेखही नसतो. ग्राहक हे विवाह सोहळ्याच्या घाईत असल्याने बरेचदा याकडे दुर्लक्ष करतात.

विशेष म्हणजे कोणताही शासकीय दर नियम नसल्याने गरीब किंवा मध्यमवर्गीयांना देखील तेवढाच खर्च करावा लागतो, जितका उच्चभ्रू कुटुंबाकडून घेतला जातो. नियम सर्वांसाठी समान, पण सेवा व सवलती मात्र ओळखी नुसार ठरतात. स्थानिक पातळीवर पाहिल्यास, यवतमाळसह अनेक जिल्ह्यांमध्ये अशा कार्यालयांचे व्यावसायिक निधड्या चेहऱ्याने कर चुकवतात. काही ठिकाणी तर उघडपणे सांगितले जाते की, "बिल हवे असेल तर वेगळी रक्कम द्यावी लागेल." ही जबरदस्ती ग्राहकांच्या खिशावर अन्याय असून, कर प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अशा घटना वाढत आहेत.

# हक्काच्या घरासाठी आदिवासी काँग्रेसचा ठिय्या आंदोलन!





**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - नेताजी नगर, अंबानगर, तलावफैल, पिंपळगाव झोपडपट्टी, तायपुरा आदी भागांतील गोरगरीब बेघर नागरिकांनी आज आदिवासी काँग्रेस कमिटीच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार ठिय्या आंदोलन केले. या आंदोलनाचे नेतृत्व नंदु कुडमेथे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

शहर काँग्रेस अध्यक्ष व माजी आरोग्य सभापती नगरपरिषद यवतमाळ यांनी उपस्थितीत आंदोलनात हजारो नागरिकांचा सहभाग होता. "सर्वांसाठी घरे-२०२२" या योजनेअंतर्गत मागील अनेक वर्षांपासून झोपडपट्टीत राहणाऱ्या गरीब व मागासवर्गीय नागरिकांना घरे व शासकीय जमिनीवर कायमस्वरूपी पट्टे मिळावेत, या मागणीसाठी सतत निवेदने, पत्रव्यवहार करूनही अद्याप कोणत्याही लाभार्थ्यांना हक्काचे घर मिळालेले नाही, असा आरोप यावेळी करण्यात आला. निवेदनात स्पष्ट करण्यात आले की, शासनाचे परिपत्रक असूनही संबंधित विभाग कार्यवाहीत विलंब करत असून, गेल्या ८ वर्षांपासून केवळ आश्वासनावरच नागरिकांची बोळवण होत आहे. शासनाने त्वरीत हस्तक्षेप करून योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना घरे व पट्टे वितरित करावेत, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. यावेळी आ. बाळासाहेब मांगुळकर, नगरपरिषद यवतमाळचे मुख्याधिकारी यांना देखील निवेदनाची प्रत देण्यात आली असून आवश्यक ती कार्यवाही त्वरित करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# ३२८ नव्या दारू परवाने देण्याच्या निर्णयाला महिलांचा तीव्र विरोध

## "लाडकी बहीण योजना चालविण्याकरिता घर उद्ध्वस्त करणारी योजना आणणार का?



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - राज्यातील शांततामय वातावरण आणि सामाजिक स्थैर्य धोक्यात येईल, असा आरोप करत महिलांनी राज्य शासनाच्या ३२८ नवीन दारू दुकान परवाना धोरणाचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. याच पार्श्वभूमीवर विश्रामगृह येथे एक पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी महाराष्ट्र दारूबंदी व्यसनमुक्ती च्या संगीता पवार, सामाजिक कार्यकर्ते अभय व्यास, दुर्गा पटले, संगीता सरोदे, सरला झगळे, गौतम बनसोड, पूजा वानखडे आदी उपस्थित होते. त्यांनी सांगितले की, "दारू दुकानांच्या वाढत्या संख्येमुळे महाराष्ट्राची वाटचाल उत्तर प्रदेशासारख्या अस्थिर राज्याकडे होऊ शकते."

संगीता पवार म्हणाल्या, "आम्हाला १५०० रुपये नकोत,आधीच अनेकांच्या संसारावर कुऱ्हाड चालवणारी ही धोरणं थांबवा, घरात माणसं दारूमिध्यात बुडाली असून अपघात, हिंसाचार आणि व्यभिचार वाढले आहेत. आता नवीन दुकानं उघडल्यावर स्थिती आणखी बिघडेल." राज्य शासनाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली गठित समितीमार्फत ३२८ नवीन दारू दुकानांचे परवाने देण्याचे ठरवले आहे.मात्र १९७२ पासून असलेली नवीन परवान्यांवरील बंदी डावलून हे पाऊल उचलल्याने महिलांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. महसूल वाढीच्या नावाखाली शासन समाजविघातक निर्णय घेत असल्याचा आरोप करत आंदोलनाचीही तयारी दाखवण्यात आली आहे. "जर शासनाने हा निर्णय मागे घेतला नाही, तर महिलांच्या नेतृत्वाखाली जनतेच्या माध्यमातून तीव्र आंदोलन उभारले जाईल," असा इशारा पत्रकार परिषदेत देण्यात आला. या निर्णयाच्या विरोधात महिलांनी जिल्हाधिकारी यवतमाळ यांना निवेदन सादर केले असून, शासनाने तातडीने निर्णय मागे घ्यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे विज्ञानवादी संत होते

## यशवंत देशमुख यांचे प्रतिपादन, गुरुदेव सेवा मंडळातर्फे गुरुपौर्णिमा उत्सव साजरा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - गुरु डोळस असतील तर अनुयायी रूढी, परंपरा व कर्मकांडापासून दूर राहतात. गुरूंच्या विचारसरणीतून समाजाला प्रगतीची दिशा मिळते. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीता ग्रंथासह लोकांसाठी व सीमेवरील जवानांसाठी विविध भजने, पुस्तके व इतर साहित्य लिहून भारतीय समाजाला डोळस बनविण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे विज्ञानवादी संत असल्याचे प्रतिपादन गुरुदेव सेवा मंडळाचे मध्यवर्ती प्रतिनिधी यशवंत देशमुख यांनी येथे केले.

गुरुदेव सेवा मंडळ, तालुका शाखा पुसदच्या पुढाकाराने येथील देशमुखनगरमधील जिजामाता चौकातील मंडळाच्या सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थनास्थळी गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मंडळाचे तालुकाध्यक्ष प्रा प्रकाश लामणे होते. यावेळी सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना, ग्रामगीता ग्रंथ 'महिलोन्नती' अध्यायाचे पारायण, राष्ट्रवंदना व जयघोष करण्यात आला. यावेळी सर्व अनुयायांनी आपले गुरुवर्य अर्थात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना वंदन केले.

त्यानंतर सर्व उपस्थित अनुयायांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची खंजिरी भजने सामसंगीत सादर केली. याप्रसंगी स्पक प्रशांत आत्राम या चिमुकल्याने उत्कृष्ट तबलावादन करून उपस्थितांची वाहवा मिळविली. हार्मोनियमची साथ ज्ञानेश्वर तायलोडे व यशवंत भगत यांनी तर खंजेरीची साथ कोषाध्यक्ष सुरेश कदम व हभप भीमराव महाराज पवार यांनी दिली. यशस्वीतेसाठी मंडळाचे कार्याध्यक्ष प्रा नंदकुमार खैरे, उपाध्यक्ष मनोहर बनस्कर, सचिव ॲड गजानन साखरे, रमेश सरागे, माधव जाधव, अनिल अस्वार, विठ्ठल येवले, किसन गरडे, पुंडलिक भालेराव, बाबासाहेब वाघमारे, प्रशांत आत्राम, राजू पुरी, पांडुरंग शिनगारे, वसंत ढोले, राजू बनस्कर, कैलास मस्के, महिला प्रतिनिधी छाया प्रकाश लामणे, चंदा गोडसे, इंदू राऊत, माधुरी वांजाळ, विमल वाघमारे, ताई तिवारी आदींनी परिश्रम घेतले. यावेळी पुसद शहर व परिसरातील गुरुदेव प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाईन बारवर वाढलेला ५०% वॅट अन्यायकारक!

## यवतमाळ वाईन बार असोसिएशनकडून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - शासनाच्या वतीने वाईन बारवरील वॅट करात ५० टक्केवाढ करण्यात आल्याच्या निषेधार्थ यवतमाळ वाईन बार असोसिएशनने जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले. या वाढीमुळे व्यवसाय धोक्यात आला असून, शासनाने निर्णय मागे घ्यावा अशी जोरदार मागणी करण्यात आली. वाईन बार असोसिएशनचे अध्यक्ष राम बेले, सचिव नरेश तोलवाणी, तसेच दिलीप बजाज, विनोद तलरेजा, हरीश अडवाणी, दीपक जयस्वाल, कमल जयस्वाल, सनी लोणकर, पप्पू पलटणकर व इतर बार मालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, संपूर्ण महाराष्ट्रात सुमारे २०,००० एफ.एल.-३ परवाना धारक बार असून सुमारे १३ लाख कुटुंबांचा उदरनिर्वाह या व्यवसायावर अवलंबून आहे. यवतमाळ जिल्ह्यातच ४१० बार असून, सुमारे १२,००० लोकांना रोजगार मिळतो. मात्र, शासनाच्या वाढत्या करवाढीमुळे यावर कमडे मोडेल आहे. गेल्या काही वर्षांत राज्यभरातील सुमारे ११०० बार बंद झाले असून यवतमाळमध्येही ८ बार बंद पडले आहेत.

यावर्षी करात १५% वाढ झाल्यानंतर आता ५०% वॅट वाढवून सरकारने 'जुलमी' निर्णय घेतला आहे, असा आरोप असोसिएशनने केला. अवैधरित्या दारू विक्री करणारे हातगाडी, अंडा-राईस सेंटर, खानावळी व ढाबे यांच्या विरोधात कारवाई व्हावी अशी मागणीही करण्यात आली. अधिकृत बार कडून मोठ्या प्रमाणावर शासनाला महसूल दिला जात असूनही त्यांच्यावर अन्याय केला जात असल्याचे निवेदनात नमूद आहे.

या प्रश्नावर विदर्भ पातळीवर बैठकीत निर्णय घेऊन १४ जुलै रोजी विदर्भ बंदचा इशारा देण्यात आला. अमरावती येथे चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, बुलढाणा, नागपूर, अकोला, वाशिम आदी जिल्ह्यांतील ३६० प्रतिनिधींच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत या आंदोलनाला सर्वानुमते पाठिंबा देण्यात आला. मुंबई, पुणे, ठाणेतील असोसिएशनींही या बंदमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे.

# वेचक



## ब्ल्यु भीम टायगर कामगार सेनेचे पूर्णनग्न आंदोलन

यवतमाळ – यवतमाळ नगर परिषद प्रशासनाच्या मनमानी कारभाराविरोधात मागण्या मान्य न झाल्यास १४ जुलैपासून पूर्णनग्न व उग्र आंदोलन करण्यात आले. ब्ल्यु भीम टायगर अस्थायी कामगार सेनेने नगर परिषद यवतमाळ येथे केले आहे. १६ जूनपासून साखळी उपोषण सुरू असून अद्याप कोणतीही कार्यवाही न झाल्याने ही चेतावणी देण्यात आली आहे. ९ जुलै रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. कामावरून काढलेल्या सफाई कामगारांना पुन्हा कामावर घेणे, किमान वेतन, PF-ESIC लाभ, ठेकेदाराची चौकशी, आणि आरोग्य विभाग प्रमुखाची बदली या प्रमुख मागण्या आहेत. आंदोलनादरम्यान भोंग्याच्या वापरासाठी परवानगीचीही मागणी करण्यात आली आहे.

## मद्यकर वाढीच्या विरोधात बार मालकांचा लाक्षणिक बंद



पुसद - महाराष्ट्र शासनाने बार व्यवसाय, परमिट रूम मद्य विक्री करणारे व्यवसाय संचालक दुकानावर राज्य शासनाने विदेशी मद्यावर ५१० टक्के ड्युटीवाढ, १० टक्के विक्री कर तसेच परवाना शुल्कात दरवर्षी १५ टक्के शुल्कवाढ करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या निर्णयामुळे व्यवसायावर विपरीत परिणाम होणार आहे. महाराष्ट्र शासनाने घेतलेले तीनही निर्णय त्वरित मागे घ्यावे याकरिता संपूर्ण राज्यातील बार संचालक,परमिट रूम संचालक यांनी लाक्षणिक बंद पुकारून शासनाचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. महाराष्ट्र राज्यातील संबंधित बार संचालक व परमिट रूम संचालकांनी पुकारलेल्या लाक्षणिक बंदला पुसद येथील बार संचालक व परमिट रूम संचालक यांनी आपला पाठिंबा दर्शवित आपापली प्रतिष्ठाने बंद ठेवली आहे. पुसदयेथील समस्त बार संचालक तथा परमिट रूम संचालकांनी उपविभागीय कार्यकारी अधिकारी तथा दंडाधिकारी पुसद यांचे मार्फत राज्याचे मुख्यमंत्री यांना लाक्षणिक बंद पुकारल्याबाबतचे निवेदन देऊन त्वरित निर्णय मागे घेण्याची विनंती केली आहे. महाराष्ट्र शासनाने बार संचालक तथा परमीट रूम संचालक यांचे वर वारंवार बंद पुकारुण आंदोलन पुकारण्याची परिस्थिती उद्भवू नये त्याकरिता महाराष्ट्र शासनाने केलेली संबंधित वाढ त्वरित मागे घेण्याची निवेदनातून मागणी केली आहे.

## सरपंच पदाच्या आरक्षणासाठी १८ जुलै रोजी तहसील कार्यालयात सोडत

दिग्रस : शासनाच्या 13 जून 2025 रोजीच्या अधिसूचनेनुसार यवतमाळ जिल्ह्यातील सार्वत्रिक निवडणुकांद्वारे गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी सुधारित आरक्षण निश्चित करण्यासाठी तालुका स्तरावर सोडत प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. दिग्रस तालुक्यासाठी ही सोडत प्रक्रिया दिनांक 18 जुलै 2025 रोजी दुपारी 12.00 वाजता दिग्रस तहसील कार्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात येत आहे. तरी सर्व संबंधित नागरीकांनी व ग्रामपंचायत सदस्यांनी सोडतीस उपस्थितीत राहण्याचे आव्हान करण्यात आले आहे. या सोडतीद्वारे अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, व इतर मागासवर्गीयांसह (ना.मा.प्र.) महिला आरक्षण निश्चित केले जाणार आहे. यासाठी तहसीलदार तथा प्राधिकृत अधिकारी यांच्या अधिपत्याखाली ही प्रक्रिया पार पडणार असून, उपविभागीय अधिकारी हे या सोडतीचे नियंत्रण अधिकारी म्हणून उपस्थित राहणार आहेत. ग्रामपंचायतवार सरपंच पदासाठी आरक्षण निश्चित करण्याची ही प्रक्रिया जिल्ह्यातील सर्व 16 तालुक्यांमध्ये 17 व 18 जुलै रोजी पार पडणार आहे. ग्रामपंचायत पातळीवर होणाऱ्या निवडणुकांसाठी ही सोडत प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची असून, यामुळे निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणि समावेशकता सुनिश्चित होणार आहे.

# बोगस राजपुत भामटा घुसखोरांना गोरसेनेचा पुन्हा दनका

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - वि.जा.अ प्रवर्गातील जात प्रमाणपत्र 2000 कायदा नुसार २१ नोव्हेंबरच्या १९६१ पूर्वीचा जात पुरावा बघून जात प्रमाणपत्र निर्गमित करण्या बाबत व दर महिन्यातील निर्गमित केलेल्या जात प्रमाणपत्राची यादी प्रसारीत करावी.महाराष्ट्रात बंजारा समाज हा विमुक्त जाती- अ प्रवर्गात समाविष्ट आहे. बंजारा समाज हा मोठ्या प्रमाणात ग्रामीण व दुर्गम भागात वास्तव्यास आहे. मागील अनेक वर्षांपासून बोगस कागदपत्रांचा आधार घेवून मोठ्या प्रमाणात विमुक्त जाती- अ या प्रवर्गात राजपूत समाज, छप्परबंद समाज बोगस घुसखोरी करीत आहे .या समाजातील काही लोकावर गुन्हे दाखल झाले आहे व काही वर न्यायालयीन खटले चालू आहे.

जात प्रमाण पत्र निर्गमित करतांना मानीव दिनांक 21 नोव्हेंबर 1961 च्या अगोदर चा जात संबधित पुरावा बघून जात प्रमाण पत्र निर्गमित करणे अनिवार्य आहे. आणि 2000 कायदा, 2012 अधिनियम 5-(8), 8 (e), (f) नुसार व सर्वोच्च न्यायालयाच्या निकाला नुसार दर महिन्यात निर्गमित केलेल्या जात प्रमाण पत्राची यादी प्रसारीत करणे आवश्यक आहे. जेणे करून आम्हास आक्षेप घेण्यास सोपे होईल. परंतु असे होतांना दिसून येत नाही. यामुळे खरे लाभार्थी आरक्षणा पासून वंचित होत आहे. सबब सदर बाब कायदा नुसार अत्यंत गंभीर आहे. संबधित पुरावा बघूनच जात प्रमाण पत्र देण्यात यावे आणि दर महिन्याला निर्गमित केलेल्या जात प्रमाण पत्राची यादी प्रसारीत करण्यात यावी आणि त्या बाबत जर आमचे आक्षेप असेल तर सुनावणी घेऊन सखोल चौकशी करण्यात यावे.सर्व तालुका मध्ये जात प्रमाणपत्र काढण्याची मोहीम चालू आहे. तरी आपण आपल्या स्तरावरून कायदा 2001, अधिसूचना 2012 यांचे पालन करून मूळ विमुक्त जाती मधील उमेदवारांना न्याय द्याल अशी अपेक्षा केली आहे प्रा संदेश चव्हाण अध्यक्ष, गोरसेना प्रा डॉक्टर अनिल राठोड, सजना अर्जुन राठोड, गोर सेना डॉ. जगदिश राठोड कार्यकारणी सदस्य नॅशनल सेवा डॉक्टर असोसिअशन डॉक्टर अनिल साळुंखे अध्यक्ष, अखिल भारतीय राजपूत भामटा आघाडी गोरसेना या संघटने कडून संपूर्ण महाराष्ट्रभर निवेदन देण्यात आले आहे.

# सातबारा कोरा करण्यासाठी राळेगावत पथ्य नाट्यातून केली जनजागृती

**जनमाध्यम प्रतिनिधी**



राळेगाव - बच्चूभाऊ कडू यांच्या नेतृत्वात ७/१२ कोरा करण्यासाठी सोमवार दिनांक ७ जुलै २०२५ पासून पापळ ते चिलगव्हाण, १३८ किमीची 'पदयात्रेला सुरुवात केली असून त्याबाबत राळेगाव येथे सातबारा कोरा करा कोरा करा अशी जनजागृती आज दि.१३ जुलै २०२५ रोज रविवारला गजानन वानखेडे यांनी आपल्या पथनाट्यातून सादर केली आहे.

यावेळी उपस्थित भय्यासाहेब गावंडे, मंगेश राऊत, नगरसेवक संजय दुरबुडे, प्रहार तालुका अध्यक्ष, गणपतराव ताटेवार, दिलीप कनिाके, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) तालुकाअध्यक्ष अरविंद तामगाडगे, नितीन कोमेरवार, भारत दुने, प्रवीण काकडे, दिलीप मानकर, मंगेश पिंपरे, वसंत कोमेजवार, शुभम चिडाम, रुपेश कोठारी, रोहित वर्मा, अशोक भागवत, अशोक पिंपरे, फिरोज शेख, संदेश शेंडे, सुरज रामगडे, शकिल शेख, रविंद्र रामगडे, नानाजी तोडासे, राजेश काकडे, महेश तोडासे, सुरज कोवे, सुनील मोकडे, आयुश मेसरे, अनुप मेसरे, पिंपळखुटी येथील शेतकरी, तसेच राळेगाव येथील शेतकरी होते. तसेच १४ जुलै २०२५ रोजी बच्चू कडू यांची अंबोडा (महागाव) येथे भव्य सभा आयोजित करण्यात आली आहे.

बच्चू कडू यांच्या सभेत सामील व्हायचे आहे तरी राळेगाव तालुक्यातील शेतकरी शेतमजूर दिव्यांग कष्टकरी बांधवांनी तसेच प्रहार जनशक्ती पक्षाच्या कार्यकर्त्यांनी समस्त शेतकरी बांधवांनी अंबोडा या ठिकाणी उपस्थित राहावे असे आवाहन प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुका अध्यक्ष संजय दुरबुडे यांनी केले आहे.

# न.प. हद्दीतील अतिक्रमणाविरुद्ध शहर भाजपचे १४ जुलै पासून उपोषण सुरू

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - अतिक्रमणाचे माहेरघर झालेल्या पुसद नगर परिषद हद्दीतील अतिक्रमणाविरुद्ध पुसद शहर भाजप ने आक्रमक भूमिका घेत १४ जुलै पासून नगरपरिषद कार्यालया समोर उपोषणाचा ईशारा देण्यात आला होता.

भाजप शहराध्यक्ष निलेश पेन्शनवार यांनी काल नगर परिषद मुख्याधिकारी यांना निवेदन वजा उपोषणाचे ईशारा पत्र दिले. १९ मे २०२५ रोजी पक्षाकडून शहरातील अतिक्रमण हटविण्याबाबत मुख्याधिकारी यांना निवेदन दिले होते. त्यात ७ दिवसाच्या आत अतिक्रमण न काढल्यास आमरण उपोषणास बसणार असे नमुद केले होते त्या निवेदनावर ११ जुलै २०२५ पर्यंत कोणत्याही प्रकारची दखल नगरपरिषद कार्यालय, पुसद घेतली गेली नाही. त्यामुळे नाईलाजास्तव विधीमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरु असतांना राज्यामध्ये आम्हाला जनहितार्थ उपोषणाचा मार्ग अवलंबवा लागत आहे. १४ जुलै २०२५ रोजी नगर परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले असून होणाऱ्या परिणामास सर्वस्वी न. प. प्रशासन जबाबदार राहील असे नमूद करण्यात आले.

दरम्यान २७ जून २०२५ पासून वंचित बहुजन आघाडीचे घंटागाडी अनियमितता विरुद्ध साखळी उपोषण सुरु आहे. त्यामुळे न. प. प्रशासनाचा कामचुकारपणा आगामी न. प. निवडणुकीत राजकीय पक्षांना जनतेसमोर जाण्यासाठी मोठा हातभार लावत आहे.

# महिला विद्यालयात पालक सभा संपन्न



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - महिला विद्यालय यवतमाळ येथे शनिवार दिनांक 12 जुलै रोजी पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते या सभेमध्ये विविध समित्यांचे गठन करण्यात आले व व त्या समित्यांचे काय काय काम असतात हे समजून सांगण्यात आले.

शिशुविहार मंडळ यवतमाळ अंतर्गत चालणाऱ्या महिला विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय मध्ये शनिवारी 12 जुलै रोजी पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते या सभेला अध्यक्ष म्हणून पालक सभेच्या उपाध्यक्ष नंदाताई कबाडे तर शाळेच्या मुख्याध्यापिका आणि जयश्रीताई उपाध्ये तसेच पर्यवेक्षिका रेखाताईकुळमते या मंचावर उपस्थित होत्या. या पालक सभेला शाळेतील बहुतांश पालकांचे उपस्थिती होती अनेक सभेमध्ये विविध समित्यांचे गठन करण्यात आले. यामध्ये शिक्षक पालक संघ, माता पालक संघ, सखी सावित्री संघ, विशाखा समिती, तसेच विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकासन समिती निर्माण करण्यात आली.

# स्व. वसंराव नाईक स्मृती प्रतिष्ठानतर्फे कृषी पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद – हरितक्रांतीचे प्रणेते, भूमिपुत्र, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांच्या स्मृतिदिनी दरवर्षी २८ ऑगस्ट रोजी विक्रमी उत्पादन घेणाऱ्या निवडक कर्तबगार शेतकऱ्यांचा तसेच कृषी शास्त्रज्ञांचा शाल, श्रीफळ, स्मृतिमानचिन्ह व सन्मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्याची पुसदच्या वसंतराव नाईक स्मृती प्रतिष्ठानची परंपरा आहे. त्यासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

विदर्भ, मराठवाडा, प. महाराष्ट्र, खानदेश व कोकण अशा विभागातून विभागनिहाय शेतकऱ्यांनी आपल्या शेतीत विविध प्रयोग करून विक्रमी उत्पादन त्यामध्ये खर्च किती, उत्पादन (टनामध्ये) किती व बाजारपेठेत विक्री केल्यानंतर किती निव्वळ नफा झाला, याची सविस्तर माहिती द्यावी. यावर्षी कृषी शास्त्रज्ञांकरिता 'उसाचे उत्पादन वाढण्याकरिता केलेल्या विशेष संशोधन कार्याबद्दल' हा विषय निवडला आहे. ज्यांनी उसाचे उत्पादन वाढीकरिता विशेष संशोधनात्मक कार्य केलेले आहे, अशाच शास्त्रज्ञांनी त्यांचा जीवनालेख (बायोडाटा) आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करावा. शेतकऱ्यांना सोशल माध्यमांव्दारे नियमित कृषीविषयक उत्पादन आणि अधिक नफा प्राप्त केला असल्यास आपला जीवनालेख (बायोडाटा) मार्गदर्शनाबद्दल पुरस्कार-शेतकऱ्यांना नियमीत (फेसबुक युट्यूब, इंस्टाग्राम) या सोशल माध्यमांव्दारे कृषीविषयक मार्गदर्शन करणाऱ्यांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करावा. कृषी संबंधित विषयावर कार्य करणाऱ्या शेतकरी, उत्पादक कंपनी, बचत गट व सामूहिक शेती करणाऱ्यांनी देखील सविस्तर माहितीसह प्रस्ताव पाठवावा. आपले प्रस्ताव दोन पासपोर्ट फोटोसह ५ ऑगस्ट २०२५ पर्यंत पोहोचतील, अशा बेताने पाठविण्याचे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

कृषी विकासाच्या धोरणात

# शेती उत्पादन, विक्री व विपणन आदिंवर काम करण्याची गरज- आ.संजय खोडके



**अमरावती/का.प्र.**

राज्याच्या कृषी विकासाच्या दृष्टीने पुढील पाच वर्षासाठी शासनाच्या वतीने २५ हजार कोटींचा आराखडा जाहीर होत असतांना त्याअंतर्गत अमरावती विभागातही शेती विकासावर चांगले काम होणे आवश्यक आहे. कृषी विकासावर काम करत असतांना अमरावती विभागातील कापूस,सोयाबीन,तूर व संत्रा आदी पिकांची लागवड व उत्पादन,व्यवस्थापन व विपणन तसेच कृषी उद्योग व व्यवसायाच्या बाबतीत सुद्धा आवश्यक धोरण ठरविण्याची गरज आहे.त्यामुळे शासनाच्या नव्या कृषी आराखड्यामध्ये जुन्या कृषी विकासाच्या योजना व यंत्रणांना नवीन उभारी देऊन त्यांचा आराखड्यामध्ये अंतर्भाव करून आपल्याला पुढे जावे लागणार आहे. असे कृषी विकासाच्या बाबतीत अर्थपूर्ण विश्लेषण आ.संजय खोडके यांनी महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये मांडले आहे. राज्यविधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये नियम २६० च्या प्रस्तावावर चर्चा करीत असतांना आ. संजय खोडके यांनी अमरावती विभागातील कृषी विकासाच्या बाबतीतला अनुशेष,त्यामागची कारणे अडचणी व उपाययोजनांसंदर्भात सभागृहाला विस्तृतपणे माहिती दिली. त्यांनी सांगितले की,राज्यशासनाने जाहीर केलेल्या कृषी विकासाच्या आराखड्यामध्ये दरवर्षी ५ हजार कोटींचा खर्च करण्याची तयारी शासनाने दर्शविली आहे. त्यामुळे आता पर्यंत कृषी खाते ज्या कृषी सेक्टर वर पैसे खर्च करून शकले नाही, जिथे काही आर्थिक अडचणी निर्माण झाल्या होत्या , त्याठिकाणी आता चांगली गुंतवणूक व खर्च करता येणार आहे. मात्र कृषी विभागात प्रभावी नियोजन व अंमलबजावणी करीत असतांना त्यामध्ये सहाय्यक कृषी अधिकारी व पर्यवेक्षक हे त्यामधला दुवा आहे, ते फिल्डवर जाऊन काम करत असल्याने त्यांना कुठे अडचणी आहेत,या बाबतची त्यांना माहिती असते. त्यामुळे कृषी विभागातील कर्मचाऱ्यांचा बाबतीत आकृतीबंध चा प्रस्ताव शासनाकडे प्रस्तावित आहे. त्याला अंमलात आणून कृषी विभागात कृषी अधिकारी तसेच सहायक कृषी अधिकारी पर्यवेक्षक व त्यांच्या विविध संघटनाच्या माध्यमातून चांगले काम करण्याची आवश्यकता आहे. याकडे आ. संजय खोडके यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

गेल्या २०-२५ वर्षांपूर्वी कृषी विकासाच्या अनेक योजना राबविण्यात आल्या. मात्र त्या पुढे गेल्या नाहीत आणि बंद पडल्या.शासनाची एक टी अँड व्ही योजना होती, जी ग्रामीण भागातील लोकांना नवीन तंत्रज्ञान आणि पद्धती शिकवण्यासाठी प्रशिक्षण देणारी होती. तत्कालीन कृषी आयुक्तांनी ती योजना बंद केल्याने त्याचे विपरीत परिणाम कृषी विभागावर दिसून आले.

सोयाबीन च्या संदर्भात राज्यात जवळपास ३५ सॉल्वेंट प्लांट उभारण्यात आले , कारण सॉल्वेंट प्लांट असले तर त्याची खरेदी वाढते व कास्तकाराच्या मालाला भाव मिळते. परंतु आज बोटावर मोजण्याइतके सॉल्वेंट प्लांट सुरु आहे. कापसाच्या बाबतीत सुद्धा तीच परिस्थिती आहे. ग्रेडर मिळत नसल्याने अनेक कॉटन फेडरेशन बंद पडल्या असून मार्केटिंग फेडरेशन सुद्धा बंद झाल्या आहेत.अमरावती जिल्ह्यात संत्रा उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते, मात्र आज संत्रा पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव झाल्याने पिके संकटात सापडली आहे. कीड व्यवस्थापन व पिकांचे संगोपन होण्यासंदर्भात चांगले नियोजन करण्याची गरज आहे. अमरावती मध्ये सोयाबीन पीक संशोधन उपकेंद्र आहे.त्याच ठिकाणी जर दोन-चार चांगले कृषी संशोधक व शास्त्रज्ञ यांची नेमणूक केल्यास संत्रा पिकांवर प्रक्रिया करणारे संशोधन केंद्र सुरु करता येईल.आणि त्यातून संत्रा पिकांची लागवड , कीड व्यवस्थापन व उत्पादनासंदर्भात सुद्धा चांगले काम करता येणार असल्याचे आ.संजय खोडके यांनी सभागृहाला -पटवून दिले.राज्यशासनाने जो नवीन कृषी विकासाचा आराखडा जाहीर केला.त्यामध्ये कृषी विकासाच्या सर्व जुन्या योजनांचा अंतर्भाव करून त्यांना आज आधुनिक पद्धतीने बळकटी देण्यासह चांगल्या पद्धतीने राबविण्याची आवश्यकता आहे. अमरावती विभागातील कापूस, सोयाबीन, तूर व संत्रा आदी पिकांची लागवड व उत्पादन , व्यवस्थापन व विपणन तसेच कृषी उद्योग व व्यवसायाच्या बाबतीत आवश्यक सुधारणा करून त्याची योग्य अंमलबजावणी केल्यास कृषी क्षेत्राला नवी भरभराटी व समृद्धी निश्चितच प्राप्त होणार असल्याचा विश्वास आ. खोडके यांनी आपल्या अर्थपूर्ण विश्लेषणातून व्यक्त केला आहे.

## अमरावतीतील ७१ शाळाबाह्य मुले शिक्षणाच्या प्रवाहात

**अमरावती/ का.प्र.**

जिल्ह्यात शाळाबाह्य बालकांच्या सर्वेक्षण वर्ष २०२३-२४ आणि २०२४-२५ अशा दोन वर्षात ७१ मुले शाळाबाह्य होती. परंतु शिक्षण विभागाने त्यांना शिक्षणाचे महत्व पटवून दिल्याने ही मुले शिक्षणाच्या प्रवाहात आली. परिणामी ही मुले आता शाळेत नियमित येऊ लागली आहेत.

शाळाबाह्य बालकांचे नुकतेच सवेक्षण करण्यात आले. स्थलांतरित होऊन इतर जिल्ह्यातील गेलेली मुले परतली आहेत. एकही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून शाळाबाह्य मुलांची शोधमोहीम राबवली जाते. इयत्त पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना दोन गणवेश दिले जातात. स्काऊट-गाईडचा गणवेश असतो. पायाचे मोजे आणि मोफत पाठ्यपुस्तके दिली जातात. शाळेत शालेय पोषण आहार दिला जातो. जिल्ह्यात गत दोन वर्षात राबवलेल्या शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणात शोध पथकाला वर्ष २०२३-२४ मध्ये २९ आणि २०२४-२५ मध्ये ४२ अशाप्रकारे दोन वर्षात ७१ मुले शाळाबाह्य आढळली.या सर्व मुलांची ओळख झाली असल्याने त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी विभागाकडून विविध उपक्रम आणि मोहिम सुरु करण्यात आल्या आहेत. दरम्यान असंख्य मुले अजूनही शाळांमध्ये येत नसल्याने यासाठीचे एक मोठे आव्हान शिक्षण विभागापुढे निर्माण झाल्याचे दिसून येते.

# धारणी येथे परमिट रूम दरवाढीच्या निषेधार्थ कडकडीत बंद

**धारणी/ वार्ताहर**

महाराष्ट्र शासनाने परमिट रूम धारकांवर लावलेला अन्यायी व जुलमी असा १० टक्के व्हॅट कर रद्द करण्यात यावा, या मागणीसाठी विदर्भ परमिट रूम असोसिएशनने पुकारलेल्या बंदला धारणी येथील परमिट रूम धारकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

शासनाच्या या कर धोरणाचा निषेध म्हणून धारणीमधील सर्व परमिट रूम सोमवार (ता १४) बंद ठेवण्यात आल्या.या बंदमध्ये मेळघाट बार, रसना बार, जय भवानी बार, नील बार, अंबर बार, मेजवानी बार, बैठक



### मेळघाटातील बार मालकांचा सहभाग

बार तसेच आमनेर बार यांसह इतर परमिट रूम धारकांनीही सहभाग घेतला.

'कोरोना काळानंतर उद्योगधंदा पुन्हा सुरळीत करण्याचा प्रयत्न करत असताना शासनाकडून लादण्यात आलेला व्हॅट कर हा अन्यायकारक आहे,' असा संताप धारणीतील व्यवसायिकांनी व्यक्त केला.बार मालकांच्या म्हणण्यानुसार, वाढीव करामुळे ग्राहकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार असून, ग्रामीण भागात व्यवसाय सुरू ठेवणे कठीण झाले आहे. शासनाने तातडीने हा निर्णय मागे घ्यावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

## प्रलंबित मागण्यासाठी सप्टेंबर महिन्यात राज्यव्यापी आंदोलन

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्यातील राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या देखील विविध मागण्या प्रलंबित असून याच मागणीच्या अनुषंगाने आता राज्य कर्मचाऱ्यांकडून आक्रमक पवित्रा घेण्यात आला आहे. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या माध्यमातून जर सरकारकडून राज्य कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत येत्या काही दिवसांनी सकारात्मक निर्णय घेण्यात आला नाही तर सप्टेंबर मध्ये राज्यव्यापी आंदोलनाची तयारी दाखवण्यात आली आहे.

यासंदर्भात संघटने कडून सरकारला निवेदन सुद्धा देण्यात आले आहे. या निवेदनात राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या नऊ प्रलंबित मागण्यांबाबत उल्लेख करण्यात आलेला आहे. दरम्यान आता आपण राज्य सरकारी कर्मचारी कोणत्या ९ प्रलंबित मागण्यांसाठी राज्यव्यापी आंदोलनाची तयारी करत आहेत.केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा जानेवारी महिन्यापासूनचा महागाई भत्ता वाढवणे. सध्या राज्य कर्मचाऱ्यांना ५३% दराने महागाई भत्ता दिला जात आहे तर केंद्रीय कर्मचाऱ्यांना ५५% दराने महागाई भत्ता मिळतोय यामुळे राज्य कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता सुद्धा ५५% करण्याची मागणी कर्मचाऱ्यांची आहे.

सध्या राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्ष इतके आहे. तर दुसरीकडे केंद्रीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवत्तीचे वय ६० वर्ष इतके आहे केंदीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्ष इतके आहे. केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर राज्य कर्मचाऱ्यांचे वय ६० वर्षे करावे अशी ही मागणी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांकडून केली जात आहे.राज्य सरकारने लागू केलेली नवीन चार कामगार संहिता रद्द करण्याची मागणी सुद्धा कर्मचाऱ्यांकडून उपस्थित करण्यात आली आहे.शिक्षकांच्या संचमान्यता संदर्भातील गेल्यावर्षी जारी झालेला आदेश रद्द करण्याची मागणी कर्मचाऱ्यांकडून करण्यात आली आहे. दिनांक १५ मार्च २०२४ रोजीचा आदेश तात्काळ रद्द करावा. अशी मागणी यावेळी उपस्थित करण्यात आली आहे. राज्य कर्मचाऱ्यांकडून अनुकंपा तत्वावरील जे उमेदवार प्रतीक्षा यादीमध्ये आहेत त्यांना तात्काळ नियुक्ती मिळावी अशी सुद्धा मागणी यावेळी उपस्थित करण्यात आली आहे. मागणा यावेळी उपस्थित करण्यात आला आहे.महाराष्ट्र राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांकडून दहा वर्षांपेक्षा अधिक काळ ज्या कर्मचाऱ्यांनी कंत्राटी किंवा रोजंदारी किंवा अंशकालीन तत्वावर काम केलेले आहे त्यांना नियमित करण्यात यावे म्हणजेच शासन सेवेत समाविष्ट करावे अशी मागणी उपस्थित करण्यात आली आहे

# जिल्ह्यातील ५४ ठिकाणांवरील पाण्याचे नमुने दूषित

### २८ रासायनिक आणि २६ जैविक चाचण्यांमध्ये अनुत्तीर्ण

**अमरावती/का.प्र.**

जिल्हा परिषदेच्या पाणी आणि स्वच्छता विभागामार्फत जिल्ह्यातील १४ तालुक्यांतील सर्व गावांच्या जलस्त्रोतांमधील पाण्याच्या मान्सूनपूर्व जैविक आणि रासायनिक चाचण्या घेण्यात आल्या. ज्याचा अहवाल नुकताच प्राप्त झाला. ज्यामध्ये जिल्ह्यातील ५४ ठिकाणांवरील पाण्याचे नमुने दूषित आढळले.

२८ पाण्याचे नमुने रासायनिक आणि २६ जैविक चाचण्यांमध्ये अनुत्तीर्ण झाले. जिल्हा जलसंपदा विभागाने सांगितले की, सर्व ५४ दूषित जलस्त्रोतांमधील पाणी पिण्यायोग्य नसल्याचा अहवाल प्राप्त होताच सदर जलस्त्रोतांचे शुद्धीकरण करण्याचे काम तात्काळ सुरू करण्यात आले. सर्व जलस्त्रोतांचे मान्सूनपूर्व




शुद्धीकरण करण्यात येत आहे.जल जीवन अभियानांतर्गत जिल्हा परिषदेच्या पाणी आणि स्वच्छता विभागाकडून गुरुवारी प्राप्त झालेल्या मान्सूनपूर्व पाणी चाचणी अहवालातील माहितीनुसार, जिल्ह्यातील सर्व १४ तहसीलमधील ५ हजार ६८७ ठिकाणच्या जलस्त्रोतांमधील पाण्याची प्राथमिक चाचणी करण्यात आली.त्यापैकी एकूण ५ हजार ८६७ पाण्याचे नमुने तपासण्यात आले. २ हजार १३३ नमुने रासायनिक चाचणीसाठी पाठवण्यात आले. त्यापैकी २८ नमुने दूषित आढळले. त्याचप्रमाणे ३ हजार ७९६ पाण्याच्या नमुन्यांची जैविक चाचणी करण्यात आली, त्यापैकी २६ नमुने दूषित आढळले. त्यांच्या तात्काळ शुद्धीकरणाच्या सूचना दिल्यानंतर, सर्व दूषित जलस्त्रोतांमधील पाण्याचे नमुने व्यवस्थापनोत्तर चाचणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

# जिल्ह्यात ६.४४ लाख हेक्टरवरील पेरण्या पूर्ण

**अमरावती/का.प्र.**

जुलै महिन्याच्या पहिल्याच आठवड्यापासून अमरावती जिल्ह्यात सर्वदूर दमदार पावसाने हजेरी लावल्यानंतर उल्हासित झालेल्या शेतकऱ्यांनी पेरणीच्या कामांना गती दिली होती. सध्या जिल्ह्यात ६ लाख ४४ हजार हेक्टर शेत जमीनीवरील पेरणीची कामे पूर्ण झाली आहेत. कृषी विभागाने केलेल्या नियोजनानुसार हे प्रमाण ९४.३० टक्के एवढे आहे.

जिल्ह्यात आता केवळ ६ टक्के पेरण्या रखडल्या असून सततधार पावसाचा अडथळा त्यासाठी कारणीभतू आहे. अमरावती जिल्ह्यातील धारणी, चांदूर रेल्वे आणि नांदगाव खंडेश्वर या तालुक्यांत तर १०० टक्के पेरण्या पूर्ण झाल्यात. कपाशी व सोयाबिनसोबतच तुर या पारंपारिक पिकांच्या लागवडीकडे यंदाही शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात कल आहे. सोबतच काही प्रमाणात खरिपाची अन्य पिके घेण्यासाठीही शेतकऱ्यांनी नियोजन केल्याचे दिसून येते. अमरावती जिल्ह्यात यंदा खरिप हंगामासाठी कृषी विभागाने ६ लाख ८२ हजार ९८२ हेक्टर शेत जमीनीवर पिकांचे नियोजन केले आहे. जून महिन्याच्या सुरुवातीलाच मान्सूनने जिल्ह्यात जोरदार सलामी दिली होती. त्यामुळे शेतकऱ्यांनीही उत्साहाने पेरणीची तयारी पूर्ण केली. जून महिन्याच्या मध्यापर्यंत सर्व १४ तालुके मिळून ५० टक्क्यांपर्यंत पेरण्यांची कामे पूर्ण झाली होती. मात्र मध्येच पावसाने दडी मारली आणि पेरण्या रखडल्या होत्या. बरचे दिवस पावसाने उसंत घेतल्याने ज्या शेतकऱ्यांनी पेरण्या



केल्यात त्यांच्यावर दुबार पेरणीचे संकट ओढावते की काय? अशीभीतीही निर्माण झाली होती. मात्र जुलै महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात जिल्ह्यात सर्वत्र पावसाचे दमदार आगमन झाले आणि शेतकऱ्यांनी सुटकेचा निश्वास टाकला.

पेरणीसाठी अनुकूल पाउस पडल्याने शेतकऱ्यांनी पून्हा पेरणीच्या कामांना वेग दिला. आतापर्यंत १४ तालुक्यांमध्ये ६ लाख ४४ हजार हेक्टर शेतजमीनीवरील पेरणीची कामे पूर्ण झाली आहेत. हे प्रमाण ९४.३० टक्के एवढे आहे. गत रविवारपासून चार दिवस जिल्ह्यात सततधार पाउस कोसळला. गुरुवारपासून पावसाने उसंत दिली. काही भागात शेतजमीनीत अद्यापही ओल कायम असल्याने शेतकऱ्यांना पेरणीच्या कामात अडथळे आले. त्यामुळे जवळपास ६ टक्के शेतांतील पेरण्या रखडल्या आहेत. येत्या काही दिवसांत येथील पेरणीची कामेही पूर्णत्वास जाण्याची शक्यता आहे.आतापर्यंत झालेल्या लागवडीमध्ये धारणी तालुका जिल्ह्यात अव्वल आहे. त्यापाठोपाठ नांदगाव खंडेश्वर आणि चांदुर रेल्वे तालुक्यातील पेरणीही ९९ टक्क्यांवर पोहोचली आहे.

**सर्वाधिक लागवड सोयाबिनची**

यंदाही सोयाबिन, कपाशी आणि तुर ही पारंपारिक पिके घेण्याकडे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा कल आहे. मात्र सर्वाधिक लागवड सोयाबिनची झाली आहे. आतापर्यंत २.३८ लाख हेक्टरवर शेतकऱ्यांनी सोयाबीन ची पेरणी केली आहे. त्याखालोखाल २ लाख २८ हजार ९२० हेक्टरवर कपाशी तर १ लाख ११ हजार २९२ हेक्टरवर तुरीची लागवड झाली आहे. सोबत अन्य पिकांचीही अगदीच थोड्या प्रमाणात शेतकऱ्यांनी पेरणी केली असल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे.

## संक्षिप्त

### हव्याप्र मंडळात गुरूपौर्णिमा उत्साहात

**अमरावती-** श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या माध्यमातून देश व समाजाला बलवान, सक्षम करणारे आद्य संस्थापक कै. अंबादासपंत वैद्य यांना गुरूपोर्णिमा निमीत्त पुजन व अभिवादन सोहळा भक्तीभावाने पार पडला. मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजीत या पुजन व अभिवादन सोहळ्याला श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे सर्व ज्येष्ठ सभासद, कार्यकर्ते, पदाधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या सचिव प्रा. डॉ. माधुरी चेडके यांच्या अध्यक्षतेखाली आयोजीत या गुरूपोर्णिमा कार्यक्रमाला उपस्थित सर्वांनी सर्वप्रथम कै. अंबादासपंत वैद्य यांच्या प्रतिमेचे पुजन, हारार्पण करीत अभिवादन केले. यावेळी गुरूपोर्णिमा पुजन सोहळयाला मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अ‍ॅड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांतराव चेंडके, सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव प्रा. विकास कोळेश्वर, सचिव प्रा. रविंद्र खांडेकर यांच्या सह सर्व सदस्य, पदाधिकारी, विभागप्रमुख, कर्मचारी व विद्यार्थी-खेळाडू वर्ग मोठ्या संख्येन उपस्थित होते.



### संत सचिनदेव महाराज यांच्यातर्फे तपोवनला २१ रु.हजाराची देणगी

**अमरावती-** गुरुपौर्णिमेनिमित्त तपोवनवासियांना आशीर्वाचन देण्याकरिता दरवर्षीप्रमाणे संत अच्युत महाराजांचे पटशिष्य संत सचिन देव महाराज यांनी येऊन आपल्या अमृतवाणी समाजसेवेबाबत गुरुची महिमा सांगितली आणि तपोवनला प्रबोधन प्रवचनातून त्यांना मिळालेल्या २१००० रुपया निधी तपोवनच्या विकास कार्यासाठी देणगी म्हणून दिला. मागील बार-तेरा वर्षांपासून संत सचिन देव महाराज दरवर्षी गुरु पौर्णिमा प्रथम पद्मश्री डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवनला येऊन पूजन करतात. आपले गुरुपौर्णिमेचे प्रथम प्रवचन ते तपोवनला अर्पण करतात.तपोवनला भेट देण्याचा भक्तांना आग्रहा घालतात आणि आर्थिक जमा झालेला निधी प्रत्येक कार्यक्रमात तपोवनला देणगीत देतात. आतापर्यंत त्यांनी लाखो रुपयांचा निधी तपोवनला देणगी स्वरूपात प्रदान केला आहे. यंदाही गुरुपौर्णिमेनिमित्त त्यांनी तपोवन च्या तारका सभागृहात प्रवचन झाल्यानंतर २१००० रुपयांचे देणगी तपोवन चे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई सचिव सहदेव गोळे माजी नगरसेवक सुरेश गटलेवार यांच्या स्वाधीन केला. यावेळी संस्थेचे उपसचिव ऋषिकेश देशपांडे, उपअधीक्षक योगेश करडे अंतर्गत व्यवस्थापक भास्कर शेटे तपोवन मधील कार्यकर्ते शैक्षणिक निवासात सर्व विद्यार्थी व भक्तगण मोठ्या संख्येने हजर होते.



### श्याम ठणगण यांना उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार

**आसेगाव पूर्णा-** चांदुर बाजार तालुक्यातील करजगाव येथील श्री शंकरराव विद्यालय व श्री ल .चं खेरडे कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम ठणगण यांना २०२५-२६ इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड वतीने देण्यात येणारा उत्कृष्ट प्राचार्य हा राष्ट्रीय स्वरूपाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार डॉ किरण बेदी माजी राज्यपाल यांचे हस्ते मुंबई येथे ९ नोव्हेंबर २०२५ रोजी होणाऱ्या समारंभात हा पुरस्कार दिला जाईल.श्रीमती जनाबाई नाथे कनिष्ठ कला महाविद्यालय, काकडा, ता. अचलपूर येथे मराठी चे प्राध्यापक म्हणून काम केले.१ जुलै २०२३ पासून आजपर्यंत पुन्हा श्री शंकरराव विद्यालय व कमवि.करजगाव येथे प्राचार्य पदावर कार्यरत आहे.पुरस्कार जाहीर होताच सर्वच स्तरावरून प्राचार्य श्याम ठणगण यांचे अभिनंदन होत आहे.



### डिपार्टमेंटल स्टोअरचा वर्धापन दिन



**अमरावती-** सामाजिक गोलमेज परिषद, अमरावती द्वारा संचालित वई डिपार्टमेंटल स्टोअरचा पहिला वर्धापनदिन नुकताच भिमटेकडी येथील संबोधी सभागृह यशोदानगर चौक येथे संपन्न झाला. उद्घाटक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक प्रा. डॉ. बि. आर. वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले तर अध्यक्ष म्हणून भाऊरावजी सरकटे प्रमुख अतिथी म्हणून वई अर्बन क्रेडिट को - ओपॅरेटीव्ह सोसायटी लिमिटेड अमरावती चे अध्यक्ष प्रकाश मेश्राम, इंजिनिअर उमेश मेश्राम उपस्थित होते.याप्रसंगी डिपार्टमेंटल स्टोअर चा लेखाजोखा प्रेषकांसमोर प्रस्तुत करण्यात आला. त्यानंतर फुले, शाहू आंबेडकर यांच्या तत्वज्ञानातून आर्थिक चळवळ कशी उभी करायची या विषयावर मान्यवरांची समायोचित भाषणे झाली.कार्यक्रमाला संचालक मंडळातील दिलीप मेश्राम, प्रा. राहुल मेश्राम, बबलू गजभिये,, भीमा मेश्राम, दीपक खांडेकर, शांताराम इंगोले, मायाताई शहारे, कांचन गेडाम, विना शंकरपाळे, लोभस मेश्राम, आशिष गवई, अरुणा राऊत, वैशाली खोब्रागडे प्रामुख्याने उपस्थित होते.संचालन दीपक खडसे आभार प्रदर्शन लोभस मेश्राम यांनी केले.

### प्रांजली इंगळेची 'आरबीएल बँक' मध्ये यशस्वी निवड

**अमरावती-** सिपना अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या एमबीए विभागाची विद्यार्थिनी कु प्रांजली इंगळे हिची 'आरबीएल बॅंक' या नामांकित कंपनीत नुकतीच निवड करण्यात आली.सिपना एमबीए विभाग आपल्या विद्याध्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत निवडलेल्या क्षेत्रात करिअर संधी देण्याकरिता प्रयजरत असते. यापूर्वीही विभागाच्या माजी विद्यार्थ्यांनी विविध यातनाम कंपन्यांमध्ये आपल्या उत्कृष्ट कामगिरीव्दारे विभागाची नावलौकिकता वाढवणी आहे. त्यामुळे नवीन विद्यार्थ्यांना प्लेसमेंट्च्या संधी उपलब्ध होत आहे.संस्थेचे अध्यक्ष जगदीश गुप्ता व प्राचार्य डॉ. संजय खेरडे यांच्या प्रेरणेतून विभाग प्रमुख डॉ. मनीष जाधव, इंडस्ट्री इन्स्टिट्यूट इंटरॅक्टशन व कॉर्पोरेट सेलचे डीन डॉ. पवन देशमुख यांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन देऊन यश संपादन केले.



# वस्तूंचे वायदे आणि त्यांचा बाजार

**वायदा बाजार म्हणजे कमोडिटी मार्केटबाबत वाढती उत्सुकता दिसते. सोने, चांदी यांसह कापूस, हळद मका अशी कितीतरी उत्पादने या बाजाराशी संलग्न आहेत. शेतकऱ्यांचे या बाजारातील नुकसान टाळण्यासाठी नुकतेच हेजिंग डेस्क सुरू करण्यात आले. त्या निमित्ताने...**




**भू**राजकीय अशांतता सध्या वाढत चालली आहे. त्यामुळे भविष्य सुरक्षित करण्यासाठी सर्वसामान्यांपासून देशोदेशींच्या मध्यवर्ती बँकाही सजग झाल्या आहेत. या बँकांनी काही दिवसांपूर्वी भरमसाठ सोनेखरेदी केली. तुम्ही-आम्ही देखील सोने खरेदी करून भविष्याची सोय करू पहात आहोत. सोने ही एक कमोडिटी आहे. आज या कमोडिटी मार्केटचा विचार आपण करणार आहोत.

गहू, चणे, कडधान्ये शेतात पिकतात आणि आपण ते किराणा मालाच्या दुकानांतून, अपना बाजारसारख्या साखळी दालनांतून किंवा ई-कॉमर्स मंचांवरून ऑनलाइन खरेदी करतो. शेतात पीक आल्यानंतर ते आपल्या घरातल्या डब्यात जाईपर्यंत बऱ्याच प्रक्रिया घडलेल्या असतात. आलं पीक, वाळवलं धान्य, भरलं पोत्यांत आणि विकलं बाजारात हे इतकं सोपं नसतं ते. मौल्यवान धातू, तेल आणि शेतमाल यांना म्हणजेच वस्तूंना (कमोडिटी) निश्चित भाव देण्यासाठी एक व्यवस्था कार्य करत असते. याच व्यवस्थेत या कमोडिटींना आगामी काळात काय भाव मिळेल, ते ठरवता येते. या व्यवस्थेला वायदा बाजार किंवा कमोडिटी मार्केट म्हणतात. अर्थात ही अत्यंत ढोबळ व्याख्या आहे. प्रत्यक्षात ही सर्व प्रक्रिया गुंतागुंतीची असते.

कमोडिटीची साधी सोपी व्याख्या पुढीलप्रमाणे आहे - वस्तू (कमोडिटी) म्हणजे व्यापारात वापरल्या जाणाऱ्या मूलभूत वस्तू ज्या त्याच काळातील इतर वस्तूंशी बदलता येतात. कमोडिटीचे दोन मुख्य प्रकार आहेतः हार्ड कमोडिटीज आणि सॉफ्ट कमोडिटीज. हार्ड कमोडिटीजमध्ये धातू आणि ऊर्जा उत्पादनं उदा. सोने, चांदी, कच्चे तेल आणि इतर धातू येतात. सॉफ्ट कमोडिटीजमध्ये गहू, साखर, कापूस, कॉफी यासारखी कृषी उत्पादने येतात. कमोडिटी व्यापार हा 'फ्युचर कॉन्ट्रॅक्ट' वर चालतो. त्यामध्ये खरेदी किंवा विक्री तत्त्वानुसार करार होत असतात. भविष्यातील

तारखेला, ठरवलेल्या किंमतीला 'विकत घेऊ किंवा विकू' असा तो प्रकार असतो. यामध्ये व्यापाऱ्यांना एक संधी मिळते. उदा. समजा माझ्याकडे धान्यसाठा आहे आणि मला माहीत आहे की तीन महिन्यानंतर त्याची किंमत कमी होऊ शकते, म्हणून मी आत्ताच तो माल विकू शकतो आणि त्याचा फायदा घेऊ शकतो, जेणेकरून उद्या जरी भाव खाली आला तरी मला काही फरक पडणार नाही.

जसे की शंभर रुपयांची वस्तू आज ११० रुपयांना विकली जातेय पण भविष्यात त्या वस्तूचा भाव कमी होणार आहे, याचा अंदाज बांधून मी ती आजच ११० रुपयांना विकली तरी ती वस्तू माझ्याकडेच राहते; पण भविष्यात भाव घसरले तरी माझे नुकसान होणार नाही. हे करार अंशकालीन म्हणजेच शॉर्ट टर्म एक किंवा दोन किंवा तीन महिन्यांचे असे असतात. कमोडिटी ट्रेडिंग करण्यासाठी मार्केटचा अतिशय बारकाईने अभ्यास आवश्यक आहे. इथे तुम्ही ट्रेडिंग केल्यानंतर ब्रोकर एक कॉन्ट्रॅक्ट नोट तयार करतो त्यामध्ये तुमच्या ट्रेडिंगची सविस्तर माहिती तुम्हाला दिसते. ब्रोकरेज आणि एक्स्चेंजचे दर लिहिलेले असतात. याशिवाय एक बँक ऑफिस अहवाल तयार केला जातो, ज्यामध्ये इतर आवश्यक माहिती दिलेली असते. त्यानंतर एक्स्चेंजकडूनही पुष्टीचा एसएमएस किंवा ई-मेल येतो. जसजसे हे ट्रेडिंग लोकांपर्यंत पोहोचत चालले आहे तसतसे हा ट्रेंड वाढत जाईल. हेजिंगसाठी हा चांगला मंच असल्यामुळे हळूहळू वायदे बाजारातील गुंतवणूकदार वाढत जातील.

### परतावा कसा असतो?

सोने, चांदी, कच्चे तेल, नैसर्गिक वायू, तांबे, अल्युमिनियम, शेती उत्पादने जसे की कापूस, सोयाबीन, चणा या वस्तू सध्या भारतीय वायदे बाजारातील टॉप ट्रेडिंग कमोडिटीज आहेत. या वस्तूंच्या किंमतीचा शेअर मार्केटशी संबंध नाही. कच्चे तेल आणि सोन्याच्या किंमती ह्या भू-राजकीय परिस्थितीनुसार कमी-जास्त होतात तर शेती उत्पादनांच्या किंमती बाजारपेठेतील मागणी-पुरवठा आणि हवामानातील बदलानुसार किंवा कोणता हंगाम सुरू आहे यानुसार वर-खाली होत असतात व त्यानुसार परतावा ठरतो.

### हेजिंग आणि हेजर्स

शेतकरी, उत्पादक, निर्यातदार यांना इथे 'हेजर्स' म्हटले जाते. हे वित्तीय बाजारातील सहभागी असतात जे हेजिंगसाठी कमोडिटी मार्केट एक साधन म्हणून वापरू शकतात. समजा मी एक उत्पादक आहे. माझ्या उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल मी विकत घेतलेला आहे आणि मला आता माहिती आहे की माझ्या उत्पादनाचा निर्मिती खर्च किती असणार आहे! वस्तू बनवायला मला शंभर रुपये लागणार आहेत आणि माझं प्रॉफीट मार्जिन दहा रुपये असणार आहे. त्याचवेळी फ्युचर मार्केट ११० रुपयांना चाललं आहे आणि माझं उत्पादन तयार व्हायला आणखी तीन महिने लागणार असतील तर मी तीन महिन्यापुढचे कॉन्ट्रॅक्ट केले तर शंभर रुपये निर्मितीमूल्यावर मी ११० रुपयांचे कॉन्ट्रॅक्ट केले म्हणजे माझे दहा रुपये प्रॉफिट मार्जिन निश्चित झाले. त्यामुळे तीन महिन्यांनी जेव्हा माझं उत्पादन तयार होईल तेव्हा जरी मार्केट खाली पडले आणि समजा ९० रुपये झाले तरी इकडचा जो तोटा आहे तो कमोडिटी मार्केटमध्ये तुम्ही आधीच ११० रुपयांनी विकल्यामुळे तिथे भरून निघू शकतो.

### गुंतवणूक करण्याआधी...

आपल्याकडे कमोडिटी ट्रेडिंग कसे सुरू करावे याविषयीच्या मार्गदर्शक बाबी जाणून घ्या...

एक प्रतिष्ठित कमोडिटी ब्रोकर निवडाः शॅं किंवा ग्ड्रॅं सारख्या प्रमुख एक्सचेंजेसमध्ये नोंदणीकृत ब्रोकर निवडा. तुमच्या ट्रेडिंग शैलीला अनुकूल आणि वाजवी शुल्क आकारणारा ब्रोकर शोधा.

- ट्रेडिंग खाते उघडाः वैयक्तिक ओळख आणि माहिती देऊन तुम्ही निवडलेल्या ब्रोकरकडे खाते उघडा. तुमचा ब्रोकर तुम्हाला या प्रक्रियेत मदत करेल.
- केवायसी प्रक्रिया पूर्ण कराः ओळख आणि वास्तव्याच्या पुराव्यासह केवायसी प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रे जोडा.
- तुमच्या ट्रेडिंग खात्यात पैसे जमा कराः तुमच्या ब्रोकरने देऊ केलेल्या विविध पेमेंट पद्धती वापरून तुमच्या ट्रेडिंग खात्यात पैसे जमा करा. ट्रेडिंगसाठी तुमच्याकडे पुरेशी शिल्लक असल्याची खात्री करा.
- अभ्यास आणि विश्लेषण कराः मागणी-पुरवठा, बाजारातील स्थिती, जागतिक घटना आणि हवामानाची स्थिती यासारख्या घटकांचा विचार करून तुम्ही ज्या वस्तूंचा व्यापार करू इच्छिता त्यांचा अभ्यास करा.
- कर आकारणी आणि मान्यता समजून घ्याः भांडवली नफा कर आणि कमोडिटी व्यवहार कर (ण्ऊऊ) यासह कमोडिटी ट्रेडिंगशी संबंधित कर आकारणीबाबत माहिती करून घ्या.
- ट्रेडिंग सुरू कराः फ्युचर्स कॉन्ट्रॅक्ट्स, स्पॉट ट्रेडिंग, ऑप्शन्स किंवा एक्सचेंज-ट्रेडेड फंड्स (ऊंइे) सारख्या पद्धती वापरून ट्रेडिंग सुरू करा जे कमोडिटीच्या किमतीचा मागोवा घेतात.

कमोडिटी ट्रेडिंगमध्ये पाऊल ठेवताना, तुम्ही तुमचे जोखीम प्रोफाइल समजून घेतले पाहिजे. स्पष्ट उद्दिष्ट निश्चित करणे आणि आर्थिक नियोजक किंवा सल्लागाराशी सल्लामसलत करणे आवश्यक आहे. मार्केट अतिशय झपाट्याने वर-खाली होत असतं. त्यात तुम्हाला जर योग्य निर्णय घेता आला तर तुम्ही त्यातून व्यवस्थित तरून जाऊ शकता.

कमोडिटी मार्केट हे प्रामुख्यानं हेजिंगसाठी वापरतात.

कुणी शेतमालाचा व्यापारी असेल, कुणी सोने व्यापारी असेल, असे व्यापारी हेजिंगसाठीचे एक साधन म्हणून कमोडिटी मार्केटचा मार्ग निवडू शकतात. जे लोक मार्केटचा अभ्यास करू शकतात,

जे लोक यात तरबेज आहेत, ज्यांना मार्केट समजते, त्यातील बारकावे अभ्यासता येतात, ज्यांची बाकीच्या ठिकाणी गुंतवणूक करून झालेली आहे आणि त्यांना आता वैविध्य हवे आहे तर असे लोक काही प्रमाणात कमोडिटी मार्केटचा विचार करू शकतात.

**● आनंद म्हाप्रळकर**

# मार्गदर्शक 'दादा'- अशोक निर्मळ

***तुमचा सहवास शांत,पवित्र आणि प्रसन्नता वाढविणारा***
***आत्ममग्न योग्यासारखा,परमात्म्याला आळविणारा...***
***तुमच्याकडे पाहिले की, अशा देवचाफ्याची आठवण होते..***
***तो जसा पानगळू होता होता शुभ्र फुलांनी बहरतो..***
***अलौकीक सुगंधाने अवघे विश्व व्यापून टाकतो***
***तुम्हीही असेच आपुलकीने आमचे भावविश्व व्यापले आहे..***
***तुमच्या आदर्शाचे रोपट आमच्या मनी रुजले आहे...***


तेरवीनिमित्त

**कै**लासवासी आदरणीय अशोक रामचंद्रजी निर्मळ. आम्हा सर्वांचे आवडते मार्गदर्शक 'दादा'. दादांचा जन्म १९ जुलै १९४९ या रोजी वलगांव येथील प्रतिष्ठीत निर्मळ कुटुंबात झाला. स्व.अशोक रामचंद्र निर्मळ जेष्ठ काँग्रेस नेते,वलगावचे माजी सरपंच तसेच सेवा सहकारी सोसायटीचे व आदर्श नागरी पतसंस्थेचे माजी अध्यक्ष होते.पी.जी. एम सी चे अधीक्षक डॉ. सोमेश्वर निर्मळ यांचे ज्येष्ठ बंधू.भावांमध्ये दादा जेष्ठ.त्यानंतर दिनकर (मामा साहेब), महेश्वर (नाना साहेब), डॉ. सोमेश्वर, रामेश्वर अशी चार भांवडे. त्यांना परिसरातील शेतकरी, शिक्षित व प्रतिष्ठीत कुटुंबाचा वारसा लाभला होता. त्यामुळे पदवी पर्यंतच्या शिक्षणानंतर वडिलोपार्जीत शेतीचा व्यवसाय करण्याचा निर्णय दादांनी घेतला. आधुनीक शेती करण्याकरीता त्यांनी ट्रॅक्टर घेतला व 'आदर्श शेतकरी'म्हणून नावलौकीक मिळवला.याच प्रवासात राजकीय क्षेत्रात सामील होऊन वयाच्या २४ व्या वर्षीच ते वलगांव ग्रामपंचायतीचे सरपंच झाले.

यानंतर १९७८ ला कुंडसर्जापूर येथील प्रतिष्ठीत शेतकरी विश्वासरावजी कुकडे यांची जेष्ठकन्या सुरेखाताई यांचेशी विवाहबद्ध झाले.दादांनी घरची शेती सांभाळून चार भावांचे शिक्षण, विवाह व इतर जबाबदाऱ्या योग्य रितीने हाताळल्या.तसेच सहकार क्षेत्रात प्रवेश करून मित्र मंडळी सोबत सेवा सहकारी सोसायटी, वलगांवचे संचालक पद भुषवले.त्यांनतर शेती व्यवसायीकांना आर्थिक मदत व्हावी म्हणून आदर्श नागरी पतसंस्था वलगांव संस्थेची स्थापना केली व १२ वर्षे संस्थापक अध्यक्ष पदाची यशस्वीपणे धूरा सांभाळली.गरजू शेतकऱ्यांना वेळेवर कर्ज देऊन त्यांची मदत केली.पदाची लालसा न ठेवता अध्यक्षपदाची धुरा यशस्वीरित्या आपल्या सहकाऱ्यास सोपवली.

मागील वर्षीच आम्ही सर्व कुटुंबीयांनी दादांचा अमृत महोत्सव साजरा केला.त्या महोत्सवात पर्यावरणाचे भान ठेवून आम्ही दादाच्या साक्षीने ७५वृक्षाचे वृक्षारोपण केले.मागील सहा महीण्यात त्यांची प्रकृती खालावली. तेव्हा सर्व कुटुंबियांनी त्यांची सेवा केली. असंख्य स्मृती मागे सोडून वयाच्या ७६ वर्षीय त्यांनी इहलोकीची यात्रा संपवली.तेरवीनिमित्त भावपूर्ण श्रध्दांजली.

**● मामासाहेब निर्मळ व निर्मळ परिवार,**वलगाव

# मुलांवर विश्वास ठेवा!



**तू**च आमचं भविष्य आहेस', 'तुझ्या यशातच आमचं समाधान आहे', 'आम्ही इतका खर्च केलाय तुझ्यावर...' अशा किती तरी वाक्यांचा रोज सामना करणारी मुलं आज सर्वात मोठी मानसिक हिंसा सहन करत आहेत. त्या हिंसेला शब्द नसतो; परिणाम मात्र भयंकर असतो. काही वेळा आत्महत्येच्या टोकापर्यंत नेणारा! सांगली जिल्ह्यातील हृदयद्रावक घटना हादरवून टाकणारी आहे. एका मुख्याध्यापक बापाने मुलीला अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाले, म्हणून मारहाण केली. अखेर मुलगी बेशुद्ध होऊन मरण पावली. ही बातमी केवळ एका घराची नाही, तर संपूर्ण समाजाच्या कोसळणाऱ्या मानसिक आरोग्याची आहे.

पालक म्हणून आपल्याला पाल्यांकडून अपेक्षा असतात. त्यात गैर काही नाही; पण आपण त्या अपेक्षांचं रूपांतर ओझ्यात, दडपशाहीत करतोय का, याचा विचार कधी करतो का? आज शिक्षण म्हणजे केवळ मार्कांची शर्यत बनली आहे. नीट, जेईई, यूपीएससी किंवा सीईटी अशा परीक्षाच भविष्य घडवतात, हा समज आपण बेमालूमपणे करून घेतो आणि मुलांनाही त्यात ढकलतो. ही आपल्याकडील शिक्षणपद्धतीची, पालकत्वाच्या चुकीच्या कल्पनांची, आणि समाजाच्या एकंदर विकृत अपेक्षांची मिळून घडलेली शोकांतिका आहे. पालक म्हणून आपण मुलांचं भावविश्व समजून घेण्याचा प्रयत्न करतो का? केवळ स्मार्टफोन, बाइक आणि ब्रँडेड वस्तू देऊन आपण जबाबदारी संपल्याचं गृहीत धरतो. आपण त्यांना शिकवतो– स्पर्धा करा, टॉप करा, यशस्वी व्हा; पण स्वतःला समजून घ्या, अपयशातून शिका किंवा जगायला शिका, असे कधी शिकवतो का?

आजची मुलं ताणतणावाखाली जगत आहेत. पालकांची अपार अपेक्षा, शिक्षकांचा अभ्यासाचा भार, सोशल मीडियावरचं तुलनात्मक आयुष्य, मैत्रीचं दडपण हे सगळं त्यांच्या कोवळ्या मनावर कोरलं जातंय. अशा वेळी अपयशाचं धैर्याने स्वागत न करता त्याला शिक्षा दिली, तर परिणाम काय होणार? मुलं म्हणजे यंत्र नाहीत. एका बटणावर 'सक्सेस' मिळेल, एवढं सोपं त्यांचं आयुष्य नाही. प्रत्येक मुलाची बौद्धिक, मानसिक, शारीरिक आणि भावनिक क्षमता वेगळी असते. ती समजून घेतली पाहिजे. एखादी मुलगी 'नीट'मध्ये कमी गुण मिळवते, म्हणजे ती आयुष्यात निकामी ठरते का? इतिहास सांगतो – शाळा-कॉलेजमध्ये मध्यमगती ठरलेली अनेक माणसं आयुष्यात अफाट यशस्वी झाली आहेत.

या घटनेतल्या मुलीचं काय चुकलं होतं? कमी गुण मिळाले, तरी आयुष्यात अजून संधी होत्या. त्या हरवण्यामागे तिचं अपयश नव्हे, तर बापाच्या अपेक्षांचा अतिरेक आणि हिंसेची क्रूरता होती. शिक्षण हे केवळ परीक्षेपुरतं मर्यादित नसलं पाहिजे. ते मुलं घडवणारं, त्यांना समजून घेणारं, जीवनाला दिशा देणारं असावं लागतं. दुर्दैवाने आज ते मार्क, रँक, स्कोअर, पॅकेज आणि सर्टिफिकेट यापलीकडे काही उरत नाही. आणि त्याला आपणच जबाबदार आहोत – पालक म्हणून, शिक्षक म्हणून, समाज म्हणून. आपली मुलं रेसच्या घोड्यांसारखी उभी केली आहेत आपण. त्यांना शिकण्याचा आनंद नाही, केवळ यश मिळवण्याचा तगादा आहे. त्यांना वाटतं, अपयश आलं तर आई-बाबा त्यांना तोंड दाखवणार नाहीत. हीच भावना त्यांना पिळवते, खचवते, आणि कधी जीव घेते. म्हणूनच हे बदलायलाच हवं. आपल्या अपेक्षा ठेवा, पण त्या मानवतावादी ठेवा. मुलांनी जर अपयश पचवलं, तर ते यशही मोठ्या आत्मविश्वासानं मिळवतील. त्यांच्यावर विश्वास ठेवा. त्यांना सांगा, हरकत नाही, पुढच्या वेळेस जमेल, तुझा प्रवास तूच ठरव, आपण सोबत आहोत.जगण्यासाठी हजारो क्षेत्रं आहेत. एक यश मिळालं नाही म्हणून जग थांबत नाही. थांबवायचं आपणही नाही – विशेषतः आपल्या लेकरांच्या स्वप्नांना, त्यांच्या श्वासांना. अपेक्षा ठेवा; पण प्रेमात गुंफून. शिस्त ठेवा; पण समजूतदारपणात. कारण, एक पालक आपल्या मुलाच्या स्वप्नावर विश्वास ठेवतो, तेव्हा त्या मुलाचा आत्मविश्वास अढळ बनतो आणि अशा विश्वासातूनच खरं यश जन्म घेतं!

**● सचिन चव्हाण,**
रामटेक

# मुलांची भाषा आणि आपण

**पू**र्वी मुलं मोठी झाली तरी वर्गात एखाददुसरा मुलगा अपशब्द, शिवी वापरायचा. असं बोलणाऱ्या मुलाकडे इतर मुलं थक्क होऊन पाहायची की याची हिंमत कशी होते असं बोलण्याची. मध्यमवर्गीय मुलं तर आपण असे अपशब्द, अशी भाषा ऐकूही शकत नाही आणि बोलण्याचा विचारसुद्धा करू शकत नाही पण आजकाल मुलांच्या तोंडी असणारी भाषा मोठ्या प्रमाणात अभद्र, शिवीगाळ, कुत्सित, टोमणे, मारणारी, व्यंगात्मक, फजिती करून, त्यावर मजा वाटून घेणारी अशी होतेय. खरं म्हणजे घरात अशी भाषा बोलली जात नाही. पण बाहेर आल्यावर मुलं जर अशा संगतीत असतील तर अनुकरण केलं जातं. मुलांकडे शारीरिक बलाऐवजी अशा भाषेने आपली ताकद दाखवण्याचा एक पर्याय असतो आणि शाब्दिक ताकदीचा वापर करणं मुलांना सोपं वाटतं.

मुलांना हे सांगा की, जर तुम्हाला अशा पद्धतीने गुंडगिरीची भाषा शिवीगाळ करणाऱ्या मुलांबरोबर राहण्यात धन्यता मानत असाल तर हे लक्षात ठेवा की, अशा मुलांना कोणी फार काळ आठवणीत ठेवत नाही. त्यांना कोणी स्वतःच्या आयुष्यात 'आदर्श' मानत नाही. तुमचं नाव अशा मुलांबरोबर जोडल्याने समाजात तुम्हाला प्रतिष्ठा मिळत नाही. हे पाण्याच्या बुडबुड्यांसारखे असतात.अशा पद्धतीने बोललात तर काही वेळ लोक तुमचे फॉलोअर्स होतीलही पण अशा मित्रांना फॉलो करून तुम्हाला वाटणारी मजा ही खालच्या दर्जाची असेल. तुम्हाला या सगळ्यांतून कधीही नेम, फेम मिळत नाही. कोणत्या वडिलांना आपला मुलगा किंवा मुलगी अशी बनावी असं वाटत असेल का? अशा भाषेने लोक तुम्हाला? डमायर करणार नाहीत. तुम्हाला वाटत असेल की, शिव्या देऊन, अपशब्द वापरून तुम्ही लोकांना घाबरवाल, तर हे करिअर नव्हे. फार काळ तुम्ही या पद्धतीने टिकत नाही. ८ आठवी ते १२ वी या काळात तुमच्या आयुष्यात दोन-चार मित्रच असले तरी हरकत नाही. पण चांगली भाषा बोलणारेच मित्र असू देत. स्वतःच्या आयुष्यातल्या छोट्या-छोट्या गोष्टींवर काम करण्याचं हे वय आहे.

'भाषा' ही तुमच्या माणूस असण्याचं लक्षण आहे. तुम्ही श्रीमंत - गरीब असा किंवा सुंदर - सामान्य असा, तुम्ही तोंड उघडून काय बोलता? त्या शब्दांवर तुमची किंमत ठरते. तुमच्या घराण्याचा वारसा लक्षात येतो. तुमच्यावरचे संस्कार जाणवतात. कोणत्या संस्कृतीने तुमचं पोषण झालं आहे हे ठरतं. 'वदन' हे इतकं महत्त्वाचं आहे की, सरस्वती साक्षात तुमच्या जिभेवर वसत असते. तिचा वापर जबाबदारीने करणं हे तुमचं कर्तव्यच आहे हे मुलांना जरूर सांगा.मुलांचा भाषिक विकास खूप महत्त्वाचा आहे पालकांनो. काहीजण बोलतात तेव्हा त्यांचं बोलणं ऐकत राहावंसं वाटतं आणि काही जणांचं कंटाळवाणं वाटतं. असं का? कारण मनातील विचार स्पष्ट असले की बोलण्यात आत्मविश्वास आणि अचूकता येते. बोलण्याला अभ्यासाची जोड असली की अस्सलपण जाणवते आणि मग मुलांच्या बोलण्याने इतर जण प्रभावित होतात.

मुलांची भाषा सशक्त व्हायची असेल तर मुलांना वाचण्याची, ऐकण्याची संधी देऊ या. मुलं जेव्हा त्यांच्या आवडीची पुस्तकं वाचतात तेव्हा त्याच्याबरोबर कविता, चरित्र, प्रवासवर्णन, गोष्टी, प्रेरणादायक किस्से हे सगळं त्यांना ऐकवाच. त्यातून नवनवीन शब्द कानावर पडतील. सगळ्यांचा अर्थ समजेल असं नाही पण आपण त्यांना अर्थ माहीत करून घेण्यासाठी मदत नक्कीच करू शकतो. 'चांगलं ऐकणं' हे त्यांच्या चांगल्या बोलण्यासाठी आवश्यक आहे. मुलांच्या कानावर काय पडते हे फार महत्त्वाचे आहे. मुलांची भाषा समृद्ध होण्यासाठी हे खूप उपयोगाचे आहे.पालक म्हणून आपणही आपली भाषा कशी समृद्ध करतोय? आपलं वाचन, श्रवण हे वर्तमानपत्र, टीव्ही, मोबाईल यापलीकडे जातंय का? आपण मोठ्या मुलांना नाटक, व्याख्यानं, साहित्यिक कार्यक्रम, कवी संमेलन, शेरोशायरी कार्यक्रमाला जाणीवपूर्वक घेऊन जातोय का? मुलांसाठी आपण नक्कीच खूप काही करतोय. फक्त आत्मपरीक्षण करू या पालकांनो.

मुलांच्या भाषेवर परिणाम होतो तो वातावरणाचा. त्यांच्या आजूबाजूला असणारे लोक, त्यांचे मित्र, तुम्ही राहता तेथील लोकवस्ती आणि त्यांची भाषा या वातावरणानुसार मुलांची भाषा विकसित होते. मुलांना सांगा की भाषा ही दागिन्यासारखीच आहे. दागिना घातला की, आपण सुंदर दिसतो. आपण काही आजच्या काळात डोक्यापासून पायापर्यंत दागिन्यांनी मढलेले नसतो फक्त सणावाराला, लग्न, मुंजीत आपण हे करतो का बरं? कारण लोकांनी आपल्याकडे पाहावं, कौतुक करावं. आजच्या काळात आपलं बोलणं हाच दागिना आहे.

भाषा मुलांची पर्सनॅलिटी कशी आहे ते सांगते, ती एक सवय आहे. 'ओव्या गायच्या की शिव्या द्यायच्या' हे मुलांना सांगाच. चांगलं बोलायचं असेल तर ते मनातून येतं. ते ठरवायला लागत नाही. आयुष्यात नाव कमवायचं असेल तर आधी मुलांची भाषा चांगली हवी. मुलांना कोणत्या माध्यमाच्या शाळेत शिकवायचं हा आणखी वेगळाच मुद्दा आहे. पण एवढं नक्कीच की मराठी माध्यमातील मुलांना शाळेतील विषय समजून घेण्यात कमी अडचणी येतात. आठवीनंतर इंग्रजी अभ्यासाबरोबरच त्या विषयाबाबत ऐकणं, चांगलं वाचणं याचा सराव नक्कीच वाढवायला हवा.इंग्रजी बोलताना काळ चुकेल, व्याकरणाच्या चुका होतील, नवी भाषा आत्मसात करताना मुलं चुकतील पण हळूहळू सरावाने नक्कीच जमू शकेल.मुलांना अशा माणसांचं बोलणं ऐकवा ज्यांनी आयुष्यात काही चांगलं प्राप्त केलंय. मुलं हे ऐकतील, विचार करतील, भारावून जातील. खरंच मुलं प्रेरणा घेतील. कारण या यशोगाथा त्या व्यक्तींच्या बोलण्यातून मुलांपुढे आदर्श ठेवतील. मुलांना ते शब्द आकर्षित करतील. त्यांच्या कामाचा, शब्दांचा, बोलण्याचा तो प्रभाव आहे. हे आहे मुलांच्या आयुष्यात भाषेचं महत्त्व. यशस्वी लोकांच्या अनुभवाबद्दल बोलताना मुलांना त्यांच्या बोलण्याकडे लक्ष द्यायला शिकवा. त्यातून मुलं ऐकण्याची कला आत्मसात करतील. म्हणूनच हे आपण सारे मुलांच्या मनावर बिंबवायला हवे.

**● डॉ. स्वाती गानू**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सच



# विद्युत शॉक लागून दोन शेळ्या ठार : खेट्री येथील घटना

## पशुपालकाचे २५ हजारांचे नुकसान



■ प्रतिनिधी | खेट्री ■

सस्ती वीज उपकेंद्र अंतर्गत येणाऱ्या खेट्री गावात लोंबकळलेला विद्युत तार तुटल्याने दोन शेळ्यांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना सोमवार, दिनांक १४ जुलै रोजी सकाळी १२ वाजताच्या सुमारास घडली. या घटनेत पशुपालकाचे अंदाजे २५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. खेट्री येथील मौलाना अबुल कलाम आझाद उर्दू हायस्कूल शाळेला लागून विद्युत तार गेल्या अनेक महिन्यांपासून लोंबकळलेल्या अवस्थेत आहे. या तारांची अवस्था अत्यंत जीर्ण झालेली असून महावितरण विभागाने याकडे दुर्लक्ष केले आहे. सोमवारी सकाळी शाळेच्या परिसरातील रस्त्यावरून एक पशुपालक आपल्या शेळ्या चारण्यासाठी घेऊन जात होता. यावेळी अचानक विद्युत तार तुटून थेट शेळ्यांच्या अंगावर पडली आणि त्या जागीच ठार झाल्या.

घटनेची माहिती मिळताच लाईनमन संजय खडसे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली व विद्युत पुरवठा बंद केला. त्यांनी ही घटना वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली. पशुपालकांनी नुकसानीची भरपाई मिळावी, अशी मागणी केली आहे.

**महिला बचावली : मोठा अनर्थ टळला :** ही दुर्घटना घडण्याच्या अवघ्या दहा मिनिटांपूर्वी एक महिला शेजारच्या शेतात कामासाठी गेली होती. जर ही घटना त्या वेळी घडली असती, तर मोठा अपघात झाला असता. सुदैवाने महिला बचावली आणि मोठा अनर्थ टळला.

**लोंबकळलेले विद्युत तार धोकादायक! :** खेट्री परिसरात अनेक ठिकाणी विद्युत तार लोंबकळलेल्या अवस्थेत दिसून येतात. यापूर्वी देखील अशा लोंबकळलेल्या तारा तुटून दुर्घटना घडल्याच्या घटना घडल्या आहेत. महावितरण विभागाने वेळेत दखल न घेतल्यास जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. गावकऱ्यांनी तातडीने लोंबकळलेल्या तारांची दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे.

# आखेर आम आदमी पक्षाच्या आंदोलकांनी उपसले आमरण उपोषणाचे हत्यार

## महानगर अध्यक्षासह चार पदाधिकाऱ्यांचे आमरण उपोषण सुरू



**अकोला :** महापालिकेच्या विविध प्रश्नांवर मागण्या मान्य न झाल्यामुळे अखेर आम आदमी पक्षाच्या आंदोलकांनी आजपासून (मंगळवार) पासून आमरण उपोषणाचा निर्णय घेतला आहे. आम आदमी पार्टीचे महानगर अध्यक्ष अल्हाद मसूद अहमद खान यांच्या नेतृत्वात हे आंदोलन ७ जुलैपासून सुरू असून, सुरुवातीला मनपा उपायुक्त गीता ठाकरे यांनी आंदोलकांसोबत चर्चा करत काही मागण्या मान्य करण्याची तयारी दाखवली होती. मात्र, ठोस निर्णय न झाल्यामुळे आंदोलन अधिक तीव्र करण्यात आले आहे.

सोमवारपासून महानगर अध्यक्ष अल्हाद मसूद खान यांच्यासह अरमान खान, अशोक शेगोकार, प्रा. प्रदीपकुमार गवई हे चार पदाधिकारी आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यांनी मनपा आयुक्तांना याबाबत लेखी नोटीस दिली असून, पालकमंत्री, खासदार, आमदार यांच्याकडे मध्यस्थीची विनंती करण्यात आली आहे.

आज मंगळवारी, महाराष्ट्र प्रदेश आम आदमी पार्टीचे उपाध्यक्ष ढोके अकोल्यात येत असून, ते जिल्हाधिकारी व मनपा आयुक्तांशी आंदोलनासंदर्भात चर्चा करणार आहेत. या आंदोलनाला आता शहरातील विविध संघटनांचा पाठिंबा मिळू लागला आहे. समाजवादी पक्षाचे महानगर अध्यक्ष इब्राहिम खालिक, महिला मुक्ती मोर्चा अध्यक्ष इसरारुल्ला खान, अ. भा. वाल्मिकी महापंचायतचे राष्ट्रीय प्रवक्ते सचिन चावरे यांनी लेखी पाठींबा दिला आहे.

### आंदोलनाच्या प्रमुख मागण्या

- मनपा हद्दीतील प्रत्येक प्रभागात मनपा रुग्णालय सुरू करून रोज ओपीडी सेवा उपलब्ध करावी.
- सर्व शाळांमध्ये डिजिटल एलईडी बोर्ड, पंखे, टेबल-खुर्च्या, शुद्ध पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह आणि सौंदर्यीकरणाची कामे करावीत.
- हद्दवाढ झालेल्या प्रभागांमध्ये सिमेंट काँक्रीट रस्ते व नाल्यांची निर्मिती.
- नागरिकांना दररोज अथवा एका दिवसाआड नियमित पाणीपुरवठा व्हावा.
- घर कर रु. १०,००० पेक्षा अधिक असलेल्या नागरिकांना हप्त्यांमध्ये भरण्याची सवलत द्यावी.

उपायुक्तांनी यामध्ये काही मागण्यांवर सकारात्मकता दाखवली होती, मात्र प्रशासनाकडून ठोस निर्णय न झाल्यामुळे आंदोलनात तोडगा निघाला नाही.

दिल्ली व पंजाबमध्ये आम आदमी पार्टीने नागरिकांना मोफत पाणी व करमाफी दिली आहे. त्या धर्तीवर अकोल्यातील जनतेस देखील शिक्षण, पाणी आणि टॅक्सविषयी मोफत व सवलतीच्या सुविधा मिळाव्यात, अशी मागणी आंदोलकांनी केली असून, या मागण्यांसाठी आता आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.

# स्टूडेंट इंडक्शन प्रोग्रॉम दीक्षारंभचे रालतो विज्ञान महाविद्यालयात आयोजन



■ प्रतिनिधी | अकोला ■

स्थानिक श्री रालतो विज्ञान महाविद्यालयात स्टूडेंट इंडक्शन प्रोग्रॉम अर्थात दीक्षारंभचे आयोजन दिनांक ३ ते ५ जुलै व दिनांक ८ ते १० जुलै दरम्यान करण्यात आले.

सदर प्रोग्रॉम विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यक्रम असतो. या प्रोग्रॉमच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थेत नवीन वातावरणाशी जुळवुन घेण्याबाबत संस्थेची माहिती, अभ्यासक्रम नियम, सुविधा आणि इतर आवश्यक गोष्टी समजावून सांगितल्या जातात. याचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांनी सुरक्षित आणि सकारात्मक वातावरणात शिक्षण सुरू करावे हा असतो.

# जि. प. व पं. स. प्रभाग रचनेचा प्रारूप मसुदा प्रसिद्ध

## हरकती असल्यास दि. २१ जुलैपूर्वी पाठविण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी प्रभागाच्या भौगोलिक सीमा निश्चित करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार निर्वाचक गण रचनेचे प्रारूप प्रसिद्ध करण्यात आले आहे. तसा आदेश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी निर्गमित केला.

मसुद्याबाबत हरकती असल्यास तहसीलदार यांच्याकडे दि. २१ जुलैपूर्वी लेखी सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अकोला जिल्हा परिषदेची ५२ इतकी निश्चित करण्यात आली आहे.

प्रारूपानुसार, तेल्हारा तालुक्यात दानापूर, अडगाव बु,, शिरसोली, बेलखेड, पाथर्डी, दहेगाव, भांबेरी असे ७ निवडणूक विभाग आहेत. अकोट तालुक्यात उमरा, अकोलखेड, अकोली जहाँगीर, वडाळी देशमुख, मुंडगाव, वरूर, कुटासा, चोहोट्टा असे ८, मुर्तिजापूर तालुक्यात लाखपुरी, शेलू बाजार, कुरूम, माना, शिरसो, हातगांव, कानडी असे ७ सर्कल आहेत.

अकोला तालुक्यात आगर, दहिहंडा, घुसर, उगवा, बाभुळगाव, कुरणखेड, कानशिवणी, बोरगाव मंजू, चांदूर, चिखलगाव असे असे १० सर्कल आहेत. बाळापूर तालुक्यात अंदुरा, हाथरूण, निमकर्दा, व्याळा, पारस, देगाव, वाडेगाव असे ७ विभाग निश्चित करण्यात आले आहेत. बार्शिटाकळी तालुक्यात कान्हेरी सरप, दगडपारवा, पिंजर, झोडगा, महान, राजंदा, जामवसू असे एकूण ७ आणि पातुर तालुक्यात शिर्ला, चोंडी, विवरा, सस्ती, पिंपळखुटा, आलेगाव.

**असे ६ निवडणूक विभाग आहेत**

| पंचायत समिती | |
|---|---|
| तेल्हारा | - १४ |
| अकोट | - १६ |
| मूर्तिजापूर | - १४ |
| अकोला | - २० |
| बाळापूर | - १४ |
| बार्शिटाकळी | - १४ |
| पातूर | - १२ |

## इंजि. संजय भगत इमीनेन्ट इंजिनिअर अवॉर्डने सन्मानित

**अकोला :** असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर अकोला चॅप्टर चे पदाधिकारी इंजि. संजय रामराव भगत यांना एसीसीई चा मानाचा मानला जाणारा 'इमिनेन्ट इंजिनियर अवार्ड' प्रदान करण्यात आला आहे. पांडेचेरी येथे एसीसीईच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित अभियंता सन्मान सोहळयात मुख्यमंत्री एन रंगास्वामी यांच्या हस्ते इमिनेन्ट इंजिनियर अवॉर्ड प्रदान करण्यात आला.

# विवेकानंद शाळेत आंतरशालेय विविध स्पर्धा संपन्न




■ प्रतिनिधी | अकोला ■

स्थानिक तापडिया नगर स्थित विवेकानंद शाळेत विवेकानंद इंग्लिश हायस्कूल व आयआयटी खरकपुर च्या वतीने 'लर्निंग बियांड द क्लासरुम' या संकल्पनेवर आधारित भारताचे संविधान या विषयावर आंतरशालेय स्पर्धा संपन्न झाली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी अकोलाचे अध्यक्ष तसेच बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा चे माजी अध्यक्ष अँड. मोतीसिंग मोहता हे होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व संस्थेचे अध्यक्ष अनिल पिंपरखेडे तसेच सर्व पदाधिकारी, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. संगीता कोकीळ यांच्या हस्ते माता सरस्वती, स्वामी विवेकानंद प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलनने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. यावेळी अँड. मोतीसिंग मोहता यांचे स्वागत संस्थेचे माजी अध्यक्ष निशिकांत पुजारी यांनी पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन केले. स्पर्धेचे परीक्षक डॉ. विनोद खैरे यांचे स्वागत शाळा व संस्थेचे अध्यक्ष अनिल पिंपरखेडे यांनी तर डॉ. आशिष मुथे यांचे स्वागत मुख्याध्यापिका सौ संगीता कोकिळ यांनी केले. शाळेने आयोजित केलेल्या विविध स्पर्धांसाठी एकूण ११ शाळांमधील वर्ग ८ ते १० चे विद्यार्थी सहभागी झाले होते.

# पावसाळ्यात वीज अपघात टाळण्यासाठी सर्किट ब्रेकर आणि अर्थिंग अनिवार्य – महावितरणचा सल्ला

■ प्रतिनिधी | अकोला ■

पावसाळ्यात विजेच्या तारा, भिंती किंवा विद्युत उपकरणांमध्ये वीजप्रवाह उतरण्याचे प्रकार वाढतात. त्यामुळे अशा धोकादायक अपघातांपासून संरक्षण मिळवण्यासाठी प्रत्येक घर, दुकान व आस्थापनामध्ये योग्य क्षमतेचे सर्किट ब्रेकर व अर्थिंग असणे अत्यावश्यक असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे.

घरगुती वायरिंगमधील बिघाड, करंट लिकेज आणि अर्थिंगचा अभाव ही वीज अपघातांची मुख्य कारणे आहेत. यावर उपाय म्हणून श्ँ, थ्ँ किंवा ण्ँ हे ब्रेकर लावल्यास विजेचा अति भार, शॉर्ट सर्किट किंवा धक्का लागल्यास काही मिलीसेकंदांत वीज पुरवठा खंडित होतो. त्यामुळे आग, उपकरणांचे नुकसान आणि संभाव्य जीवित हानी टाळता येते. फ्रिज, वॉशिंग मशीन, टीव्ही, पंखे यांसारख्या महागड्या उपकरणांना शॉर्ट सर्किट पासून वाचविण्यासाठी सर्किट ब्रेकर उपयुक्त ठरतो. शिवाय, विशिष्ट भागाचे सर्किट बंद करून सुरक्षितपणे दुरुस्ती करता येते, ज्यामुळे संपूर्ण घराचा वीजपुरवठा खंडित करण्याची गरज राहत नाही.

महावितरणने अर्थिंगला देखील तेवढेच महत्त्व दिले आहे. वीजप्रवाह जमिनीमध्ये सुरक्षितरित्या वाहून नेण्यासाठी अर्थिंग गरजेचे असून नवीन इमारतींसाठी ते बंधनकारक, तर जुन्या इमारतींसाठी तातडीने करणे आवश्यक आहे. दर दोन वर्षांनी अर्थिंगची तपासणी करावी, असा सल्लाही देण्यात आला आहे.

फक्त उपकरणेच नव्हे तर स्वतःचे संरक्षणही महत्त्वाचे असल्याने विजेचा टेस्टर वापरणे, रबरी चप्पल घालणे, व ओल्या ठिकाणी काळजीपूर्वक काम करणे गरजेचे आहे.

**अकोला महानगरपालिका, अकोला**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, मनपा अकोला**

**निविदा सुचना क्र. ११(२५-२६)**

आयुक्त, अकोला महानगरपालिका, NCAP निधी अंतर्गत ०६ काम या कामांकरीता निविदा मागविण्यात येत आहे. करीता विस्तृत माहितीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, मनपा अकोलाच्या निविदा शाखेच्या कार्यालयीन नोटीस बोर्डवर तसेच खालील नमुद संकेत स्थळावर भेट द्यावी.

Portal: https://amcakola.in/

**कार्यकारी अभियंता**
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/साबावि/२६०/२०२५
अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : १४/०७/२०२५

**अकोला महानगरपालिका, अकोला**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, मनपा अकोला**

**निविदा सुचना क्र. १०(२५-२६)**

आयुक्त, अकोला महानगरपालिका, मनपा निधी अंतर्गत ०५ काम, या कामांकरीता निविदा मागविण्यात येत आहे. करीता विस्तृत माहितीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, मनपा अकोलाच्या निविदा शाखेच्या कार्यालयीन नोटीस बोर्डवर तसेच खालील नमुद संकेत स्थळावर भेट द्यावी.

Portal: https://amcakola.in/

**कार्यकारी अभियंता**
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/साबावि/२६३/२०२५
अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : १४/०७/२०२५

# शुक्रवारी श्याम झुलनोत्सवात भजने सादर करणार राष्ट्रीय भजनकार कनैय्या मित्तल

**अकोला :** महानगरात गत तीन वर्षापासून आगळावेगळा श्यामबाबांच्या भजने व दिव्य झाकीचा श्याम झूलनोत्सव साजरा करणाऱ्या महानगरातील अध्यात्मिक युवकांच्या 'शाम के दिवाने' या युवक समूहाच्या वतीने शुक्रवार दिनांक १८ जुलै रोजी सायं. ६ वाजता मुर्तीजापुर रस्त्यावरील सिटी स्पोर्ट क्लबच्या प्रांगणात विराट श्याम झूलनोत्सव आयोजित करण्यात आला असून यात 'हम राम को लाये है, हम राम को लायेंगे' हे गीत राष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध करणारे राष्ट्रीय भजनकार, श्याम भक्त हरियाणा येथील कनैय्या मित्तल यांची भव्य भजन संध्या व श्यामबाबांच्या दिव्य झाकीचा श्याम झुलनोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती शाम के दिवाने समूहाचे सेवाधारी अरुण शर्मा, सुमित शर्मा, कल्पेश खंडेलवाल यांनी दिली.

**Change In Name**

I have change my Name
From
**ATIF IQBAL MOHAMMAD ATIQUE UR RAHMAN**
(AS per old passport name / wrong Name)
To
**ATIF IQBAL MOHAMMAD ATEEQUE UR REHMAN**
(New Name as per on Two photo ID)
Passport No. M7972174

**जाहीर प्रगटन**

**जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, अकोला व वाशिम**

उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरिता योजना मंजूर करणेबाबत.

**वक्फ संस्थेचे नाव व पत्ता:-** मस्जिद राविया ॲण्ड मदरसा, प्लॉट नं. १७३/१९, शिट नं. ३८, मौ. अकोला ता. अकोला जि. अकोला.(MSBW/AKL/313/2022)

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत असुन अर्जदार श्री. ॲड. परवेज मुजाहिद मोहम्मद कासम, रा. हनुमान वस्ती, खंगारपुरा, अकोला, ता. जि. अकोला यांनी दिनाकं १०/०१/२०२३ रोजीच्या अर्जामध्ये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरिता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे. प्रारूप योजनेतील तरतूदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ ५ वर्षाचा असून व्यवस्थापन समिती निवडीची रित सर्वसाधारण सभेत निवडणूकीद्वारे अशी आहे. योजनेमध्ये नमुद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे.

ॲड. परवेज मुजाहिद मोहम्मद कासम अध्यक्ष, मोहम्मद सलीम मोहम्मद कासम उपाध्यक्ष, मोहम्मद शकूर मोहम्मद रोशन सचिव, मोहम्मद आरिफ मो. अशफाक शेख कोषाध्यक्ष मोहम्मद मुजीब मो. अशफाक सदस्य, मोहम्मद साजिद मोहम्मद कासम मोहम्मद रिजवान परवेज मोहम्मद अब्दुल जमील मोहम्मद अब्दुल आदिल मोहम्मद अब्दुल खलील आमीर शादाब अब्दुल रज्जाक

सदर प्रारूप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत, जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय, अकोला व वाशिम, बुलढाणा अर्बन बँकेच्या समोर, टिळक रोड, अकोला, ता.जि. अकोला-४४४००१ येथे आपले म्हणणे लिखित स्वरुपात दाखल करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

शिक्का
**शेख इब्राहीम**
जिल्हा वक्फ अधिकारी
अकोला व वाशिम

**जाहीर नोटीस**

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७५९/२०२५ प्रोसेस नं. ६७२४/२०२५
चौ.ता. १२/०८/२०२५ दिनांक : १४/०७/२०२५

**अर्जदार :** १) सुनीता राजदत्त मानकर २) स्वामी राजदत्त मानकर दोन्ही रा. फलॅट नं. २०१, शिव मोहीनी अपार्टमेंट, विजय हाउसिंग सोसायटी, गौरक्षण रोड, अकोला. ह.मु. दत्त मंदिर जवळ, जागृत चौक, वाडेगाव, ता. बाळापूर, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : राजदत्त गुरूदत्त मानकर
**पत्ता :-** रा. फलॅट नं. २०१, शिव - मोहीनी अपार्टमेंट, विजय हाउसिंग सोसायटी, गौरक्षण रोड, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे ता. जि. की, मयत राजदत्त गुरूदत्त मानकर यांचे दि. १३/०२/२००५ रोजी अकोला, ता. अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सर अर्जामध्ये कोणाची प्रकारची हरकत असल्यास दिनांक १२/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११८५/२०२५ प्रोसेस नं. १०३४८/२०२५
चौ.ता. २०/०८/२०२५ दिनांक : ०३/०७/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती सुनंदा गणेश हरसुले २. राधिका गणेश हरसुले दोघेही रा. हरिहर पेठ, अकोला, ता. जि. अकोला सध्याचा पत्ता अर्जुन नगर, मोर्शी रोड, १८९, सदगुरू नगर, शिवाजी नगर, अमरावती. ता. जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : गणेश बळीराम हरसुले
**पत्ता :-** रा.हरिहर पेठ, अकोला. ता. जि. अकोला सध्याचा पत्ता - अर्जुन नगर, मोर्शी रोड, १८९, सदगुरू नगर, शिवाजी नगर, अमरावती. ता. जि. अमरावती.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गणेश बळीराम हरसुले यांचे दि. १३/०६/२००१ रोजी अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २०/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) मूर्तिजापूर, जि. अकोला (श्री तांबोळी साहेब) यांचे न्यायालय.**

आर. एम. जे. सी. क्रमांक: २१२/२०२५ प्रोसेस नं. १९५५/२०२५
चौ.ता. ०४/०८/२०२५ दिनांक : ०९/०७/२०२५

**अर्जदार :** १. शिल्पा अमोल जामनिक, वय २७ वर्ष, २. अदविक अमोल जामनिक, वय ४ वर्ष, ३. आरोही अमोल जामनिक, वय ६ वर्ष, ४. मनोरमा पंजाबराव जामनिक, वय ७७ वर्ष, सर्व रा. रसलपुर, ता. मुर्तिजापुर, जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जदार हे मयत अमोल पंजाबराव जामनिक, रा. रसलपुर, ता. मुर्तिजापुर, जि. अकोला यांचे वारस आहे. उपरोक्त नमुद अर्जदार हे त्यांचे मिळकतीचे कायदेशीर वारसदार आहे. या व्यतिरीक्त कोणीही वारसदार नाहीत. करीता वरील अर्जदार ०४/०८/२०२५ ही ठेवण्यात आलेली आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीस द्वारे आपणांस कळविण्यात येते की, सदर प्रकरणांत कोणालाही कोणत्याही प्रकारची हरकत / आक्षेप घ्यावयाचा असेल तरी त्यांनी स्वतः अगर निर्देशीत केलेल्या वकीला मार्फत चौकशी तारीख दिनांक ०४/०८/२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी विद्यमान न्यायालयात हरकत / आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही कोणत्याही प्रकारची हरकत / आक्षेप नाही असे समजुन सदर प्रकरण निकाली काढण्यात येईल. करीता ही जाहीर नोटीस देण्यात येत आहे. आज दिनांक ०९/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिली आहे.

शिक्का
**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, मुर्तिजापूर.

**जाहीर नोटीस**

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११६३/२०२५ प्रोसेस नं. १०८१६/२०२५
चौ.ता. १४/०८/२०२५ दिनांक : ०८/०७/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती पंचफुला रामराव तायडे २. जीवन रामराव तायडे रा. लुंबीनी नगर, शेगांव पेठ, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रामराव राजाराम तायडे
**पत्ता :-** रा. व्दारा, जीवन रामराव तायडे रा. लुंबीनी नगर, शेगाव पेठ, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामराव राजाराम तायडे यांचे दि. ०९/०६/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. १४/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक २२९
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# दुचाकी चोरटा पोलिसांच्या ताब्यात

**हिंगणघाट**-गोपनीय माहितीच्या आधारे दुचाकी चोरीच्या दाखल गुन्ह्याचा हिंगणघाट पोलिसांनी छडा लावला. या प्रकरणी पोलिसांनी दुचाकी चोरट्यास ताब्यात घेत त्याच्याकडून चोरीच्या दुचाकी जप्त केल्या आहेत. उमेश शिवदास पवार (वय ३३) रा. मांडगाव असे आरोपीचे नाव आहे. चोरट्याने दुचाकी लंपास केल्याची तक्रार गौरव गजानन थोटे यांनी हिंगणघाट पोलिस ठाण्यात दाखल केली. या गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिसांनी उमेश शिवदास पवार याला ताब्यात घेत चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्याकडून पोलिसांनी चोरीच्या दोन दुचाकी हस्तगत केल्या आहेत. ही कारवाई पोलिस अधीक्षक अनुराग जैन, उपविभागीय पोलिस अधिकारी रोशन पंडित, ठाणेदार देवेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनात यशवंत गोल्हर, विकास अवचट, नरेंद्र आरेकर, राकेश आष्टणकर, गजानन कामठाणे यांनी केली.

# संत तुकडोजी वार्डातील नागरिकांचे आंदोलन

**हिंगणघाट/जनमाध्यम**



संत तुकोडोजी वार्ड क्रं ६ आणि १६ च्या रहिवाशांनची कलोडे मंगल कार्यालय मध्ये बैठक झाली या बैठकीचा मुख्य विषय अवैध झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना दुसरी कडे जागा देऊन स्थलांतरित करावे, झोपडपट्टी मध्ये राहात असलेल्या लोकांनी नगरपालिकेच्या जागेवर केलेल्या अतिक्रमण व त्यापासून निर्माण होणाऱ्या विविध त्रासामुळे जे नुकसान आणि शारीरिक व मानसिक त्रास सर्वांना नाईलाजाने अनेक वर्षापासून सहन करावा लागत आहे. त्या विरोधात सर्व नागरिकांनी एकजूट होऊन. भविष्यात त्याचे दुष्परिणाम आपल्याला व पुढील पिढीला भोगावे लागू नये हा दूरदृष्टी ठेवून ही बैठक पार पडली. यापुर्वी नगरपालिका, आमदार , जिल्हाधिकारी यांना अनेक निवेदन देण्यात आले. पण यावर कुठलीही कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे नाइलाजाने १७ जुलै रोजी ठिय्या आंदोलन नगर परिषद समोर करण्यात येणार असल्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# दोंदे दांपत्यांचा स्मृतिदिन साजरा; अखिल महाराष्ट्र प्राथमिक सेवानिवृत्त शिक्षक संघ वर्धा यांचा सहभाग

**हिंगणघाट/जनमाध्यम**

आखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघा तर्फे शिक्षक नेते स्व.भाईसाहेब उर्फ अरुण दोंदे व स्व.सुलभा दोंदे यांचा स्मृतिदिन समारंभ रविवारी आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आखिल महाराष्ट्र प्राथमिक सेवानिवृत्त शिक्षक संघाचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष अशोक सोरटे हे उपस्थित होते.

अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्या महाराष्ट्र राज्य सरचिटणीस माया चाफले, वर्धा जिल्हा महिला आघाडी माधुरी विहिरकर,हिंगणघाट तालुका अध्यक्ष गजानन भुते, समुद्रपूर तालुका अध्यक्ष श्रीधर घोडमारे,राजाभाऊ मन्ने हे उपस्थित होते.सोरटे यांनी अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या प्रवासाची सविस्तर माहिती सांगितली. जागतिक स्तरावर कार्य करणाऱ्या ह्या संघाविषयी माहिती सांगितली.सदर कार्यक्रमाची सुरुवात शिक्षक नेते स्व.भाईसाहेब दोंदे व शिक्षक नेत्या स्व. सुलभा दोंदे यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून करण्यात आली. उपस्थित सर्व मान्यवरांनी स्मृतिदिनानिमित्त स्वर्गीय शिक्षक नायक प्रा.अरुण उर्फ भाईसाहेब दोंदे व शिक्षक नेत्या स्वर्गीय सुलभा अरुण दोंदे यांना अभिवादन केले.



प्रास्ताविक अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्या राज्य सरचिटणीस माया चाफले यांनी केले.त्यात शिक्षकांच्या अनेक समस्या सोडवितांना स्वर्गीय उभयतांनी केलेल्या कार्याला उजाळा देत त्यांनी केलेले सहकार्य व संघाच्या वतीने दिलेले योगदान हे अतुलनीय आहे, तसेच आज शिक्षक संघटना वाढायला हवी शिक्षकांची संघभावना वाढवून शिक्षकांच्या अनेक समस्यांचे निराकरण संघाच्या माध्यमातून करण्याबाबत प्रस्ताव सादर केल्या तसेच विविध समस्यांच्या निराकरणासाठी संघ कसे पाऊल उचलत आहे याबद्दल देखील माहिती दिली. या कार्यक्रमा प्रसंगी सेवानिवृत्त शिक्षक गजानन अवचट, सुरेश जोगे ,मुकुंद भलमे,यशवंत चांभारे,गोपाल शिंदे,पुरुषोत्तम बकाने,कवडूजी शेळके,मधुकर चाफले,जगदीश झाडे, उल्हास राठोड उपस्थित होते. तर कार्यरत शिक्षक सचिन येवले,संजय पादाडे, सचिन कामडी ,वैशाली लांजेवार व मयुरी देशमुख उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.ज्ञानेश्वर वाघमारे यांनी तर आभार प्रदर्शन राजाभाऊ यांनी केले स्वर्गीय शिक्षक नायक प्रा. अरुण उर्फ भाईसाहेब दोंदे व शिक्षक नेत्या स्वर्गीय सुलभा अरुण दोंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त श्रद्धांजली देत सदर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



# विद्यार्थ्यांची स्कॉलरशिप परीक्षेत जिल्हास्तरावर घवघवीत यश

**आष्टी (श.)/ जनमाध्यम**

हुतात्मा राष्ट्रीय इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शिकणारे विद्यार्थी स्कॉलरशिप परीक्षेत सतत यशाची परंपरा टिकवून ठेवत आहेत. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या इयत्ता पाचवी व आठवीच्या स्कॉलरशिप परीक्षेच्या मेरिट लिस्टमध्ये शाळेचे दोन विद्यार्थी चिरंजीव नैतिक संजय भार्गव (आठवी)शहरी इंग्रजी माध्यम व पार्थ अमित मालपे (पाचवी)इंग्रजी माध्यम यांनी जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावण्याचा मान मिळवला आहे.

ही शाळेसाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. यासोबतच शाळेच्या इतर विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक गुणवत्तेची उज्वल छाप जिल्हास्तरावर उमटविली असून त्यांचाही या निवड यादीमध्ये समावेश आहे हे यश शाळेतील गुणवत्ता पूर्ण अध्यापन, शिक्षकांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांचे प्रामाणिक अभ्यास,व पालकांचे सहकार्य यांचे प्रतीक आहे.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष भरत वंजारा, उपाध्यक्ष डॉ. किशोर गंजीवाले सचिव विनायक होले कोषाध्यक्ष राजाभाऊ सव्वालाखे संचालक शंकरराव नागपुरे मुख्याध्यापिका शारदा ढोले शिक्षकवृंद, पालक व संपूर्ण शाळेच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. हुतात्मा राष्ट्रीय इंग्लिश मीडियम स्कूल दरवर्षी शैक्षणिक क्षेत्रात नवनवीन उच्चता गाठत असून यंदाचा स्कॉलरशिप परीक्षेतील हा यशस्वी टप्पा शाळेच्या शैक्षणिक प्रगतीचा ठसठशीत पुरावा आहे.

# राष्ट्रसंतांचे साहित्य व सामुदायिक प्रार्थना जगाला तारणारी-भोरे महाराज

## ग्रामगीता जीवन विकास परीक्षा प्रमाणपत्र वितरण सोहळा

**साहूर/जनमाध्यम**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे तत्त्वज्ञान समाजापर्यंत समाजातल्या प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचावं त्यासाठीच ग्रामगीता जीवन विकास परीक्षांचे आयोजन करण्यात येत असून राष्ट्रसंतांनी विविध साधनांच्या माध्यमातून या समाजाला तारण्याचं काम केलं या भ्रष्ट लालची युगात अनेकांची जीवननौका हेलकावे घ्यायला लागली असून समाजातील अशा व्यक्तींना राष्ट्रसंतांच्या विचाराची व साहित्याची गरज आहे ग्रामगीता जीवन विकास परीक्षेच्या माध्यमातून सुबक ज्ञान प्राप्त होते, जीवन मन चैतन्यमय होते एवढेच नव्हे तर राष्ट्रसंतांचे साहित्य व सामुदायिक प्रार्थना ही जगाला तारणारी आहे, असे विचार राष्ट्रीय कीर्तनकार गजानन भोरे महाराज यांनी व्यक्त केले,

जानेवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या ग्रामगीता जीवन विकास परीक्षा प्रमाणपत्र वितरण सोहळा येथील श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या प्रार्थना मंदिरात आयोजित केला होता त्याप्रसंगी भोरे महाराज गुरुदेव भक्तांना मार्गदर्शन करताना बोलत होते येथील गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने शेकडो विद्यार्थ्यासह अनेक महिला

पुरुषांनी अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ प्रणित वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे तत्त्वज्ञान समाजापर्यंत पोहोचवणारी ग्रामगीता जीवन विकास परीक्षा उत्तीर्ण केली आहे, तर अनेकांनी ग्रामगीताचार्य पदवी परीक्षा पास केली आहे, या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच प्रकाश गायकवाड तर प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामगीताचार्य प्रा. विनोद पेठे राष्ट्रीय कीर्तनकार गजानन महाराज भोरे डॉ. कृतिका विनोद पेठे पत्रकार ओंकार दंडाळे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. याप्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थी सह गुरुदेव भक्तांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थी सीमा थोर, जयश्री ढवळे, सारिका चौधरी, वृषाली वडस्कर, अश्विनी वरकड, मनीषा घोलप, किरण माणिकपुरे, अनिता घोलप, ऋतुजा वरकड, प्रवीण घोटकर, मीना वरकड, ललित वडसकर,प्रतिभा वरकड, नम्रता थोर, वैष्णवी शेंडे, पुष्पा खंडार, प्रिया बिजवे, गणेश खंडार, प्रिया लाड, भारती बिजवे,रंजना घोटकर, शारदा लवणकर, संध्या बोरवार, निर्मला करडे, आरती भोरे, माधुरी भोरे, माधुरी चौधरी, ऋतुजा चौधरी, नम्रता हातमोडे, वृषाली वरकड, ऋतुजा हातमोडे, प्राविण्य वरकड, साक्षी नाखले,गौरी भोरे,आशिष नाईक, भाग्यश्री अग्रवाल इत्यादी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ग्रामगीता जीवन विकास परीक्षा प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले कार्यक्रमाचे संचालन व आभार गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष ईश्वर वरकड यांनी केले, कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसह गुरुदेव भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महात्मा गांधी पुतळ्यासमोरील खड्ड्यामुळे अपघात

**वर्धा-** जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असलेल्या राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यासमोर सिमेंट विटा निघाल्यामुळे रस्त्यावर खड्डा पडला. वेगात असलेल्या वाहनचालकाला खड्डा दिसून पडत नसल्याने दुचाकी वाहने येथे स्लीप होऊन अपघात होत आहे. रोज कितीतरी वाहनचालक येथे अपघातग्रस्त होतात. त्यातच ऑटोरिक्षा चालक हा खड्डा वाचविण्याच्या नादात इतर वाहनांना धडक देतात.

शनिवारी दुपारी नेमका हाच प्रकार झाल्याने सेवाग्राम रुग्णालयात जात असलेला परिवार येथे अपघातग्रस्त झाला. ज्या ऑटोरिक्षाने कट मारला, तो ऑटोरिक्षा निघून गेला. दुचाकीसह रस्त्यावर पडलेल्या पती-पत्नीला उपस्थित नागरिकांनी उचलून रुग्णालयात पाठविले. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यासमोर पडलेला खड्डा अद्याप बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना कसा दिसला नाही, हे एक कोडेच आहे.

## महावाचन उत्सवांतर्गत अभिप्राय लेखन स्पर्धेत

# इंदिरा हायस्कूल महाबळाच्या विद्यार्थ्यांना परितोषिक प्राप्त

**सेलू/ जनमाध्यम**

तालुक्यातील विद्या भारती महाविद्यालय येथे महावाचन उत्सवांतर्गत अभिप्राय लेखन स्पर्धेच्या विजेत्यांना पारितोषीक वाटप करण्यात आले. या स्पर्धेत श्रीमती इंदिरा हायस्कूल महाबळाच्या विद्यार्थ्यांना पारीतोषीक प्राप्त केले. कार्यक्रमाच्या प्रसंगी गटशिक्षणाधिकारी संगीता महाकाळकर व विस्तार अधिकारी खोडे उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजावी, त्यांना अवांतर वाचनाची गोडी निर्माण व्हावी याकरीता महाराष्ट्रात महावाचन उत्सव अंतर्गत वाचलेल्या पुस्तकांवर आधारीत अभिप्राय लेखन स्पर्धेचे आयोजन २०२४ ला तीन गटातून करण्यात आले होते. सदर जिल्हास्तरीय स्पर्धेतून स्पर्धेतुन



स्पर्धकाची निवड करण्यात आलेली होती. या स्पर्धेत श्रीमती इंदिरा हायस्कूलची विद्यार्थीनी माहेश्वरी पुरुषोत्तम बोरधरे वर्ग नववा हिने इसत्ता ९ ते १२ गट क मधुन तालूकास्तरावर तृतीय क्रमांक मिळविला आहे.उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रारितोषिक प्राप्त करण्यात आले. सर्व मान्यवरांनी माहेश्वरीचे अभिनंदन व कौतूक केले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल व कर्तुत्वाबद्दल शाळेचे संस्थाध्यक्ष प्रविण ईरुटकर, मुख्याध्यापिका मनिषा ईरुटकर, कल्पना डडमल, प्रिती पुंड,प्रज्ञा शंभरकर, विशाखा दंडारे,सतिश बावणे शाळेतील शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# कॉटन मार्केटातून दुचाकी लंपास

**हिंगणघाट**-येथील कॉटन मार्केट परिसरातून अज्ञात चोरट्याने दुचाकी चोरून नेली. ही घटना तक्रारीनंतर उजेडात आली.या घटनेमुळे गौरव गजानन थोटे रा. टाकळी खोडे यांचे ४० हजारांचे नुकसान झाले असून त्यांच्या तक्रारीवरून हिंगणघाट पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# घराच्या आवारातील दुचाकी लंपास

**हिंगणघाट**-अज्ञात चोरट्याने घराच्या आवारातील दुचाकी लंपास केली. ही घटना हिंगणघाट येथील निशानपुरा वॉर्ड परिसरात घडली.

# कलाध्यापक संघाच्या जिल्हाध्यक्षपदी आशिष पोहाणे

**वधा/जनमाध्यम**

महाराष्ट्र शासन महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन प्रशिक्षण परिषद पुणे द्वारा मान्यताप्राप्त महाराष्ट्र राज्य कलाध्यापक महामंडळशी संलग्न वर्धा जिल्हा कलाध्यापक संघ वर्धा नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत नवीन कार्यकारिणीची निवड एकमताने करण्यात आली.

अध्यक्षपदी आशिष पोहाणे यांची निवड करण्यात आली तसेच सचिव सुभाष राठोड, कोषाध्यक्ष मिलिंद सावरकर जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश निखारे (कारंजा)गोवर्धन इंगळकर (आष्टी)विपीन मगरे (सेलू) रवींद्र मुटे (समुद्रपूर)किशोर उकेकर (हिंगणघाट)मनोज बर्डे (देवळी) सनी हजारे (आर्वी)जिल्हा सहसचिव मनोज बाचले शहर अध्यक्ष विशाल जाचक ग्रामीण अध्यक्ष प्रवीण



राडे,प्रसिद्धी प्रमुख अविनाश मानकर, राज्य महिला आघाडी सदस्य नंदिनी बर्वे, सुषमा बाळसराफ वैशाली सावंत, सविता भिमटे,ज्योती लोखंडे, उज्वला भातकुलकर, मनीषा कुबडे शुभांगी मरापे तसेच सदस्य म्हणून स्वप्निल सावदे, प्रशांत बोरकर,राजेश महाजन,संजय पुसाम, आशिष घोटकर, विशाल नावाडे, ललित इंगळे यांची निवड करण्यात आली.

सभेमध्ये वार्षिक अहवाल सादरीकरण सचिव सुभाष राठोड यांनी वर्षभरातील कामकाजाचा सविस्तर अहवाल सभेसमोर सादर केला. 'ऋतुरंग' स्पर्धेच्या आयोजनाबाबत व सहभागी कलाकारांबाबत माहिती देण्यात आली. स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसादा बद्दल समाधान व्यक्त करण्यात आले.'ऋतुरंग' चित्रकला स्पर्धेचे जमा-खर्चाचे विवरण कोषाध्यक्ष मिलिंद सावरकर यांनी स्पर्धेच्या खर्चाचे तपशील सभेसमोर मांडले. सर्व खर्चाची पारदर्शक नोंद घेण्यात आल्याचे स्पष्ट झाले. संघटनेच्या पुढील कामकाजाचे नियोजन पुढील कार्यक्रमांची रूपरेषा ठरवण्यात आली. विविध समित्यांची स्थापना व कामांची जबाबदारी ठरवण्यात आली.

माध्यमिक विभाग शिक्षणाधिकारी कार्यालयाशी संबंधित प्रलंबित कामांबाबत संबंधित सदस्यांनी प्रलंबित कामांची माहिती लेखी स्वरूपात संघटनेकडे सादर केली, सातारा येथील कार्यशाळेतील उपस्थितीबाबत चर्चा का उपयुक्त ठरल्याचे मत नोंदवण्यात आले. २०२७ मध्ये वर्धा येथे होणाऱ्या जिल्हा अधिवेशनाबाबत चर्चा अधिवेशनासाठी प्राथमिक नियोजन सुरू करण्यावर भर देण्यात आला.

# आर्वी तळेगाव मार्ग तात्काळ पूर्ण करा-खा.काळे



**वर्धा/जनमाध्यम**

आर्वी तळेगाव रस्त्याचे काम अनेक दिवसांपासून रखडले आहे,सध्या या रस्त्याचे काम सुरू असून अत्यंत संथगतीने सुरू आहे, या रस्त्या वरुन नागपूर-अमरावती रोडवरील पुलगाव कडे जाणारी व तसेच आर्वी शहरातील मोठी रहदारी असून आर्वी शहरातील शाळा, महाविर्द्यालये, दवाखाने तसेच शासकीय कार्यालये तसेच मंगल कार्यालय याच रस्त्यावर असल्याने मोठी वर्दळ असते.

रस्ता नादुरुस्त व अर्धवट कामामुळे बरेच अपघात या रस्त्यावर झाले आहे व अपघातात बरेच जण जखमी झालेत व एका मुलीचा जिव सुध्दा हया रस्त्या वर गेला आहे. त्या मुळे भविष्यातील अपघात टाळून एक चांगला येण्या करीता तात्काळ उपलब्ध होण्या करीता हया रस्त्याचे काम तात्काळ पुर्ण होणे आवश्यक आहे.तसेच खासदार अमर काळे यांना अनेकदा आर्वी तळेगाव रस्त्याच्या कामाबाबत नागरिकांच्यावतीने निवेदने प्राप्त झाली, दिनांक १३ जुलै रोजी खासदार अमर काळे यांनी आर्वी येथे राष्ट्रीय महामार्ग व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेत आर्वी तळेगाव रस्त्याच्या कामाचे संकल्पचित्र व अंदाजपत्रक आधीच मंजूर झाले आहे.

## संक्षिप्त

### विषारी सापाच्या ११ पिल्लांना जीवनदान

**आष्टी (श.)**-लिंगापूर गावातील वानखेडे यांच्या घरात विषारी नाग जातीच्या सापाचे ११ पिल्ले आढळून आले. सर्पमित्राने त्या पिल्ल्यांना रेस्क्यू केले. त्याच जागेवर १८ अंड्यांचे कवच आढळले. उर्वरित ७ पिल्ले कुठे गेले, ही भिती वानखडे कुटुंबीयांमध्ये आहे. तालुक्यातील लिंगापूर येथील गणेश वानखडे यांच्या घरात स्वयंपाक खोलीतील गॅसजवळ सापाचे पिल्ले आढळले. त्यांनी तेथे असलेले डब्बे, ठेवलेल्या विटा उचलण्यास सुरुवात केली असता शेवटची विट उचलताच एकाचवेळी चार ते पाच पिल्ले फना काढून उभे झालेले दिसले. वानखडे यांच्या लक्षात आले, हे तर नाग जातीच्या सापाचे पिल्ले आहेत, लगेच वानखडे यांनी सर्पमित्र प्रितम गायकी यांना संपर्क करून घटना सांगून घटनास्थळी बोलावून घेतले. सर्पमित्र प्रितम गायकी यांनी वानखडे यांच्या घरी पोहोचून त्या सापाच्या पिल्ल्यांना रेस्क्यू केले. एक-एक करीत जवळपास नऊ ते दहा तासांत अकरा पिल्ल्यांना रेस्क्यू केले. त्याच ठिकाणी १८ अंड्यांचे कवच आढळले. उर्वरित ७ पिल्ले कुठे गेले, ही भिती वानखडे कुटुंबीयांमध्ये आहे. सर्पमित्र प्रितम गायकी यांनी वानखडे कुटुंबीयांना सावध राहायला सांगितले

### जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींना कारावास

**सेलू** -शेतीच्या वादावरून जीवानीशी मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या तीन आरोपींना जिल्हा व सत्र न्यायालयाने तीन वर्ष सश्रम कारावास व पाच हजारांच्या दंडाची शिक्षा सुनावली. गोपाल रामदास चुटे, रवींद्र रामदास चुटे व सचिन दिनेश गोमासे तिघेही रा. सेलू असे शिक्षा झालेल्या आरोपींची नावे आहेत, अशी माहिती सेलू पोलिसांनी दिली.फिर्यादी रमेश शामराव चुटे हे ३० सप्टेंबर २०१९ ला सायंकाळी ६ वाजता सेलू येथील शेतातून घरी जात होते. त्या दरम्यान तिन्ही आरोपींनी रमेश चुटे यांना माऊली ले-आऊटमध्ये अडवून शेतीचा वाद उपस्थित करून त्यांच्यावर लोखंडी रॉड व कुऱ्हाडीने हल्ला केला. त्यांना बेधम मारहाण करीत गंभीर जखमी केले. याप्रकरणी सेलू पोलिसांनी भादंवीच्या कलम ३०७, ३४१, ३२६, ११४, ३४ अन्वये गुन्हा नोंद करून प्रकरण वर्धा न्यायालयात दाखल केले होते. जिल्हा व सत्र न्यायाधीश अली यांनी रमेश चुटे व इतर साक्षीदारांची साक्ष आणि सरकारी वकील व आरोपींच्या वकिलांचा युक्तिवादानंतर तिन्ही आरोपींना कलम ३०७, ३२६, ३४ मध्ये ३ वर्षाचा कारावास व ५ हजार रुपये दंड तसेच ३४१ मध्ये ६ महीने सश्रम कारावास व १००० रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. दंड न भरल्यास २ महिने सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.

### सट्टापट्टी व्यावसायिकांवर कारवाई

**हिंगणघाट/देवळी-** देवळी व हिंगणघाट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चार सट्टापट्टी व्यावसायिकांवर कारवाई केली. आरोपींच्या ताब्यातून सट्टापट्टीचे साहित्य, रोख असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. देवळी पोलिसांनी वायगाव (निपाणी) येथील विजय व अजय या आरोपींविरुद्ध कारवाई केली. आरोपींच्या ताब्यातून रोख, सट्टीपट्टीचे साहित्य असा एकूण १ हजार २३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. हिंगणघाट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शनिमंदिरजवळ आरोपी रितेश उर्फ चिंटू रा. राममंदिर वॉर्ड, हिंगणघाट या आरोपीच्या ताब्यातून सट्टीपट्टीचे साहित्य, रोख, मोबाइल असा एकूण ८ हजार २२५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी देवळी, हिंगणघाट पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपासात घेतला आहे.

### जुगारावर पोलिसांची धाड; एकाला अटक

**वर्धा-**शहराच्या इंदिरा नगर भागात सुरू असलेल्या जुगारावर पोलिसांनी धाड टाकून एकाला अटक केली. तर तिघे फरार होण्यात यशस्वी झाले. ही कारवाई गुरुवारी करण्यात आली. इंदिरा नगर भागात तासपत्त्यावर जुगार सुरू असल्याची माहिती रामनगर पोलिसांना मिळाली. त्यावरून पोलिसांनी धाड टाकली असता प्रितमसिंग भादा रा. इंदिरा नगर, वर्धा अटक केली. तर शिवदास पेंदोर, राहुल पोहोणकर दोन्ही रा. इंदिरा नगर व सुबेद मेंढे रा. त्रिमुर्ती नगर, वर्धा हे तिघे फरार झाले. जुगाराच्या ठिकाणावरून पोलिसांनी तासपत्ते व रोख १०४० रुपये जप्त करण्यात आले. याप्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार व्यक्तींचा शोध सुरू आहे.

### घरफोडीत रोखसह दागिने लंपास

कारंजा-कुलूपबंद घराला चोरट्यांनी लक्ष करून घरातील रोख व दागिने चोरून नेले. ही घटना कारंजा पोलिस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात येणा-या नारा येथे घडली. या प्रकरणी तक्रारीवरून कारंजा पोलिस ठाण्यात गुन्ह्याची नोंद घेण्यात आली आहे. कारंजा तालुक्याच्या नारा येथील रहिवासी सुनील रुपचंद किनकर यांच्या कुलूप बंद घराला चोरट्यांनी लक्ष केले. चोरट्यांनी किनकर यांच्या घरात प्रवेश करून घरातील साहित्य फेकफाक केले. शिवाय घरातील २५ हजारांची रोकड तसेच २० हजार रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण ४५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. या प्रकरणी नारा पोलिस ठाण्यात किनकर यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास कारंजा पोलिस करीत आहे.

### नंदोरी चौकातून दुचाकी पळविली

**हिंगणघाट**-येथील नंदोरी चौक परिसरातून अज्ञात चोरट्याने दुचाकी चोरून नेली. या प्रकरणी हिंगणघाट पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली आहे. उमाकांत ज्ञानेश्वर कचाटे रा. माता मंदिर वॉर्ड हिंगणघाट यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्ह्याची नोंद घेतली आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक २३०**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# 'युग प्रवर्तक : डॉ. हेडगेवार' नाट्याला प्रचंड प्रतिसाद

## डॉक्टरांच्या तपस्वी चरित्राने श्रोते भारावले कलावंतांचे समरस होऊन सादरीकरण



**अमरावती/प्रतिनिधीः-** आद्यसरसंघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या जीवनावर आधारित 'युग प्रवर्तक - डॉ. हेडगेवार' हे दोन अंकी नाटकाचे दमदार सादरीकरण संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृहात रविवारी झाले. सदर नाट्य प्रस्तुतीला प्रचंड प्रतिसाद अमरावतीकर जनतेने दिला. संपूर्ण सभागृह दर्शकांनी खचाखच भरलेले होते.

राज्य शासनाच्या सांस्कृतिक विभागातर्फे प्रायोजित या नाट्य प्रयोगाचा शुभारंभ खासदार अनिल बोंडे, आमदार रवि राणा, अमरावती महानुभाव आश्रमाचे महंत कविश्वर कुळाचार्य मोहन महाराज, संघाचे विभाग संघचालक चंद्रशेखर भोंदू, महानगर संघचालक उल्हास बपोरीकर, भारत विकास परिषद अमरावती शाखा अध्यक्ष प्रा. डॉ. रविकांत कोल्हे, भारतीय उत्कर्ष मंडळ अमरावती शाखा अध्यक्ष दिलीप भुजाडे, नाटकाचे निर्माते व नादब्रह्माचे अध्यक्ष तसेच भारत विकास परिषदेचे नागपूर येथील प्रांताध्यक्ष पद्माकर धानोरकर यांचे हस्ते दिपप्रज्वलन करून झाला.

सर्व कलाकारांनी समरस होऊन आविष्कार अभिनय केलेल्या या प्रयोगाने प्रेक्षकांना ३ तास अक्षरशः खिळवून ठेवले. डॉक्टर हेडगेवारांच्या जीवनातील विविध प्रसंग रोमहर्षक दृश्यांसह जिवंतपणे सादर केल्या गेले. त्यामध्ये प्रामुख्याने त्यांचे क्रांतिकारी जीवन, काँग्रेस पक्षातील त्यांचे सुभाष बाबू आणि महात्मा गांधी यांच्याशी असलेले संबंध, संघ स्थापनेची पार्श्वभूमी, गोळवलकर गुरुजींची भेट व संघामधील त्यांनी सक्रिय होण्याची आवश्यकता, संघकार्य देशभर पोहचावे यासाठी असलेली अत्यंतिक तळमळ, स्वप्नात सुद्धा भारत हे हिंदू राष्ट्र या संकल्पनांचा ध्यास घेऊन रक्ताचे पाणी कसे झाले इत्यादी प्रसंगांचे जिवंत प्रस्तुतीकरण सदर नाटकांमध्ये करण्यात आले.

प्रत्यक्ष संघाची पार्श्वभूमी नसणाऱ्या काही प्रेक्षकांनी आपले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दल असलेले गैरसमज दूर झाल्याची प्रांजळ प्रतिक्रिया दिली.

संघ स्थापनेची पार्श्वभूमी बघितल्यानंतर आज शिस्तबद्ध स्वयंसेवकांची फौज कुठल्याही आपदेच्या वेळी कशी सक्रिय होते याचे मूळ लक्षात आले. संघाच्या शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण महाराष्ट्रात होणाऱ्या या प्रेरक नाटकाच्या प्रयोगाच्या निमित्ताने डॉ. हेडगेवार यांचे तपस्वी चरित्र घराघरात पोहोचेल हे निश्चित, असेही मत अमरावतीकर नागरिकांनी व्यक्त केले.

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

वि.श्री.एन.सी.सोरटे ७ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज -१२३६/२०२५
श्री सादीक विरुध्द निरंक
पुढील तारीख ०४.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1) Sadique Baig Hamza Baig
**Age 58 yrs., Occu.- Labour**
**R/o. Gall No. 1, Near Mukhtar Master House,**
**Taj Nagar, Amravati**

-- विरुध्द --

गैरअर्जदार - निरंक

**सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की,** मयत जुबेदा बी हमजा बेग **हे** दि.११.१२.२००८ **रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले.** अर्जदार सादीक विरुध्द निरंक **यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** [illegible] **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

त्यापेक्षा **श्री. सादीक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०४.०७.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशान्वये,**
सहायक अधीक्षक,
**दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती**

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

वि.श्री.एस.एस.बिंगरदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज -१३५५/२०२५
श्री प्रकाश अधिक चार विरुध्द निरंक
पुढील तारीख १९.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1) Prakash Rangrao Gudadhe (son) , **Age 77 yrs., Occu.- Cultivator, R/o.Samartha Colony, Amravati, Tq. & Dist. Amravati**
2) Anil Rangrao Gudadhe (son) , **Age 69 yrs., Occu.- Cultivator R/o. Khartgalegaon, Tq. Bhatkuli, Dist. Amravati**
3) Sanjay Rangrao Gudadhe (son) , **Age 64 yrs., Occu.- Pensioner; R/o. Shivarpan Colony, V.M.V. road, Amravati, Tq. & Dist. Amravati**
4) Rekha Mangesh Deshmukh (Daugther) **Age 60 yrs., Occu.- Housewife R/o Bhagur, Tq. & Dist. Nashik**
5) Jyoti Dilip Sawarkar(Daugther), **Age 60 yrs., Occu.- Pensioner; R/o Ganpati Nagar, Amravati, Tq.& Dist. Amravati**

-- विरुध्द --

गैरअर्जदार - निरंक

**सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की,** मयत रंगराव विश्वासराव गुडधे **हे** दि.२५.१२.१९९० **रोजी खारतळेगाव, ता.जि.अमरावती येथे व मयत प्रमिला रंगराव गुडघे हया दि. २५.०९.२०१७ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले.** अर्जदार प्रकाश अधिक चार विरुध्द निरंक **यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** [illegible] **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

त्यापेक्षा **श्री.प्रकाश अधिक चार विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १०.०७.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशान्वये,**
सहायक अधीक्षक,
**दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती**

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

वि.श्री.एन.सी.सोरटे ७ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज -११५९/२०२५
श्री प्रमोद अधिक तीन विरुध्द निरंक
पुढील तारीख २४.०७.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1) Pramod Suresh Umale **Age 55 yrs., Occu.- Labour R/o.V.M.V. Road, behind Gupta, Cement Depo., 35 Vilas Colony, V.M.V. Amravati, Tq. & Dist. Amravati**
2) Rajeshkumar Suresh Umale, **Age 61 yrs., Occu.- Retired R/o. Vikas Nagar, Behind Sahu Ara Machine, Telphone Colony, Vivekanand Ward, Baitul, Tq. & Dist. Baitul. M.P.**
3) Vandana Dilip Raut , **Age 59 yrs., Occu.- Household R/o Ghatladki, Tq. Chandur Bazar, Dist. Amravati**
4) Kalpana Subhash Wankhade, **Age 57 yrs., Occu.- Household R/o Nimkhed Bazar, Tq. Anjangaon Surji, Dist. Amravati**

-- विरुध्द --

गैरअर्जदार - निरंक

**सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की,** मयत सुरेशराव सुर्यभान उमाळे **हे** दि.२६.०४.२०१३ **रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे व इंदिरा सुरेश उमाळे हया दि. २३.०५.२०२४ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले.** अर्जदार प्रमोद अधिक तीन विरुध्द निरंक **यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** [illegible] **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

त्यापेक्षा **श्री.प्रमोद अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २७.०६.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशान्वये,**
सहायक अधीक्षक,
**दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती**

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

वि.श्री.पी.के.धोंडगे ६ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज -१३५३/२०२५
श्री चंद्रकला अधिक सहा विरुध्द निरंक
पुढील तारीख २१.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1) Chandrakala Bhagvantrao Mankar , **Age 87 yrs., Occu.- Household**
2) Shila Sureshrao Mankar , **Age 60 yrs., Occu.- Household**
3) Roshan Sureshrao Mankar, **Age 37 yrs., Occu.- Labour applicant no. 1 to 3 R/o. Kund Sarjapur, Haturna, Amravati, Tq. & Dist. Amravati**
4) Trupti Vinodrao Thakare, **Age 39 yrs., Occu.- Household R/o Mahuli Jahagir, Tq. & Dist. Amravati**
5) Padma Rameshwar Pathare, **Age 61 yrs., Occu.- Household R/o Jawala Shahapur, Tq.Chandur Bazar, Dist. Amravati**
6) Chanda Sudhakarrao Gomase, **Age 60 yrs., Occu.- Household R/o.Sawarkheda Haturna, Tq. & Dist. Amravati**
7) Ranjanatai Narendra Kadu, **Age 56 yrs., Occu.- Household R/o. Jalka Hirapur, Tq. Bhatkuli, Dist. Amravati**

-- विरुध्द --

गैरअर्जदार - निरंक

**सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की,** मयत भगवंतराव राजाराम मानकर **हे** दि.२८.११.२०२१ **रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले.** अर्जदार चंद्रकला अधिक सहा विरुध्द निरंक **यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** [illegible] **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

त्यापेक्षा **श्रीमती चंद्रकला अधिक सहा विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १०.०७.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशान्वये,**
सहायक अधीक्षक,
**दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती**

---

***No.2***

### CIVIL JUDGE SENIOR DIVISION

IN THE COURT OF Smt. K.R. Rajput
4th JT. C.J.S.D. , AMRAVATI, Amravati, Amravati.

SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES
(O, 5, R, 1, 5)

Spl. C.S./339/2024
Ajay Purushottam Gulhane Vs Nilesh Bhagwantrao Bhasme
NEXT DATE: 22.07.2025

To,
Nilesh Bhagwantrao Bhasme
R/o. C/o. Bhagwantrao Bhasme, Shirala, Tq. & Dist. Amravati, MAHARASHTRA

Whereas Ajay Purushottam Gulhane has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in the Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the 22.07.2025 at 11.00 o'clock in the forenoon, to answer the claim, and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice, that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this 05.05.2025

4th JT. C.J.S.D. AMRAVATI

Notice - 1) Should you apprehend your witnesses will not attend of their own accord you can have a summons from this Court to compel the attedance of any witness, and the production of any document that you have a right to call on the witness to produce, on applying to the Court and on depositing the necessary expenses.
2) If you admit the claim, you should pay the money into Court together with the costs of the suit, to avoid execution of the decree, which may be against your person or property, or both.

Visit ecourts.gov.in for updates or download mobile app "eCourts Services" from Android or IOS.

The process is system generated and transmitted in secured manner by authorised user as such physical signature not applied.

शिक्का
**आदेशानुसार,**
सहाय्यक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय (व.स्तर), अमरावती**

---

## जाहिरनामा

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**

**श्री.ए.एच.बेग ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.कं.१०५७/२०२५ **राजश्री व इतर वि निरंक** पुढील तारीख ०४.०८.२०२५

**अर्जदार** : १. राजश्री प्रभाकर रोहनकर वय ६० वर्षे, व्यवसायः घरकाम
रा. कोर्ट रोड विदयानिकेतन कॉलनी ता परतवाडा जि अमरावती
२. राजेश आनंदराव पत्की वय ५७ वर्षे, व्यवसाय व्यवसाय नोकरी
रा. ३६/बी, अमनका प्लॉट व्दारका नगरी सोनोने हॉस्पिटल च्या मागे अकोला ता जि अकोला
३. अनिरूध्द आनंदराव पत्की वय ५३ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा. १५ दुर्गविहार कॉलनी दसरा मैदान रोड बियाणी कॉलेज जवळ राजापेठ अमरावती ता जि. अमरावती ४. अभय आनंदराव पत्की वय :४७ वर्ष व्यवसाय :नोकरी
रा. फलॅट नं १०२ कपा सिंधु-२ ३९/१, योगी पार्क ऑडी शोरूम जवळ बानेर पुणे जि. पुणे

**विरुध्द**
**गैरअर्जदार निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **सरोज आनंद पत्की हे** दि २१/ ०९ /२०२४ रोजी अमरावती येथे मयत झाल्या **अर्जदार राजश्री प्रभाकर रोहनकर व इतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे

त्यापेक्षा **राजश्री प्रभाकर रोहनकर व इतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदर्हू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हू कोर्ट अर्जदार याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्हू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दि. ०३.०७.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर,अमरावती**

---

## जाहिरनामा

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ सह, अमरावती**

**श्री. एस. भी. फळवाते २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.कं.१९९२/१०/२५ पुढील तारीख १४.०८.२०२५

अर्जदार...फकिरा गणपत पाटील
वय ५४ वर्षे, व्यवसाय मजूरी
रा. निमजोत मंडल फ्रेजरपुरा अमरावती ता जि. अमरावती

**विरुध्द**
**गैरअर्जदार निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत गणपत तुकाराम पाटील व गेंदाबाई गणपत पाटील हे अनुक्रमे** दि. ०५.०९.१९८९ व दि. ११.०९ १९९२ रोजी अमरावती येथे मयत झाल्या **अर्जदार फकिरा गाणपत पाटील** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे

त्यापेक्षा **फकिरा गणपत पाटील** वरीलप्रमाणे सदर्हू मयताचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदर्हू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हू कोर्ट अर्जदार यांचे हाक्काबद्दल लागलाच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्याना सदर्हू मयत याचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि ०१.०७.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
**सहायक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर अमरावती

---

## जाहिरनामा

**विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब (क.स्तर) मोर्शी**

आर.एम.जे.सी.कं. ४४३/२०२५. ने.ता. २०/०८/२०२५

**अर्जदारः** मंगला रमेशराव विखार,
वय ४९ वर्षे,व्यवसाय - घरकाम,
रा. शहापुर, ता. वरुड, जि. अमरावती

**विरुध्द**
**निल (कुणीही नाही)**

वरील अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधिश साहेब (क. स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत U/s 2 बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदाराची आई नामे **मधुमती रमेश विखार** यांचा दि.२८/०४/२०२५ रोजी सुपर ओम्स हॉस्पीटल नागपुर, ता. जि. नागपुर येथे मृत्यु झाला. तसेच मयतांचे नांवे असलेल्या शासकीय तथा निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र करीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताना वरील अर्जदारांशिवाय ईतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, जर कोणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महीण्याच्या आत वि. न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

शिक्का
आदेशानुसार
**(सहायक अधिक्षक)**
दिवाणी न्यायालय, क.स्तर मोर्शी

---

## जाहिरनामा

विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (कस्तर) चांदूर बाजार, जि. अमरावती

**आर.एम.जे.त्ती. ४५९/२५** **ने.ता. २६/०८/२०२७**

अर्जदार : **(१)अशफाक शे. हुसेन**
**(२) शे. ईस्माईल शे.हुसेन**
**(३) शे. अनिस शे. हुसेन**
**- रा. तढ़ेगांव मोहना ता. चांदूर बाजार, जि. अमरावती**
**(४) सायरा बी मो अफसर**
**रा. येसूर्ण ता. अचलपूर नि. अमरावती.**

... विरुध्द...
गैरअर्जद्वार : -निरंक

बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

**अर्जदार वरील ठिकाणी रहातात. अर्जदाराचे वडील शे. हुसेन शेख हमदू हे दि. १७-०४-२० हे रोजी व अर्जदारांची आई. हमशत पी. शे. हुसेन २३.८.२०१८रोजी मरण पावले. यांच्या मृत्यू नंतर अर्जदार हेच त्याचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदारा व्यतीरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.**

**अर्जदार वारस असल्याने त्यांना कार्यालयीन** शासकीय/निमशासकीय **कामाकरीता वारसाच्या प्रमाणपत्राची आवश्यक्ता आहे त्याकरिता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (कस्तर) चांदुर बाजार येथील न्यायालयात** आर.एम.जे.सी. नं.४५९/२५ **नुसार अर्ज दाखल केला आहे**

**त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.**

**आज दि १०/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिली**

शिक्का
**आदेशानुसार**
सहाय्यक अधिक्षक
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार**

---

## जाहिरनामा

**अचलपुर येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधिश-२, यांचे न्यायालय**

किरकोळ दिवाणी अर्ज क. ६८/२०२५ ने.ता. २०/०९/२०२५

**पिटीशनरः** श्रीयोग केतन मोहोड
**रिस्पांडंट** निरंक

**हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियमाचे कलम ८ प्रमाणे मालमत्ता प्लॉट विक्रीची परवानगी मिळणेबाबत,**

ज्याअर्थी वरील **अर्जदार क. श्रीयोग केतन मोहोड,** वय ०४ वर्षे, व्यापार निरंक तर्फे अज्ञान पालन कर्ता **आई-अमृता केतन मोहोड,** वय ३९ वर्षे, व्यवसाय घरकाम, रा. प्रल्हादपूर, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती यांच्या हिश्याची खालील वर्णनाची स्थावर मालमत्ता विकण्याची परवानगी करिता वि. जिल्हा न्यायाधीश-२, अचलपुर यांच्या न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे, त्या मालमत्तेचे वर्णन पुढीलप्रमाणे-

**अर्जदार यांचे मालकी व ताब्यात मौजे चांदुर बाजार ता. चांपुर बाजार, जि. अमरावती मा. उपविभागीय अधिकारी कार्यालय, अचलपुर यांचे फाइल वरील एन.पी.ए. ३४/ चांदुर बाजार/०६/०२/ १९७४-७५ नुसार ले-आउट मधील प्लॉट ज्याचा भुमापन क्रमांक व उपविभाग ४७/४८/४९/१/अ ज्याचे एकुण क्षेत्रफळ २७८.८१ चौ.मी. (३००० चौ.फुट.) आकार रू. ५०१.८५ मधील सामाहिक हिस्सा या जागेच्या चतुर सीमा,**

**पुर्वेस** : प्लॉट नंबर ४४ **पश्चिमेस** : प्लॉट नंबर ४२
**उत्तरेस** : लेआउट मधील रोड, **दक्षिणेस** : सर्विस लाईन.

**ही लेआउट मधील प्लॉट मालमत्ता आहे. सदरहू प्लॉट मालमत्तेमध्ये अर्जदाराचे नाव सामायिक उपभोगता म्हणून असून, सदरहू मालमत्ता अर्जदाराचे नावे वडिलोपार्जित रित्या आलेली आहे. सदरहु मालमत्ता हि अर्जदाराचे आजोबा विठ्ठलराव काशिनाथराव मोहोड यांनी खरेदी केलेला होता, विठ्ठलराव काशिनाथराव मोहोड यांच्या मृत्युनंतर विठ्ठलराव काशिनाथराव मोहोड यांचे संपूर्ण वारसांचे सदरहू मालमत्ते मध्ये हक्क निर्माण झालेले आहेत. त्यामुळे सदरहू मालमत्तेची खरेदी विक्रम विठ्ठलराव मोहोड हे करत असून इतर हक्कदार त्यांना खरेदी करून देण्यास तयार आहे.**

त्या अर्थी सदर अर्जाविरुध्द व मालमत्तेबाबत कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाचे असल्यास / कोणाचाही बोजा, गहाण, हक्क वारसा, कोर्ट हूकूमनामा, सावकारी तथा निमसरकारी कर्ज वगैरे असल्यास अर्जदाराचे सर्व नातलग व हितसंबंधी आणि सर्वत्र लोकांस जाहीर नोटीस देण्यात येते की, त्यांनी **दिनांक २०/०९/२०२५** रोजी सकाळी ११.०० वाजता **वि. जिल्हा न्यायाधीश-२, अचलपुर** यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास निकाल दिला जाईल.

आज दिनांक १०-०७-२०२५ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दिसाठी दिला असे

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
जिल्हा व सत्र न्यायालय, अचलपुर

---

## जाहिरनामा

**मा. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

किरकोळ अर्ज क्र. :- १३९/२०२५ **संगिता आणि इतर//वि//निरंक** ने ता :- १७-०७-२०२५

**अर्जदार :-** १) सांगिता अशोक नांदुरकर
२) महेश अशोकराव नांदूरकर
३) लक्ष्मी राजु नांदुरकर
४) सार्थक राजु नांदुरकर
अ.क्र.१ ते ०४ रा वार्ड नं ०४ मोरगांव रोड लोणी टाकळी ता नांदगांव खंडेश्वर जि अमरावती

**-विरूध्द-**
**//वि// निरंक**

ज्याअर्थी, मयत. **रामदास शामराव नांदुरकर यांचा मृत्यु दि.३१.१०.२०२२ तसेच मयत मनोरमा रामदास नांदुरकर यांचा मृत्यु दि.१८.०४.२०२४ रोजी लोणी टाकळी, ता नांदगांव खंडेश्वर जि अमरावती** येथे झाला आहे. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

**आज दिनांक : १७ जुन २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
सहाय्यक अधिक्षक मा. दिवाणी न्यायालय,
नादगांव खंडेश्वर

---

## जाहिरनामा

**दिवाणी न्यायाधिश (क.स्तर), चांदुर रेल्वे, जि. अमरावती यांचे न्यायालय**

आर एम जे सि. क्रमांक १७७/२०२५ ने.ता.तारीख :-१३/०८/२०२५

अर्जदार :- १. भास्कर विश्वनाथ भोयर वय ५७ वर्षे, व्यवसाय -मजुरी
२. अंबादास विश्वनाथ भोयर वय ७६ वर्षे, व्यवसाय -मजुरी
दोन्ही रा. खडकपुरा, चांदुर रेल्वे, ता. चांदुर रेल्वे, जि. अमरावती

**-विरुध्द-**
**गैरअर्जदार : निरंक**

या नोटीस व्दारे सर्व लोकांस सुचित करण्यात येते की, **भास्कर विश्वनाथ भोयर** व इतर-वि- निरंक यांनी दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदुर रेल्वे यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे भाग ८ कलम र प्रमाणे, अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **यमुनाबाई विश्वनाथ भोयर** यांचा मृत्यु दिनांक ०१/१०/२०१५ रोजी खडकपुरा, चांदुर रेल्वे, त्ता चांदुर रेल्वे, जि अमरावती येथे झाला अर्जदार यांचे शिवाय मयताचे इतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमूद केले आहे.वरील प्रमाणे सदरहु मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबदल लागतील पुरावा घेवुन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषीत करून देण्यात येईल

आज दिनांक ०९ माहे जुलै २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

शिक्का
**आदेशानुसार**
सहा अधिक्षक दिवाणी न्यायालय,
चांदुर रेल्वे

---

## जाहिरनामा

**मा. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

किरकोळ अर्ज क्र. :- १७९ /२०२५ **प्रतिभा/वि/निरक** ने.ता.तारीख :- ११/०८/२०२५

१. प्रतिभा नामदेवराव घोडे रा एरंडगाव ता नांदगाव खंडेश्वर जि अमरावती
२. किरण दिलीप घोडे रा कामरगाव (लाड) ना कारंजा जि वाशिम
३: प्रकाश उत्तमराव बंड रा एरंडगाव ता नांदगाव खंडेश्वर जि अमरावती
४. दिनेश उत्तमराव बंड रा बोरगडी रोड आदिवासी कॉलनी ऋग्वेद कॅम्पस पुसद ता पुसद जि यवतमाळ
५: महेंद्र उत्तमराव बंड रा एरंडगाव ता नांदगाव खंडेश्वर जि अमरावती
६: छाया गुरुदेव मारोटकर रा लेहगाव ता मोर्शी जि अमरावती

//वि//
निरंक

ज्याअर्थी, मयत **उत्तमराव चंद्रभान बंड** यांचा मृत्यु **दि.२३.०३.२०२१** रोजी एरंडगांव ता नांदगाव खंडेश्वर जि अमरावती येथे झाला आहे. त्यांचे मुळगाव एरंडगाव हेच होते. **अर्जदार हे मयत यांचे मुले-मुली आहेत. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशीर वारस आहेत करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.**त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्याव्याच्या असेल तर त्यानी न तारखेस सकाळी १०.३० वाजता मा दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होदन निकाल दिला जाईल.आज दिनांकः १० जुलै २०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

शिक्का
**आदेशानुसार**
सहाय्यक अधिक्षक
**मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर**

---

## जाहिरनामा

**वि २ रे सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**

किरकोळ अर्ज क. २७३/२०२५ ने.ता.११/०८/२०२५

**अर्जदारः-**१. सहदेव पूर्णाजी वानखडे, वय ६५ वर्ष व्यवसाय -मजूरी
२. डिगांबर पूर्णाजी वानखडे, वय ६२ वर्षे व्यवसाय - मजूरी
३. रघुनाथ पूर्णाजी वानखडे, वय ५६ वर्षे व्यवसाय - मजूरी
४. गोवर्धन पूर्णाजी वानखडे, वय ५० वर्षे व्यवसाय - मजूरी
५.वच्छला गुलाबराव डोंगरे, वय ६२ वर्षे व्यवसाय - घरकाम
६ राजकन्या अंबादास तायडे, वय ५३ वर्षे व्यवसाय -घरकाम
नं. १ व ४ रा. दर्यापूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती
नं. २ व ३ रा. हिंगणी मिर्झापूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती
नं. ५ रा. शिंदी, ता. अचलपूर, जि. अमरावती
नं. ६ रा. रोहणा, ता.जि. अकोला.

**विरूध्द**
**गैरअर्जदार -निरंक**

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, **पूर्णाजी चतुराजी वानखडे हे दि. २५/०६/२००९ व त्यांची पत्नी बनाबाई पूर्णाजी वानखडे दि.०४/०९/२००८ रोजी मयत झाले आहे.**अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत** न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि.०९/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. सहा. अधिक्षक (प्रशासन)
**दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापूर**

---

## जाहिरनामा

**वि दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**

किरकोळ अर्ज क. २२१/२०२५ ने.ता.१९/०७/२०२५

**अर्जदारः-**१.सुखदेव गंगारामजी अमझरे, वय ७० वर्ष व्यवसाय- मजूरी
२.महादेव सुखदेव अमझरे, वय ३४ वर्ष व्यवसाय- मजुरी दोघेही रा. सांगवा बु. पो.येसुर्ना ता. दर्यापूर जि. अमरावती.

विरूध्द
१. गजानन सुखदेव अमझरे, वय ४१ वर्षे व्यवसाय- मजूरी रा. सांगवा बु. ता. दर्यापुर जि. अमरावती.
२. सविता शिवदास पारिशे, वय ४५ वर्षे धंदा घरकाम रा. पुर्णानगर धुगाव, ता. भातकुली, जि. अमरावती.
३.अर्चना निलेश पारिपो वय ३८ वर्षे धंदा घरकाम रा. घोडगाव कविठा ता. चांदुरबाजार, जि. अमरावती.

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, **रत्नाबाई सुखदेवराव अमझरे हे दि. २६/०५/२०१८ रोजी मरण** पावले आहे. अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत** न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. **मालमत्तेचे वर्णन :- मयत रत्नाबाई सुखदेवराव अमझरे** यांचे नावे मौजा सांगवा बु. ता. दर्यापूर जि. अमरावती येथे भुमापण क. ४६ क्षेत्र ३ हे. १८ आर पैकी ०.७९ हे. आर व पो.स. ०.०५ हे. आर. ही मिळकत आहे.

आज दि१३/०६/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. सहा. अधिक्षक (प्रशासन)
**दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापूर**

---

## जाहिरनामा

**वि दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**

किरकोळ अर्ज क. २३९/२०२५ ने.ता.१९/०७/२०२५

अर्जदारः-१. सुरेश मिरगाजी सोनोने वय ४३ वर्षे, व्यवसाय - मजूरी रा. पनोरा, ता. दर्यापूर, जि. अमरावती.२.पद्मा उमाकांत भोजेकर,वय ४१ वर्षे, व्यवसाय - घरकाम
३.सुनंदा संजयराव भोजेकर वय ४० वर्षे, व्यवसाय -घरकाम
नं. २ व ३ रा.बेलोरा, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती.

**- विरुध्द -**
**गैरअर्जदार-निरंक**

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, **ताईबाई मिरगाजी सोनोने हे दि. २२/०८/२०२१ रोजी मरण पावले आहे.**

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे व कलम ३७२ भारतीय वारसाहक्क कायद्यानुसार वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत** न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा, अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन :** मयत ताईबाई मिरगाजी सोनोने यांचे नावे मौजे पनोरा, ता. दर्यापूर, जि. अमरावती येथील ग्रा.नं. अ.क. ४५, मालमत्ता क. ३१, क्षेत्रफळ ९०० चौ. फुट येणेप्रमाणे मिळकत आहे व त्या मिळकतीची बाजारभाव किंमत ३०,०००/- रूपये आहे. तसेच **मयत ताईबाई मिरगाजी सोनोने** यांनी महाराष्ट बैंक शाखा दर्यापूर येथे बचत खाते उघडले होते त्या खात्याची खाते क २०२३३९६३५२५ असा असून त्या खात्यात त्याचे नाव रक्कम रू. ७१,५५२ एवढी रक्कम जमा आहे.आज दि. २४/०६/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. सहा. अधिक्षक (प्रशासन)
**दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापूर**

---

## जाहिरनामा

**वि दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**

किरकोळ अर्ज क. २७५/२०२५ ने.ता.२५/०८/२०२५

**अर्जदारः-**१. कमल उत्तमराव गवई,वय ६९ वर्ष,व्यवसाय -घरकाम.
रा. गणेशपूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती.
२. अरविंद उत्तमराव गवई,वय -४४ वर्ष ,व्यवसाय -नोकरी
३. रविंद्र उत्तमराव गवई,वय -४२ वर्षे, व्यवसाय -नोकरी
नं. २ व ३ रा. मुंबई, जि. मुंबई

**- विरुध्द -**
**गैरअर्जदार-निरंक**

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, **उत्तम शामराव गवई हे दि. ०५/०४/२०२५ रोजी मरण पावले आहे.** रोजी मरण पावले आहे. अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत न्यायालयात** अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन :- मयत उत्तम शामराव गवई** यांचे नावे मौजा पनोरा ता. दर्यापूर, जि. अमरावती येथील शेत गट क. १८७, क्षेत्र ० हे. ७९ आर, आ.रू. ३.३१ येणे प्रमाणे शेत व मौजा गायवाडी ता. दर्यापूर, जि. अमरावती येथील अ.क. १५०, मालमत्ता क. ६२४ क्षेत्रफळ २२५ चौ. फुट यावर बांधलेले घर येणे प्रमाणे मिळकत आहे. सदर मिळकतीची बाजारभाव किंमत ५०,०००/- रू. आहे.

आज दि. १०/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. सहा. अधिक्षक (प्रशासन)
**दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापूर**

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३६ अंक ३१०**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटर, कॅट व अमरावती चेंबर ऑफ कॉमर्स यांच्यात सामंजस्य करार

## अमरावतीसह विदर्भातील नवउद्योजकांसाठी एक नवीन पर्वणी

**अमरावती/का.प्र.**

उद्योजकतेला चालना देण्यासाठी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या अंतर्गत कार्यरत रिसर्च अँड इन्क्युबेशन फाउंडेशन आणि कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स तसेच अमरावती चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री यांच्यात कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे,ननसा संचालक डॉ. अजय लाड यांच्या मार्गदर्शनाखाली सामंजस्य करार करण्यात आला.

या कराराच्या माध्यमातून महिला उद्योजकांना तांत्रिक, व्यावसायिक व सल्लागार मदत,



प्रशिक्षण, स्टार्टअपसाठी पोषक वातावरण आणि कौशल्यविकासाच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

सामंजस्य करारावर विद्यापीठातर्फे इन्क्युबेशन सेंटरच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर व सीईओ आनंद यादव तर कॅटच्या वतीने राष्ट्रीय अध्यक्ष सीए बी.सी. भरतीया व विदर्भ अध्यक्ष विनोद कलंत्री यांनी स्वाक्षरी केली. अमरावती चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री सोबत झालेल्या करारावर अध्यक्ष विनोद कलंत्री व चेंबरच्या शिक्षण समिती सभापती डॉ. वर्षा देशमुख यांनी स्वाक्षरी केली. यावेळी डॉ. स्वाती शेरेकर, कॅटचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री भरतीया, कॅट विदर्भ व अमरावती चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे अध्यक्ष श्री विनोद कलंत्री, कार्यकारणी सदस्य शाम शर्मा, विदर्भ महामंत्री निकेश गुप्ता, सौरभ मालाणी, विदर्भ मार्गदर्शक वसंत बाबू बछुका, अशोक डालमिया, महिला सेलच्या अध्यक्ष डॉ. कुंजन वेद, अमरावती जिल्हाध्यक्ष गोविंद सोमाणी, आत्माराम पुरस्वाणी, गोपाल पांडे, उपस्थित होते. चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे दिनेश सूर्यवंशी, डॉ. वर्षा देशमुख, विरेंद्र लड्डा, रामेश्वर गग्गड, ओमप्रकाश नावंदर, मीनाक्षी सिकची, अॅड. जगदीश शर्मा, विद्यापीठातर्फे इन्क्युबेशन फाऊंडेशनचे राज्य समन्वयक आनंद यादव, अमोल हिरुळकर आदी मान्यवर उपस्थित होते. या सामंजस्य करारामुळे अमरावती व विदर्भातील नवउद्योजकांसाठी एक नवीन पर्व सुरू होणार असून उद्योजकतेच्या विकासाला अधिक बळकटी मिळणार आहे. विद्यापीठाच्या रिसर्च अँड इन्क्युबेशन फाउंडेशनकडून याआधीही स्टार्टअप्ससाठी सक्रीय मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले असून, या करारामुळे ही प्रक्रिया अधिक प्रभावी होणार असल्याचे मत डॉ. स्वाती शेरेकर यांनी व्यक्त केले.

# अखेर विद्युत वितरण कंपनीने फोटो काढण्याचा आदेश घेतला मागे

### बिलाची वसुली करताना वीज ग्राहकांचे घेत होते फोटो

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी विद्युत वितरण कंपनी कार्यालयाकडून




थकबाकीदारांकडून वीजबिल वसूल करत असताना विद्युत वितरण कंपनीचे कर्मचारी ग्राहकांचे बिल घेत असताना मोबाईलव्दारे ग्राहकांचे असलेल्या अवस्थेत फोटो घेऊन कार्यालयीन व्हॉटअॅप ग्रुपवर वरिष्ठ अधिकाऱ्यांना कर्तव्य बजावत आहे असे दाखवण्यासाठी ग्राहकांचे फोटो काढण्याचा प्रकार उघडकीस आला होता.विद्युत वितरण कंपनीने अचलपूर सबडिवीजन विभागा व अंजनगाव सुर्जी उपविभागाने या आदेशा बाबत सारवासारव करून हा आदेश मागे घेण्यात आल्याचे सांगितलें आहे

अनेक ग्राहकांनी फोटो काढत असल्याने विद्युत वितरण कंपनीच्या कामकाजाबाबत नाराजी व्यक्त केली होती. विज बिलाचे पैसे देत असताना बहुतांश फोटो हे महिला व मुलींचे होते तर काही पुरुषांचे बनियान लुंगीवरच होते.याबाबत विद्युत वितरण कंपनीच्या या हुकुमशाही आदेश बाबत वृत्तपत्रात बातम्या प्रकाशित केल्या होत्या. विद्युत वितरण कंपनीने अचलपूर सबडिवीजन विभागा व अंजनगाव सुर्जी उपविभागाने या आदेशा बाबत सारवासारव करून हा आदेश मागे घेण्यात आल्याचे सांगितलें आहे.वीज ग्राहकांचे या नंतर फोटो घेतले जाणार नसुन यात सुधारणा करून विज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना विज बिल वसूल करताना बिलाचे व कर्मचारी कर्तव्यावर आहे का त्या लोकेशन च फक्त फोटो घेण्यात येणार असल्याचे कार्यकारी अभियंता अचलपूर प्रदीप अंधारे व अंजनगाव सुर्जी विद्युत वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता



तुषार गांजरे यांनी सांगितले आहे.

# भाजपाचे सुधीर रसे यांचा वाढदिवस विविध उपक्रमाने साजरा



**अचलपूर/वार्ताहर**

भाजपा अमरावती जिल्हा ग्रामीण उपाध्यक्ष सुधीर रसे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवुन त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.भाजपा जिल्हा ग्रामीण उपाध्यक्ष सुधीर रसे यांच्या वाढदिवसा निमित्त अंध विद्यालय धोतरखेडा, विसावा वृद्धाश्रम, अचलपूर उपजिल्हा रुग्णालय येथे शाम रोटी केंद्रा मार्फत भोजन वितरित करण्यात आले.तर पथ्रोट येथील तलाठी कार्यालयात वृक्षारोपण करून त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. व कविटकर सभागृह येथे अभिष्टचिंतन सोहळा पार पडला.

कार्यक्रमाला आमदार केवलरामजी काळे, माजी आमदार प्रभूदास भिलावेकर, भाजपा नेते, गजानन कोल्हे,युवा स्वाभिमान पक्षाचे उपेण बछले ,तमिज शहा तथा भाजपाचे अनेक मान्यवर मंडळी उपस्थितीत होते. या अभिष्टचिंतन सोहळ्यामध्ये गरीब परिस्थितीतून शासकीय नोकरी मध्ये सेवेत रुजू झालेल्या तरुणाचा य सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रतिष्ठित नागरीक,व्यापारी ,शेतकरी वर्ग ,युवा वर्ग व भाजपा पक्षाचे पदाधिकारी ,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थितीत होते .संपूर्ण जिल्ह्यात नव्हे तर राज्यात सुधीर रसे हे भाजपाचे एकनिष्ठ कार्यकर्ते म्हणून परिचित आहे. त्यांच्या कुशल नेतृत्वात जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत मध्ये भाजपा पक्षाचा उमेदवारांनी विजय संपादन करून अनेकानी कार्यकाल त्यांच्या नेतृत्वात यशस्वी रित्या पार पाडले. सुधिर रसे यांनी आपला तगडा जनसंपर्क तयार करीत कार्यकर्त्यांची मोठी फळी निर्माण केली आहे .

# संत नरहरी अनासक्त कर्मयोगी-डॉ.सतीश तराळ



**अमरावती/का.प्र.**

महामुनी संबोधले जाणारे संत नरहरी प्रज्ञावान ,प्रतिभा संपन्न कवी होते. ते उत्कृष्ट कलावंत,प्रामाणिक सुवर्णकार, अनासक्त वृत्तीचे महान कर्मयोगी व वारकरी संप्रदायातील श्रेष्ठ संत होते अशा आशयाचे उद्‌घार डॉ सतीश तराळ यांनी काढले.

संत नरहरी माळवी सोनार संघातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराप्रसंगी संत नरहरी सभागृहात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष माननीय राजूभाऊ अनासने होते. डॉ. सतीश तराळ पुढे म्हणाले,कडवे शिवभक्त असणारे नरहरी विठ्ठल भक्त झाले व त्यांनी सगुणातून निर्गुण प्राप्तीचा मार्ग



स्वीकारला. सभोवतांच्या प्राणी मात्रात ईश्वराचा शोध घेत त्यांनी भक्त आणि भगवंत यांच्यातील द्वैत दूर करून अद्वैतभाव निर्माण केला. ते उत्कृष्ट कलवंत, प्रामाणिक सुवर्णकार,अनासत्त्व वृत्तीचे महान कर्मयोगी व वारकरी संप्रदायातील श्रेष्ठ संत होते. आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने त्यांचे संतकाव्य श्रेष्ठ दर्जाचे आहे.सत्संग ,नामस्मरण व उत्कट भक्ती यातुन त्यांना आत्मसाक्षात्कार झाला व त्यांचा प्रपंच परमार्थमय झाला. याप्रसंगी सुवर्णकार समाजातील दहावी व बारावीत गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यां चा स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र, गुलाब पुष्प व शालेय साहित्य देऊन अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विचार पिठावर राजाभाऊ धररमकर, डॉ. विनोद गुहे,नितीन खांडेकर, प्रा. रवींद्रप्रांजळे, मंगेश नेरकर प्रा. रवींद्र प्रांजळे आदी मंडळी उपस्थित होती .कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. रवींद्र प्रांजाळे सचिव नरहरी माळवी सोनार संघ यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्राचार्य अनिल प्रांजळे यांनी करून दिला .डॉ. सतीश तराळ यांचा सत्कार संस्थेचे उपाध्यक्ष राजाभाऊ धरमठोक व डॉ. विनोद गुहे यांनी केला. आभार प्रदर्शन डॉ. उमेश खांडेकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता माथने व निलिमा माथने यांनी केले. यावेळी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यापीठाच्या परीक्षा २२ जुलैपासून

**अमरावती** -संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी - २०२५ फर्स्ट इयर ऑफ फाईव्ह इयर्स इंटीग्रेटेड मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन (फाईव्ह इयर्स टेन सेमिस्टर कोर्स) सेमिस्टर-२ (एन.ई.पी.) अभ्यासक्रमाच्या परीक्षा २२ जुलै, २०२५ पासून सुरू होणार असून सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्यावतीने जाहीर केले आहे, तरी सर्वसंबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे परीक्षा व मूल्यमापन विभागाकडून कळविण्यात आले आहे. जाहीर वेळापत्रकानुसार, दि. २२ जुलै रोजी कॉम्प्युटर आर्किटेक्चर ॲन्ड ऑर्गनायझेशन विषयाचा पेपर होईल. दि. २४ जुलै रोजी फंडामेंटल्स ऑफ इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड मायक्रोप्रोसेसर्स, दि. २६ जुलै रोजी सी प्लस प्लस प्रोग्रामिंग, दि. २८ जुलै रोजी स्टॅटीस्टिक फॉर डाटा सायन्स-२ व दि. ३० जुलै रोजी प्रोफेशनल कम्युनिकेशन-२ विषयाचा पेपर दुपारी २.०० ते ४.०० या वेळेत घेण्यात येणार आहेत. परीक्षा केंद्र हे विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या प्रवेशपत्रावर नमूद करण्यात आले आहे, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता विद्यापीठाच्या वेबसाईटवर परीक्षा विभागाच्या अधिका-यांच्या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

# 'डॉ. पंजाबराव देशमुख लिखित धर्माचा वैदिक वाङ्‌मयातील उदय आणि विकास'

### विशेष व्याख्यानाचे १७ जुलैला

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्राच्यावतीने डॉ. पंजाबराव देशमुख यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठात डी.फिल. पदवीसाठी केलेल्या संशोधनाच्या शताब्दी निमित्ताने १७ जुलै, रोजी दुपारी ४.०० वाजता विद्यापीठ परिसरातील डॉ. श्रीकांत जिचकार इतिहास संशोधन केंद्र येथे विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे अध्यक्ष तथा विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. हर्षवर्धन देशमुख उपस्थित राहतील.

प्रमुख वक्ते म्हणून पुणे येथील धर्म व तत्वज्ञानाचे जेष्ठ अभ्यासक डॉ. प्रदीप गोखले हे 'डॉ. पंजाबराव देशमुख लिखित धर्माचा वैदिक वाङ्‌मयातील उदय आणि विकास' यावर अभ्यासपूर्ण व्याख्यान देतील. सर्वांनी डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्राच्यावतीने आयोजित व्याख्यानास जास्तीतजास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे यांनी विद्यापीठाच्यावतीने केले आहे.

# दादासाहेब गवई स्मारकाचे एकाचवेळी लोकार्पण -जिल्हाधिकारी



**अमरावती/का.प्र.**

रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांचे स्मारक विद्यापीठ परिसरात करण्यात येत आहे. पुतळा, आर्ट गॅलरी आणि सभागृहाचे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे. स्मारकाची कामे गतीने पूर्ण करून एकाचवेळी संपूर्ण स्मारक लोकार्पण करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

यावेळी बांधकाम विभागाच्या अधिक्षक अभियंता रूपा गिरासे, कार्यकारी अभियंता श्री. गिरी यांच्यासह दूरदृष्य प्रणालीद्वारे स्मारकाशी संबंधित वास्तू विशारद, शिल्पकार आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. येरेकर म्हणाले, स्मारकांच्या अंतर्गत असणारा पुतळा तयार करण्यासाठी गवई यांच्या कुटुंबियांना सोबत घ्यावे. त्यांच्या सांगण्यानुसार सुधारणा करावी. पुतळ्याचे क्ले मॉडेल तयार आहे. हा पुतळा कला संचालनालयाकडून तपासून घ्यावा. तसेच शासकीय पातळीवर लागणाऱ्या सर्व परवानगी आणि पुतळा बसविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या जागेची पाहणी करावी. पुतळा हा साधारणतः १५ फुट उंचीचा राहणार असल्याने यासाठी आवश्यक बांधकामाची पाहणी करून पुतळा बसविण्यात यावा. आर्ट गॅलरीमधील छायाचित्र, तसेच गवई यांना प्राप्त झालेले पुरस्कार, सन्मान याबाबत कुटुंबियांची मदत घेऊन उत्कृष्टपणे स्मारकाच्या ठिकाणी प्रदर्शित करावे. स्मारकाचे संकेतस्थळ तयार करण्यात येणार आहे. यावर प्रकाशित करण्यात येणारा मजकूर बारकाईने वाचावा.

व्याकरण आणि शुद्धलेखनाच्या चुका होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. यात तज्ज्ञांची मदत घेतली जावी. आवश्यकता भासल्यास कुटुंबियांकडून मजकूर तपासून घ्यावे. याठिकाणी सोलार आणि वातानुकूलीत यंत्रणा बसविण्यात येणार आहे. त्यासाठी आवश्यक ती कामे तातडीने करून घ्यावी. स्मारकासाठी लागणारा संपूर्ण निधी प्राप्त झाला आहे. त्यामुळे स्मारकाच्या निर्मितीचे काम गतीने करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी येरेकर यांनी दिले.

## संक्षिप्त

### गुऱ्हाचा गोठा पाडण्याचे आदेश



**अंजनगाव बारी** - परिसरातील वार्ड क्रं. ६ मधील रहिवासी अशोक विठ्ठल माहेकर यांना ग्रामपंचायत द्वारे त्याचा गुऱ्हांचा गोठा पाडण्याचे आदेश ग्रामपंचायतने दिले आहे. यासाठी ग्रामपंचायतने असे सुचित केले की, संबंधित जागा ही सौंदर्यीकरणासाठी प्रास्तावित करण्यात आली आहे. परिसरातील या भागात इतरत्रही अतिक्रमण असुन प्रास्ताविक केलेल्या जागेत त्याचाही समावेश व्हावा याबाबतचे पत्र अशोक माहेकर यांनी संबंधित 'गटविकास अधिकारी' तथा ग्रामपंचायत सचिवांकडे दिले आहे. माहेकर यांचा आरोप आहे की, केवळ निवडक जागांवरच कारवाई करून ग्रामपंचायत इतर अतिक्रमणांबाबत डोळेझाक करत आहे. त्यांनी त्यांच्या निवेदनात इतर अतिक्रमणांचा तपशीलवार उल्लेख करून त्या सर्वांवरही कारवाईची मागणी केली आहे. या प्रकरणामुळे स्थानिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून, ग्रामपंचायतीने संपूर्ण भागाचा आढावा घेऊन निष्पक्ष व पारदर्शक कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

### आदिवासी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणाची संधी

**अमरावती**-महाराष्ट्र शासनामार्फत आदिवासी उमेदवारांसाठी कार्यरत असलेल्या कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र, अचलपूर कॅम्प, परतवाडा, जि. अमरावती येथे आदिवासी उमेदवारांना स्पर्धा परीक्षांचे विनामूल्य प्रशिक्षण दिले जाणार आहे. विविध शासकीय पदांसाठी घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांचे विनामूल्य प्रशिक्षण येथे दिले जाणार असून, ही आदिवासी सुशिक्षित उमेदवारांसाठी संधी आहे.या प्रशिक्षणाचा कालावधी १ ऑगस्ट २०२५ ते १५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत, म्हणजे साडेतीन महिन्यांचा असेल. या कालावधीत प्रशिक्षणार्थींना दरमहा एक हजार रुपये विद्यावेतन म्हणून दिले जाईल. विशेष म्हणजे, प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर, विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचा पुढील अभ्यास करण्यासाठी विविध विषयांच्या चार महत्त्वाच्या पुस्तकांचा संच विनामूल्य प्रदान करण्यात येणार आहे, ज्यामुळे त्यांच्या तयारीला मदत होईल. या प्रशिक्षणासाठी इच्छुक आणि पात्र असलेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांनी आपले अर्ज २९ जुलै २०२५ पर्यंत केंद्राच्या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. उमेदवारांच्या निवडीसाठी ३० जुलै २०२५ (बुधवार) रोजी दुपारी १२ वाजता मुलाखती आयोजित करण्यात आल्या आहेत. उमेदवाराची नोंदणी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र कार्यालयात केलेली असावी. अधिक माहितीसाठी ०७२२३-२२१२०५ किंवा ७७०९४३२०२४ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी यांनी केले आहे.

### आषाढी दहीहंडी उत्सव साजरा



**कुऱ्हा**-श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथे परंपरे प्रमाणे दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.सकाळी श्री रुख्मिणी माता पालखी सोहळा श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथे पोहोचला.सकाळी पादुकांचा वरदा नदीत अभिषेक तसेच भाविकांचे स्नान झाल्यावर आरती केली गेली व पालखी भक्तांच्या दर्शनार्थ ठेवण्यात आली.तहसिलदार मयुर कळसे व आशिष नागरे,नरेन्द्र कुरळकर यांनी पालखी सोहळ्यातील पदाधिकाऱ्यांचे स्वागत व अभिनंदन केले. सोहळा प्रमुख श्री सदानंद साधू यांनी पालखी सोहळ्यातील सर्व पंचकमेटी सदस्यांचे तसेच प्रशासनाचे आभार मानले.हभप पंकज महाराज महल्ले यांचे कीर्तन झाले.दहीहंडी उत्सवात हजारो भाविकांनी तसेच माजी खासदार नवनीत राणा, श्री व सौ रविराज, आरती राजेश वानखेडे अश्या मान्यवरांनी हजेरी लावली. या प्रसंगी संस्थानचे अध्यक्ष नामदेव अमाळकर,सदानंद साधू,वसंत दाहे,सुरेश चव्हाण, हिम्मतराव टाकोणे,अशोक पवार,अतुल ठाकरे तसेच पंचकमेटी सदस्य हभप पंकज महाराज महल्ले,श्याम श्रीराव,स्वप्नील जामखुटे,विणेकरी विठोबाजी बागडे,चोपदार रमेश डेहणकर, गजानन डहाके हजर होते.

### सेवानिवृत्ती व वारसाची नियुक्ती कौतुकास्पद

**चांदुर रेल्वे**- नगर परिषद,चांदुर रेल्वे अंतर्गत कार्यरत असलेले दीर्घकाळापासून सेवा देणाऱ्या सफाई कर्मचारी शिला राजू कनोजे ह्या नुकत्याच सेवानिवृत्त झाल्या. त्यांनी आपल्या सेवाकालात निष्ठेने, प्रामाणिकपणे व मनापासून काम करत सफाई विभागात महत्त्वपूर्ण योगदान दिले. सेवानिवृत्ती पश्चात त्यांच्या जागेवर लाल पागे समितीच्या परिपत्रकानुसार त्यांच्या जागेवर वारसा प्रमाणे त्यांचा सुपुत्र विशाल राजू कनोजे याला वारस म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



आतापर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात हे प्रथमदा झाले आहे की वारसा हक्क प्रमाणे ज्या दिवशी कर्मचारी यांना सेवानिवृत्त करण्यात आले त्याच दिवशी त्यांच्या वारसाला नियुक्त प्रदान करण्यात आलेली आहे.डॉ.विकास खंडारे मुख्याधिकारी साहेब यांच्या या निर्णय अत्यंत कौतुकास्पद असून गरजू व काम करण्याची इच्छाशक्ती असलेल्या वारसांना संधी देणारा आहे.या निर्णयामागे डॉ.खंडारे यांचे मार्गदर्शन सहकार्य आणि माणुसकीची भावना यांचा मोठा वाटा आहे. त्यांच्या पुढाकारामुळे एक परिवार आर्थिक दृष्ट्या सशक्त झाला असून त्यांचा उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल सुरु झाली आहे.

# इलेक्ट्रिक सिमेंटचे पोल घेऊन जाणारा ट्रॅक्टर पलटी

## एकाचा मृत्यू, चौघांची प्रकृती चिंताजनक

**मोर्शी/प्रतिनिधीः-** इलेक्ट्रिक सिमेंटचे पोल भरून जाणारा ट्रॅक्टर अचानक पलटी होऊन झालेल्या भीषण अपघातात एका २६ वर्षीय युवकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला असून पाच जखमींना उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे भरती करण्यात आले. त्यापैकी चार जणांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती येथे हलविण्यात आले.सदर घटना आज दि.१४ जुलै रोजी ११:३० वाजताचे दरम्यान मोर्शी पोलीस स्टेशन अंतर्गत









येणाऱ्या वरला फाट्यानजीक घडली.मृतकाचे नाव अनिकेत सुनील मुंदाफळे (वय २६,रा. आष्टगाव) असे आहे.

प्राप्त माहितीनुसार मोर्शी ते चांदूरबाजार रोडवर असलेल्या आष्टगाव गाव येथून मजूर सचिन धनु लोखंडे (वय २९), रोशन शामराव धारवाडे (वय २७),रोशन लंगडाजी कासदेकर (वय २२), दीपक गणेश भोकरे (वय २३) सर्व रा.बैलमंडी तसेच अनिल महेश जानवंशी (वय ३२) व अनिकेत सुनील मुंदाफळे (वय २६,दोघेही रा.आष्टगाव) हे आष्टगाव येथून महेंद्रा ट्रॅक्टर क्र. एम. एच. २७ डी.एल.०४७२ यामध्ये सिमेंटचे इलेक्ट्रिक पोल लावण्यासाठी बेलोरा येथे जात होते. दरम्यान अचानक वरला ते आष्टगावच्या मध्यभागी ट्रॅक्टर पलटी होऊन झालेल्या अपघातात अनिकेत सुनील मुंदाफळे (वय २६) याचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.इतर गंभीर जखमींना आष्टगावचे सरपंच दर्शन माल्हा व बंडू साउथ यांच्या गाडीने उपजिल्हा रुग्णालय ☞(पान २ वर)

# फेक वेडिंग'च्या नावाखाली हायप्रोफाईल बेकायदा पार्टी!

## 'एरिया ९१' बारवर गुन्हे शाखेची धाड

## ४० अल्पवयीनांपैकी चौघे नशेत आढळले

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील 'एरिया ९१' रेस्टो बारमध्ये अल्पवयीन मुलांना दारू पुरवून डीजेच्या तालावर मद्यधुंद पार्टी हे वास्तव पोलिसांच्या छाप्यामध्ये उघडकीस आलं आहे. 'फेक वेडिंग प्रोग्राम'च्या नावाखाली हा बेकायदेशीर प्रकार घडत होता. गुन्हे शाखा युनिट-२ च्या पथकाने धाडसी छापा टाकत बार मालक व आयोजकाला अटक केली होती.

१३ जुलैला रात्री, पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांना माहिती मिळाली की शंकर नगर येथील 'एरिया ९१' बारमध्ये अल्पवयीन मुलांना दारू पाजून पार्टी चालू आहे. तात्काळ पथकासह बारवर छापा टाकण्यात आला. बारच्या तिसऱ्या मजल्यावर १५० ते १७५ युवक-युवती मोठ्या आवाजात डीजेवर नाचत, दारू पिताना सापडले. ४० हून अधिक अल्पवयीन मुला-मुलींपैकी चौघे दारूच्या नशेत असल्याचे वैद्यकीय तपासणीत स्पष्ट झाले. बारमध्ये अत्यंत अश्लील गाणी, धिंगाणा, आणि नशेचा बेधुंद बाजार उघडकीस आला. आनंद राजू भेले (वय ३३, बार मालक) आणि सॅम हेमंत बजाज (वय १९, आयोजक) यांच्यासह इतर चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दारूच्या ५ बाटल्या, संगीत प्रणाली आणि अन्य पुरावे जप्त करण्यात आले.

ही कारवाई पोलिस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, सहायक पोलिस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट-२चे पोलीस निरीक्षक ☞(पान २ वर)

# सुंदरलाल चौकात आढळला

## वृद्धा चा रक्ताने माखलेला मृतदेह

### परिसरात उडाली खळबळ

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक चपरासीपुरा येथील सुंदरलाल चौकात आज सोमवारीं १४ जुलैच्या सकाळी एका घरात वृद्धाचा रक्ताने माखलेला मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली. राजेंद्र नामदेवराव मेटकर (वय ६१) असे मृतकाचे नाव आहे. माहितीनुसार मृतक राजेंद्र मेटकर सुंदरलाल चौकात सीएनपी पंप जवळ राहत होता. त्याची पत्नी गेल्या दोन



दिवसापासून बाहेरगावी गेली होती. यामुळे तो घरात एकटा होता. राजेंद्र भाजीपाल्याचा व्यवसाय करत होता तसेच त्याला दारूचे व्यसन होते. रविवारी रात्री पण तो दारू प्यायला होता आणि नशेमध्ये तो टाइल्स वर पडला. यामुळे त्याच्या डोक्यावर मार लागला होता. घरात कोणी नसल्यामुळे तो उठू न शकल्यामुळे त्याचे रक्त वाहू लागले. अत्याधिक रक्तस्त्राव झाल्यामुळे त्याचा मृत्यू झाला. सोमवारी सकाळी जेव्हा राजेंद्र ची पत्नी गावांवरून परत आली तेव्हा तिला घरात रक्तच रक्तच दिसले. तिने घरात जाऊन पाहिले तर पती राजेंद्र☞(पान २ वर)

# अचलपूर तालुक्यात प्रभाग रचना घोषीत

## ६ जि.प. ,१२ पंचायत सदस्य निवडावे लागणार

### जि.प. धोतरखेडा, पं.स.बोपापूर-खरपी नवे सर्कल

**अचलपूर/प्रतिनिधीः-** निवडणूक विभागाच्या निर्देशावर जिल्हाधिकारी अमरावती यांनी जिल्हा परिषद सर्कल व पंचायत समिती निवडणूक २०२५ करीता जि.प. व पं.स. गणाचे प्रारुप व प्रभागरचना निश्चित केली आहे.

अचलपूर तालुक्यात ५ जिल्हा असदपूर परिषद सदस्य संख्येत एका सदस्याची वाढ झाल्याने ६ जिल्हा परिषद सदस्य निवडुन द्यावे लागणार आहे. तर पंचायत समितीच्या १० सदस्यांच्या संख्येत दोनने वाढ झाल्याने १२ सदस्य निवडून द्यावे लागणार आहे.

जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी जिल्हा परिषद व पंचायत समितीची सीमा रचना घोषित करण्यात आल्याने अचलपूर तालुक्यात धामणगांव गढी, कांडली, धोतरखेडा, पथ्रोट, शिंदी, असदपूर या सर्कल सोबतच धोतरसखेडा हे नवे जि.प. सर्कल निश्चित करण्यात आले आहे. तर पंचायत समिती गणामध्ये धामणगांव गढी, खरपी, कविठा बु, कोहली, धोतरखेडा, वडगाव फत्तेपूर,



परसापूर पथ्रोट, शिंदी बु, रासेगांव, बोपापूर, असदपूर या १२ गणांचा समावेश आहे.

यात खरपी व बोपापूर या गणाचा समावेश नव्याने करण्यात आला आहे. नवीन रचनेप्रमाणे अचलपूर पंचायत समितीत पंचायत समितीच्या दोन सदस्य व एक जि.प. सदस्यांची संख्या वाढीव झाल्याने अनेक नव्या राजकिय नेत्यांनाही त्याचा लाभ होणार आहे. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडून घोषित करण्यात आलेल्या प्रभाग रचना कार्यक्रमावर हरकती व सूचना असल्यास २ ते ८ जुन दरम्यान हरकती सादर करता येणार आहे. प्राप्त हरकती २१ जुलै पर्यंत अमरावती जिल्हाधिकारी यांच्याकडे दाखल करता येणार आहे.त्यानंतर विभागीय आयुक्त कार्यालयात अंतीम सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर जिल्हाधिकारी अंतीम प्रभाग रचना प्रकाशीत करणार आहे.

**जिल्हा परिषद सर्कल निहाय ग्रा. पं. यादी -** धामणगाव गढी - धामणगांव गढी, वझझर,निमदरी, पिंपळखुटा, देवगांव, हनवतखेडा, एकलासपूर, खरपी, पांढरी, म्हसोना,मल्हारा, मालेपूर, निमकुंड, कोठारा, बेलखेडा.

कांडली- कांडली, कविठा बु, अंबाडा, घोडगांव, खेलदेवमाली, नारायणपूर, अवहीं, भूगांव,☞(पान २ वर)

# मार्की-वातोंडा पुलावर निकृष्ट झालेल्या कामाचे पितळ उघडे

## ग्राम सडक योजनाः दोन महिन्यापूर्वीच पुलाचे बांधकाम

**आसेगाव पूर्णा/** भातकुली तालुक्यातील मार्की-वातोंडा रस्त्यावरील नाल्यावर नुकताच प्रधानमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत रस्ताचे व नाल्यावरील पूलाचे बांधकाम पावसाळ्या लागण्यापूर्वीच झाले. मात्र निकृष्ट झालेल्या कामाचे पितळ उघडे पडून पुलाच्या बांधकामाचे पहिल्याच पावसात तीन तेरा वाजले आहे.

मार्की-वातोंडा रस्त्याच्या कामासोबतच मार्की गावाला लागूनच असलेल्या मोठ्या नाल्यावरील पुलाचे बांधकाम प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत पावसाळा लागण्यापूर्वीच झाले असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. सदर पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचा ग्रामस्थांनी आरोप केला असून याकडे सबंधितांनी लक्ष दिले नाही. मात्र गेल्या आठवड्यापासून सतत सुरू असलेल्या पावसामुळे नवीन बांधकाम केलेल्या पुलाचे तीन तेरा वाजले. दरम्यान या पुलाचे काम साधारण दोन महिन्यापूर्वीच पूर्ण झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. पुलाला तळे गेले असून



ग्रामस्थांसोबत घटनास्थळी जाऊन कामाची पाहणी केली. या दरम्यान डांबराचे पोपळे निघत असून पुलाला बऱ्याच ठिकाणी तळे गेले आहे. भविष्यात फुल हा धोकादायक झाला असून मोठ्या दुर्घटनेची शक्यता नाकारता येत नाही.

**-रोशनी सुरूसे,सरपंच, ग्रामपंचायत मार्की**

पुलाचे काम दोन वर्षापूर्वीच २०२३ च्या अखेरीस झाले आहे. पावसाळ्यापूर्वी रिपेरिंग काम करण्यात आले.

**-अमित सांगानी** (अभियंता), पंतप्रधान ग्राम सडक योजना

पुला जवळील रस्त्यावरील ☞(पान २ वर)

# विभागीय लोकशाही दिनात १६ प्रकरणांवर सुनावणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** विभागीय लोकशाही दिनासाठी प्राप्त अर्जांवर विहित कालमर्यादेत कार्यवाही करुन निपटारा होण्याच्या दृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. विभागाला प्राप्त होणाऱ्या प्रकरणांच्याबाबत मुद्देनिहाय चौकशी, पडताळणी करुन सुस्पष्ट अंतीम अहवाल तत्काळ सादर करावा. मागील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनी येवू नये, याची संबंधित विभाग प्रमुखांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश विभागीय आयुक्त



डॉ. श्वेता सिंघल यांनी संबंधित विभागांना आज येथे दिले. लोकशाही दिनात दाखल एकूण १६ प्रकरणांवर चर्चा करुन त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सुचनाही त्यांनी संबंधित विभागाला दिल्या. विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात आयुक्त सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही दिनाचे कामकाज पार पडले. अपर आयुक्त अजय☞(पान २ वर)

# ४३ गोवंशांची अवैध तस्करी करणा-या ट्रकवर कारवाई, दोन आरोपी ताब्यात

### ट्रकचा केला पाठलाग

**मोर्शी/प्रतिनिधीः-** मध्यभागातून पार्टिशन केलेल्या व मागच्या बाजूला तनसाचे पोते भरून असलेल्या आयशर ट्रकमध्ये अवैध्यरित्या गोवंशांना अतिशय निर्दयतेने कोंबून कत्तलीसाठी नेत असतांना मोर्शी पोलिसांनी बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांसह ट्रकचा पाठलाग केला. या आयशर ट्रकमधून जवळपास ४३ गोवंश जातीच्या जनावरांची तस्करी करून कत्तल करण्याच्या उद्देशाने नेत असलेल्या ट्रकला मोर्शी ते चांदूरबाजार रोडवरील वरला फाट्याजवळ अडवून दोन आरोपीसह ट्रकला ताब्यात घेऊन ट्रकसह जवळपास ३० ते ३२ लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात मोर्शी पोलिसांनी यश प्राप्त केले.ट्रकमध्ये कोंबून भरलेल्या ९ गोवंशांचा मृत्यू झाला.सदर घटना आज दि.१४ जुलै रोजी दु.२ वाजताचे सुमारास घडली.



मध्यप्रदेश येथून जनावरे आणून ते अवैध्यरित्या नेण्याचा गोरखधंदा दिवसेंदिवस वाढत चालला असून दि.१४ जुलै रोजी आयशर ट्रक क्र.एम एच ४० सिटी ४८११ मध्ये ४३ गोवंश अवैधरीत्या कोंबून मोर्शी येथून चांदूरबाजारकडे जात असल्याची गोपनीय माहिती मोर्शी पोलीस व बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांना प्राप्त झाली.त्या अनुषंगाने पोलिसांनी ट्रकचा पाठलाग करून त्यामध्ये गाय, कालवड,गोऱ्हा यासारखी ४३ जनावरांची सुटका करून ट्रकसह☞(पान २ वर)

# सावधान...शहरात तो युवक अनेकांना गंडवितोय

## पोलिसांनी द्यावे लक्ष, नागरिकांची सतर्कता महत्वाची

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात गेल्या काही दिवसांपासून एक युवक अनेकांना कधी सामाजिक कार्य म्हणून तर कधी ओळख परिचयाच्या नावावर पैसे मागून गंडवित असल्याचा प्रकार समोर आला आहे.

एक युवक शहरातील विविध भागात दुचाकीने फिरून एखाद्याला हेरून तुम्हाला आवाज लावतो आणि ओळखले नाही काय मला... किती वेळाचे आवाज देत आहे... तुम्हाला वाहन बाजूला लावा अशी विनंती करतो. मग खोटे सामाजिक कामाचे निमित्त (एका कॅन्सरग्रस्त मुलीला मुंबई ला पाठवायचे आहे किंवा इतर कारणे )सांगून तुम्हाला पैश्याची मागणी करतो. भर रस्त्यावर त्याचे वाहन अगदी तुमच्या वाहनाला खेटून उभा राहून तुमचे दोन्ही हात घट्ट पकडून ठेवतो. जेणेकरून तुम्ही वाहनाला चाबी लावून पळून जाऊ नये. तुम्ही अनोळखी



समजून घाबरले तर त्याचा गैर फायदा घेऊन तुमच्या जवळ खूप पैसा आहे. देणगी द्यावीच लागेल अन्यथा तुमची गाडीची चाबी काढून घेईल अशी धमकी सुद्धा देतो. तुमच्या खिश्यावर नजर ठेवून ५०० - १००० ने व खिश्यात असेल तेवढी मदत करा म्हणून गंडवितो.

सांयस्कोरजवळ असाच प्रकार एका व्यक्तीसोबत घडला. त्यानंतर अनेक मित्रा सोबत त्यांनी चर्चा केली असता त्यांनीही अशी घटना आपल्या सोबत झाल्याचे सांगितले. नंतर त्या व्यक्तीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला असता एका मित्राला अंबादेवी रोड वर त्याच पद्धतीने हाथ धरून गंडविताना तोच व्यक्ती आढळला. तसेच जवळ जाऊन फोटो काढला. असता तो तिथुन पसार झाला. पोलिसांनी याकडे लक्ष देणे आवश्यक असून अन्यथा काही अनुचित घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# हिवरखेड येथील युवकाचे प्रेत माळू नदीच्या पात्रात आढळले

**मोर्शी/प्रतिनिधीः-** येथून दहा किमी अंतरावर असलेल्या हिवरखेड येथील एका २८ वर्षीय युवकाचे प्रेत माळू नदीच्या पात्रात आढळून आल्याची घटना दि.१३ जुलै रोजी उघडकीस आली.या घटनेमुळे गावात एकच खळबळ उडाली असून सदर युवकाची आत्महत्या की काय? याबाबत मोर्शी पोलीस तपास करीत आहे. मृतकाचे नाव दिलीप शंकर नागले (वय२८,रा.हीवरखोड) असे आहे.फिर्यादी धनराज शंकर नागले (वय ३०) यांनी मोर्शी पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीनुसार दि.१० जुलै २०२५ रोजी दिलीप शंकर नागले (वय २८) हा त्याची मोटर सायकल क्र.एम पी ४८ एम झेड ३९०१ ने घरुन कोणालाही काहीही न सांगता निघुन गेला. त्यानंतर त्याचा आजुबाजुने शोध घेतला असता तो मिळुन आला नाही.मृतक दिलीप नागले याचा नागपुर येथे डोक्याचा उपचार सुरू होता. दि.१२ जुलै २०२५ रोजी रात्री ९ वा.दिलीप याचा भाऊ धनराज यांना मोर्शी पोलीसांचा फोन आला की तुमची गाडी मोर्शी पोलीस स्टेशनला आहे व ती गाडी माळु नदी काठावर मिळाली असुन एक प्रेत माळू नदीच्या पात्रात असल्याचे त्यांनी सांगितले. दि.१२ जुलै रोजी अंधार पडल्याने प्रेत नदी बाहेर काढणे शक्य नव्हते.दरम्यान दि. १३ जुलै रोजी☞(पान २ वर)

# चाकूहल्ल्यात महिलेचा मृत्यू, गर्भवतीसह तिघे गंभीर

### बडनेरा येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरात सोमवारी रात्री घडलेली एक घटना समाजातील बिघडलेल्या मानसिकतेचं आणि पोलिस यंत्रणेच्या ढिलाईचं जिवंत उदाहरण ठरली. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या एका व्यक्तीला जाब विचारणं एका महिलेला जीवावर बेतले. यात गर्भवतीसह तिघे गंभीर जखमी झाले. या घटनेमुळे बडनेरासह अमरावती शहरातही खळबळ उडाली आहे.



इंदिरानगर आदिवासी झोपडपट्टीत गुड्डु शहा नामक व्यक्ती लहान मुलांना चाकू दाखवून धमकावत होता. याबाबत निलोफर बेगम शेख जमील (वय ३२) यांनी गुड्डू शहा या गुंडाला जाब विचारला असता, त्याने निलोफर बेगमसह तिच्या कुटुंबातील सदस्यांवर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात निलोफरचा जागीच मृत्यू झाला. हा हल्ला गुड्डू, त्याचा भाऊ राजा, एक अज्ञात तरुण आणि आईने मिळून केल्याची माहिती पुढे आली आहे. या हल्ल्यात शेख सलीम (वय ३६), सनम मिर्झा अफसर बेग (वय १६) आणि गर्भवती सलमा चौधरी (वय २८) गंभीर जखमी झाले आहेत. सर्वांना उपचारासाठी सुपर स्पेशालिटी रुग्णालयात☞(पान २ वर)

## तेरवी निमित्त भावपूर्ण श्रध्दांजली



**स्व. अशोकराव रामचंद्रजी निर्मळ**
, ज्येष्ठ कॉंग्रेस नेते आणि वलगांवचे माजी सरपंच तसेच सेवा सहकारी सोसायटीचे व आदर्श नागरी पतसंस्थेचे माजी अध्यक्ष होते.
पी.डी.एम.सी. चे अधिक्षक डॉ. सोमेश्वर निर्मळ यांचे ते ज्येष्ठ बंधू होत.

तेरवीचा कार्यक्रम दि. १५.७.२०२५ ला हरिकृष्ण मंगलम कार्यालय येथे करण्यात येत आहे.

शोकाकुल

**समस्त निर्मळ परिवार, वलगांव**